
# शब्द रुची

४४

जून २०२०
मूल्य १० रुपये
पृष्ठे ६४




विविध साहित्यप्रकारांतून
तुम्ही आम्हाला
'रत्नाक्षरं' दिलीत.
त्यांच्या वाचनातली
'इन्व्हेस्टमेंट' अमाप देत राहील,
आम्हाला...
पुढल्या अनेक पिढ्यांना.....


# आपण यांना ऐकलंत का?

storytel


दिलीप प्रभावळकर





विक्रम गोखले





अरुणा ढेरे





उदय सबनीस




मृणाल कुलकर्णी




तुषार दळवी




## नामवंतांनी वाचलेल्या दर्जेदार साहित्यकृती!

**१,००,०००+ ऑडिओबुक्स मराठी, हिंदी आणि इंग्रजीमध्ये**

www.storytel.com/marathi
या लिंकवरून स्टोरीटेल ॲप डाऊनलोड करा
आणि 30 दिवस मोफत ऐका!

Download on the App Store | GET IT ON Google Play

30 दिवसांचा ट्रायल पिरियड संपल्यानंतर तुमचे सबस्क्रिप्शन 299/ महिना असे सुरू राहील.

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

**ग्रंथाली वाचक चळवळ**

# शब्द रुची

**जून २०२०, वर्ष सातवे**
**अंक दुसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
**अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट : योगिता मोरे, सहकारी : सुमेधा कुवळेकर**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
% २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवार पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

४४ ग्रंथाली

## अनुक्रम

**स्मरणस्वर**

**अशोक समेळ / ६**
चतुरस्र मतकरी

**राजीव जोशी / ८**
गुरुऋणनिर्देश - नाट्यकर्मी-साहित्यप्रेमी चंद्रकांत मेहेंदळे

**डॉ. निर्मोही फडके / १२**
भाषाशुद्धीचा निष्ठावंत

**मीना नेरूरकर / १६**
अधुरी स्वप्ने आणि दुर्दम्य आशावाद : साई गुंडेवार

**कॅप्टन नीलम इंगळे-लोबो / १९**
'ड्युटी'ला लॉकडाऊन नाही!

**राधिका कुंटे / २६**
भाषाशास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या मिलाफाची झेप

**विलास माने / २९**
टाळेबंदी भटक्या-विमुक्तांच्या जगण्याची!

**अनुराधा ठाकूर / ३३**
कोरोनाकाळ आणि अर्थकारण व समाजव्यवस्था

**धनंजय गांगल / ३७**
मनुष्यच अप्रस्तुत होईल!

**श्रीराम शिधये / ४०**
कोरोनाच्या साथीचे 'असेही' दुष्परिणाम!

**योजना शिवानंद / ४२**
लॉकडाऊनमधला 'आविष्कार'- अबू हसन आणि मी

**कुमार सोहोनी / ४६**
माझे कॅलगरीमधले चार महिने, विलगीकरणाचे

**डॉ. मोहन द्रविड / ४९**
मूर्ती लहान, पण...

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार / ५३**
कोरोनाच्या विषाणूचे जागतिक परिणाम

**काव्यरंग / ५७-५८**

**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ५९**

# संपादकीय

दिवस लॉकडाऊनचे असले तरी आपलं आयुष्य आपल्याला लॉकडाऊन करता येत नाही. काळजी उद्याची, काळजी आजची, मुलाबाळांची-नोकरीची... काळजीचं अव्याहत चक्र! हे चक्र मात्र कुलुपबंद होत नाही.

काळजीमुळे वाढते ठोके दुर्लक्षित करून माणसं स्वत:चा जीव धोक्यात घालतात हे आपण अनेक वर्ष खरंतर पाहतो पण ते तीव्रतेने जाणवलं या 'लॉकडाऊन'मध्ये! 'रक्त आपुल्या प्रिय आईचे हिमालयावर ओघळते' म्हणून सैनिकांनी कितीदा आपले प्राण पणाला लावले. सीमेवर ते लढतात म्हणून तर आपण सुरक्षित असतो.

या सैनिकांप्रमाणेच डॉक्टर, वॉर्डबॉय, आरोग्यसेविका आणि अत्यावश्यक सेवेमधल्या क्षेत्रांमधले लोक आज 'कोरोनायोद्धे' म्हणून अतिशय वेगळे आदर्श उभे करताहेत. एकीकडे आपला एक दिवसाचा पगार शासन घेणार की दोन दिवसाचा? ते अनिवार्य आहे का? तसं परिपत्रक आहे का? असे मुद्दे विचारणारे लोक घरी बसून पूर्ण वेतनाचा लाभ घेताहेत नि दुसरीकडे आपल्या जिवाची पर्वा न करता माणसं या विषाणूशी दोन हात करायला सज्ज आहेत. त्यांच्या त्यागाचे मोल कशातच करता येणार नाही. अनेकांच्या त्यागावर वर्षानुवर्षं एखादी समाजव्यवस्था उभी असते. त्यागाचं मूल्य आपल्या मातीने वेगवेगळ्या काळात अनुभवलं. या महिन्यातला अजरामर दिवस म्हणजे शिवराज्याभिषेकदिन! या श्रीमंत राजाच्या सुपुत्राला मात्र आयुष्यभर उन्हाचा सामना करावा लागला. द्वेष-मत्सराचं कालकूट विष जागोजागी पेरलेलं! महाराष्ट्राच्या वाट्याला आलेली ही सर्वात मोठी शोकांतिका.

विषारी राजकारणाचे रंग-ढंग कोरोनाच्या काळातही आपण चांगलेच अनुभवतोय. शिक्षणापासून समाजकारणापर्यंत सारंच ढवळून निघतंय. 'शब्द रुची'च्या एप्रिल-मे जोड अंकाचं आपण जोरदार स्वागत केलंत. छापील अंक असो वा डिजिटल... आवर्जून प्रतिक्रिया देणे हे 'शब्द रुची'च्या वाचकांचे वैशिष्ट्य!

याही अंकात कोरोनाकाळाचे काही कवडसे वाचकांना सापडतील. समाज नि संस्कृतीचा कॅनव्हास आपल्या सर्जनाने रंगवणारी माणसं अखंड आपल्या स्मरणात राहतात. 'स्मरणस्वर'मधून अशा अविस्मरणीय माणसांचे जीवनगाणे साकारले आहे. अलीकडच्या काळात माझ्या सोमैया महाविद्यालयाच्या वाट्याला रत्नाकर मतकरींच्या भेटीचे सुंदर योग आले. त्यांच्या कथेवर आधारित 'इनव्हेस्टमेंट' या चित्रपटानिमित्ताने तर यंदा 'साहित्य अकादमी' सोबत आयोजित केलेल्या 'लोकप्रिय साहित्य' या विषयावरील परिसंवादानिमित्ताने! आमच्या विद्यार्थ्यांसोबत  किती सहज रमले होते मतकरी...

नाटक मुलांच्या मनात रुजवण्याचं फार मोठं काम त्यांनी केलं. 'लोककथा ७८' हे त्यांचं नाटक अभ्यासक्रमात असताना महाविद्यालयातली मुलं या नाटकातील दृश्य अभ्यासाचा भाग म्हणून  बसवायची. 'लोकांची कथा लोकांनीच लिहायची असते', ही ठळक सामाजिक जाणीव या नाटकाने करून दिली.

भाषेचा जाणता-नेणता शिलेदार म्हणजे अरुण फडकेसर! सरांचा संवाद कधीतरी फोनवर व्हायचा. मराठी अभ्यासकेंद्राच्या कामाविषयी सरांना वाटणाऱ्या आस्थेतून हा संवाद सुरू झाला. सर हाडाचे शिक्षक! शुद्धलेखनविषयक कार्यशाळांमधून त्यांनी भाषासंस्कार रुजवला. फडकेसरांच्या लेखनकोशाशिवाय अनेकांचे पान हलत नाही. बी.ए., एम.ए.चे आमचे विद्यार्थी हमखास त्यांचा 'शुद्धलेखन तुमच्या खिशात' हो छोटा कोश सोबत ठेवतात. सरांच्या कामाची दखल जितक्या प्रमाणात घ्यायला हवी होती, तितकी ती घेतली गेली नाही. भाषाविषयक काम उपेक्षित का राहते?

'सर्व बोर्डाच्या शाळांमध्ये मराठी अनिवार्य' या शासकीय निर्णयाची अंमलबजावणी या वर्षापासून होणार आहे. यंदा पहिली आणि सहावीच्या वर्गांकरता सुरुवात करून प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही टप्प्यांवर क्रमाने आगामी शैक्षणिक वर्षांमध्ये सर्व वर्गांकरता मराठी अनिवार्य'ची अंमलबजावणी करण्यात यावी असे

शासनाच्या परिपत्रकात म्हटले आहे.

अनेक बड्या इंग्रजी शाळांनी सोयीस्करपणे मराठी टाळून 'फॉरिन' भाषांची प्रतिष्ठापना केली. या शाळांमध्ये मुलांना पाठवणाऱ्या मराठी भाषक पालकांनी अशा शाळांना 'तुम्ही मराठी का शिकवत नाही?' हा प्रश्न विचारण्याची हिंमत दाखवली नाही. अशा सपशेल शरणागतीने मराठीचे नुकसान केले. आपली भाषा ही आपल्या जगण्याची मूलभूत गरज झाली नाही.

'ग्रंथाली'ने भाषा आणि साहित्य यांच्या संवर्धनाकडे चळवळ म्हणून पाहिले. मराठीच्या प्रेमाने भारलेली माणसे 'ग्रंथाली'च्या सहवासात आली. अशा माणसांचे मोहोळच 'ग्रंथाली'च्या परिवारात सामावले. चंद्रकांत मेहेंदळे हे असंच एक नाव! उत्साहाचा-चैतन्याचा हा खळखळता झरा दूरदेशी निघून गेला, असंख्य आठवणी मागे ठेवून! त्यादिवशी सुदेश हिंगलासपूरकरांचा मेसेज आला, ''माणसाची शेवटची भेटही घेता येऊ नये, यापेक्षा वाईट गोष्ट नाही.''

कोरोनाकाळतली ही अगतिकता आतून अस्वस्थ करते.

केव्हा संपेल ही बेचैनी नि अस्वस्थता?

काय उरेल या साऱ्यातून?

या अनपेक्षित पडझडीतून उरावं,

समाज, संस्कृतीत मानवता यांच्या जपणुकीकरता असंख्य माणसांनी मागितलेले पसायदान...

**– डॉ. वीणा सानेकर**

सी-१२, सुयोग सोसायटी,

संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१

भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६


veenasanekar2018@gmail.com

ग्रंथाली

## वंश-अनुवंश

**डॉ. हेमा पुरंदरे**

शब्दांकन : **उज्ज्वला गोखले**





**हार्ड बाउंड मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रुपये**

**पेपरबॅक मूल्य ३५० रु. सवलतीत २५० रुपये**

## कॅलिडोस्कोप

**शशिकांत जागीरदार**




**मूल्य ३०० रुपये**

**सवलतीत १८० रुपये**



**अशोक समेळ**

# चतुरस्र मतकरी

ते साल होतं १९७७-७८. मी एक हौशी नाट्यकर्मी. आपली नोकरी सांभाळून नाटकाची हौस एकांकिका, बालनाट्य, प्रायोगिक नाटकं करून भागवत असे. आमचा एक ग्रुप होता अभियान नावाचा. त्यात ईर्शाद हाश्मी, दीपक खेडेकर, राणे इत्यादी अनेक मित्र होते. स्पर्धेसाठी एकांकिका, नाटकं बसवणं- तेसुद्धा प्रत्येकानं आपापल्या खिशातले पैसे काढून, ही आमची हौस. नाटकाच्या भाषेत 'खाज' किंवा 'कीडा', याचे आम्ही खूप लाड करत असू! पण त्याची मजा, नशा और होती आणि तेच आयुष्य जगण्याची आणि जागण्याची धडपड होती. माझं वाचन अफाट. आवडते लेखक बाबूराव अर्नाळकर. त्यांनी हे वाचनाचं वेड लावलं ते आजमितीपर्यंत! या वाचनात माझे अनेक आवडते लेखक होते आणि त्यात एक, आपल्या वेगळ्या धाटणीच्या अंगाने लिहिणारे लेखक होते, 'रत्नाकरी मतकरी'. मी त्यांच्या सर्व गूढकथांचा फॅन होतो. त्यांचा विलक्षण चाहता होतो. त्यांच्या 'परदेशी', 'निजधाम', 'तृप्त मैफल', 'फाशी बखळ', 'खेकडा', 'गोंदण', गहिरे पाणी', 'निर्मनुष्य', 'मध्यरात्रीचे पडघम' इत्यादी अनेक गूढकथासंग्रहांचं मी पारायण केलं होतं. इतकंच नव्हे, आमच्या ग्रुपमध्ये, कुटुंबामध्ये याचं मी कथाकथनही करत असे! मतकरी हे माझे लेखनातले आदर्श होते.

> मराठी नाट्यसृष्टीला, साहित्यसृष्टीला मतकरींनी दिलेलं योगदान अफाट आहे. हे सर्व या माणसानं नोकरी सांभाळून केलं. आपलं कुटुंब आणि मित्रपरिवार घेऊन या माणसानं बालरंगभूमी जगवली. समृद्ध केली. सुधाताई करमरकर, सुलभाताई देशपांडे, वंदना विटणकर यांच्या बरोबरीने बालनाटकाचं संवर्धन कुणी केलं असेल तर ते रत्नाकर मतकरींनीच!

एकदा आम्हाला एकांकिकास्पर्धेत भाग घ्यायचा होता, पण एकांकिका सापडेना.. मी विचार केला आपणच लिहूया का? कारण माझ्या डोक्यात मतकरींची 'खेकडा' ही गोष्ट घोळत होती. प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे, असा विचार करून मी 'खेकडा' या गूढकथेवर एकांकिका लिहिली. मतकरींना मी ओळखत नव्हतो, पण आमचा दिग्दर्शक ईर्शाद हाश्मी त्यांचा मित्र होता. त्यांनी मला मतकरी यांच्याकडे, 'बॅंक ऑफ इंडिया'मध्ये (हॅन्डलूम हाऊससमोर ब्रँच होती), चर्चगेटला नेलं. माझी ओळख करून दिली. तेव्हा मी वडाळा, अॅन्टॉप हिलला राहत होतो आणि मतकरी 'राधा निवास'मध्ये (बेस्ट डेपोसमोर, दादर) राहत होते. ते स्वत:हून विलक्षण आपुलकीनं खेळमेळीच्या स्वरात म्हणाले, ''अरे आपण जवळ राहतो, मीच तुझ्या घरी येतो.'' त्यांचं ते बोलणं ऐकून मी भारावलो. अरे! एवढा मोठा लेखक आज माझ्या घरी येणार, त्यांच्यासमोर त्यांच्या कथेवर लिहिलेली एकांकिका मी वाचणार, ही भावना दडपणास्पद होती, तेवढीच प्रचंड सुखावह होती!

संध्याकाळी सात वाजता मतकरी आले. आमचा ग्रुपपण होता. माझ्या पहिल्या नाट्यप्रयत्नाचं मी वाचन केलं. आणि मतकरींना ते आवडलं. त्यानंतर खूप गप्पा, सर्व नाटकांसंदर्भात मारल्या आणि मला 'खेकडा' या कथेवर नाटक करण्याची परवानगी एकही पैसा मानधन न घेता मतकरींनी दिली.

'खेकडा' एकांकिका नंबरात आली नाही, केवळ अभिनयाचे बक्षीस देऊन गेली, पण ती घटना माझ्या आयुष्यात पुढे 'लेखक' म्हणून केवढी उलथापालथ करणार होती याची मला कल्पना नव्हती. त्या एका घटनेमुळे मी नाटककार झालो आणि आज माझ्या नावावर मराठी-गुजराती मिळून साठ नाटकं आहेत. दोन हजारांच्या वर मालिकांचे (दूरचित्रवाहिनी) भाग लिहिलेत आणि सातशे पानांची मी 'अश्वत्थामा चिरंजीव' ही कादंबरी आहे. तेवढीच मोठी कादंबरी मी या क्षणी भीष्माचार्यावर लिहितोय. हे सर्व घडलं ते एका माणसामुळे, त्याचं नाव रत्नाकरी मतकरी!



मराठी नाट्यसृष्टीला, साहित्यसृष्टीला मतकरींनी दिलेलं योगदान अफाट आहे. हे सर्व या माणसानं नोकरी सांभाळून केलं. आपलं कुटुंब आणि मित्रपरिवार घेऊन या माणसानं बालरंगभूमी जगवली. समृद्ध केली. सुधाताई करमरकर, सुलभाताई देशपांडे, वंदना विटणकर यांच्या बरोबरीने बालनाटकाचं संवर्धन कुणी केलं असेल तर ते रत्नाकर मतकरींनीच! त्यांच्याबरोबर होते दिलीप प्रभावळकर, अरविंद औंधे, प्रशांत वैद्य, अजित देशपांडे, प्रदीप भिडे, रवी पटवर्धन, प्रतिभा मतकरी आणि लाडकी लेक सुप्रिया मतकरीसुद्धा! त्यांनी स्वत:ची 'बालनाट्य' ही संस्था काढून 'निम्माशिम्मा राक्षस', 'अचाट गावची अफाट मावशी', 'अलबत्या गलबत्या', 'आरशाचा राक्षस' इत्यादी अनेक बालनाट्यं केली. त्यावेळी ती प्रचंड गाजली आणि आजही 'अलबत्या गलबत्या', 'निम्माशिम्मा राक्षस' ही दोन बालनाट्यं व्यावसायिक नाटकापेक्षाही अधिक गर्दी खेचताहेत. मात्र दिलीप प्रभावळकरांची चेटकीण आजही माझ्या डोळ्यांसमोरून जात नाही. हे सर्व श्रेय लेखक-दिग्दर्शक रत्नाकर मतकरींचं होतं!

नुसतंच बालनाटक करून हा अवलिया थांबला नाही, त्यानं 'सूत्रधार' नावाची संस्था काढून प्रायोगिक आणि व्यावसायिक नाटकंही केली. काही स्वत: केली, काही अनेक संस्थांनी केली आणि त्यांचे शेकडोंनी प्रयोग झाले. त्यांच्या 'लोककथा ७८' या स्पर्धेत केलेल्या नाटकाचा विषय, आजही चिरंजीव आहे. तसंच डोंबिवलीत घडलेल्या सत्यकथेवर आधारित 'जौळ' कादंबरी गाजली. त्यावर केलेलं नाटक 'माझं काय चुकलं' हे सर्वार्थानं विलक्षण गाजलं. रसिक प्रेक्षकांना अंतर्मुख करून गेलं. त्यांचं प्रत्येक नाटक हे मैलाचा दगडच होतं. मग 'आरण्यक' घ्या, 'अश्वमेध', 'अजून यौवनात मी', 'खोल खोल पाणी', 'चि.सौ.कां. चंपा गोवेकर', 'जादू तेरी नजर', 'अंधार माझा सोबती', 'प्रेमकहाणी' किंवा एका जर्मन दिग्दर्शकाला बोलावून त्याला डिरेक्ट करायला लावलेलं नाटक 'नगरी अंधेरा'. या त्यांच्या नवनवीन विषयाला तोंड फोडणाऱ्या प्रतिभेला कधी अंत नव्हताच! नुकतंच सुप्रियाला (मुलीला) घेऊन केलेलं नाटक 'इंदिरा' काही वेगळाच संकेत देऊन जात होतं.

हे सर्व त्यांना कमीच वाटत होतं म्हणून त्यांनी प्रायोगिक रंगभूमीसाठी छबिलदासला एकांकिका उपक्रम राबवला होता!

त्यांनी टीव्ही मालिकापण केली. कुठलंही माध्यम त्यांना वर्ज्य नव्हतं. हा चिंतनशील माणूस स्वत:ला नेहमीच अवगुंठून घ्यायचा त्याच्या कोषात. तो कोष होता आपणा सर्वांसाठी...!

असंच एक आणखी असामान्य काम त्यांनी केलं ते म्हणजे त्यांनी स्वत: 'इन्व्हेस्टमेन्ट' नावाचा चित्रपट केला. आणि त्याला चक्क राष्ट्रीय पुरस्कार मिळाला! व्वा! मतकरी दि ग्रेट!

पण हा तसा सर्वसामान्य दिसणारा माणूस, सामान्य राहणारा माणूस. कधी हवेत चाललाच नाही. या कर्मयोग्याचा फक्त कर्मावर विश्वास होता!

पुढे आमच्या उडत्या भेटी व्हायच्या. एकदा प्रभाकर पणशीकरांना 'अंधार माझा सोबती' १९८२ साली पुन्हा करायचे होते म्हणून मी मतकरींना भेटलो. एकदा 'लोकसत्ता'च्या कार्यक्रमाला तेव्हा मी 'अश्वत्थामा' लिहिला याचं त्यांना प्रचंड कौतुक वाटलं. माझा 'खेकडा' ते 'अश्वत्थामा' प्रवास हा मतकरींमुळे झाला. पुढे प्रभाकर पणशीकर, सुधा करमरकर, विजय तेंडुलकर हे गुरू मिळाले, पण माझ्या घरी येऊन मला प्रोत्साहन देणारे मतकरी प्रथम! त्यांना माझे लाखो प्रणाम!


आज मतकरी आपल्यात शरीरानं नाहीत, पण त्यांचं अफाट काम आपल्याला त्यांचं सतत स्मरण करून देईल. तेव्हा त्या आत्म्याला शांती लाभो म्हणणारा मी कोण? तो आत्माच परमेश्वराचा होता, राहिला!



**अशोक समेळ आणि रत्नाकर मतकरी**

**– अशोक समेळ**

भ्रमणध्वनी : ९३२०६६२४९७



**राजीव जोशी**

# गुरुऋणनिर्देश - नाट्यकर्मी-साहित्यप्रेमी चंद्रकांत मेहेंदळे

**लॉ**कडाऊनचे दिवस. नेहमीप्रमाणे काही मित्र-नातलग ह्यांना फोन करत होतो. ३० एप्रिल रोजी असाच एक फोन चंदू मेहेंदळे ह्याला केला. कसे घरात अडकून पडलो आहोत, ह्याच्या गप्पा झाल्या. मधूनच खोकला आला की दम लागला, म्हणून त्याने बोलताबोलता फोन बंद केला. नंतर बोलू! पण ते जमले नाही, आणि शेवटी चंदू गेल्याची बातमी आली. कोरोना आणि लॉकडाऊन इतके क्रूर व निर्दयी, की कोणी कोणाला भेटू शकत नाही, अंत्यदर्शनही नाही! आमचा तो शेवटचा फोन असेल अशी दोघांनाही पुसटशी कल्पना आली नाही. मग लक्षात आले की यापुढे ते फोन-भेटणे काही नसणार! असतील त्या अनंत आठवणी.

सिनेमा-नाटकामध्ये जसा फ्लॅशबॅक असतो, तसे मन भूतकाळात गेले. विलेपार्ल्याच्या डहाणूकर कॉलेजमध्ये विनय आपटे व चंद्रकांत मेहेंदळे ही जोडी येत होती. विनय दिग्दर्शित 'डीअर पिनाक' या एकांकिकेने सर्वप्रथम येण्याचा मान पटकावल्याने (साल-१९७३-७४) उपनगरातील कॉलेजांत कलागुण असलेले विद्यार्थी आहेत हे रजिस्टर झाले. विजय बोन्द्रे म्हणजे गॉसिप ग्रुप, त्यातील सुनील

> गुरुऋणातून कधी मुक्त होता येत नाही. स्क्रिप्ट रिपेअरिंग करणारा माझा एक मार्गदर्शक निघून गेला आहे. हातात एक अर्पणपत्रिका आहे, माझ्या एकांकिकेच्या पुस्तकाची - 'उंच उंच झुला!' जी मी माझ्या पहिल्या गाजलेल्या एकांकिकेच्या दिग्दर्शकाला लिहिलेली आहे ती अशी- 'चंदू, इतकेच नाही, पण अनेक आठवणींचे, अनुभवांचे शब्द-बोल आहेत. जेव्हा जेव्हा उत्तम साहित्य दिसेल, तेव्हा अभिवाचन करण्याचा विचार आला की तूच समोर दिसशील. नट, दिग्दर्शक, कुटुंबवत्सल माणूस आणि अभिवाचक - चंद्रकांत मेहेंदळे!'

शेंडे, विलास वंजारी, माधव पटवर्धन हे प्रायोगिक रंगभूमीवर धडपडणारे तरुण. त्यांनी एकांकिका, प्रायोगिक नाटके पाहण्याची एक सवय लावली. तोवर कॉलेजात, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात जाऊन अरविंद गोखले, श्री.ना. पेंडसे, गाडगीळ-भावे ह्यांच्या कथा-साहित्य वाचणाऱ्या माझ्यासारख्यांना 'एकांकिका' हे माध्यम दिसले. त्याआधी ठाऊक फक्त रेडिओवरच्या 'श्रुतिका'. किंचित कविता करणारे शरद सावंत व मी एकांकिकालेखनाकडे ओढले गेलो. पोल्युशन या तत्कालीन सामाजिक समस्येवर मला एकांकिका सुचली. काहीबाही संवाद-प्रसंग लिहिले. पण, करणार कोण? सुदैवाने मी माटुंग्याच्या न्यू लॉ कॉलेजात होतो. इंटरकॉलेजिएट एकांकिका करण्याची संधी मिळाली. पण, दिग्दर्शक कोण? अनायासे ओळख झाली होती म्हणून चंदूला (तेव्हा मेहेंदळे) स्क्रिप्टवजा लेखन दाखवले. वाचन, समाजभान व प्रायोगिक नाटक ह्यामुळे माझ्याहून चार पावसाळे पुढे असलेल्या त्याला माझ्या विषयात स्पार्क दिसला. त्याने हो म्हटले. माझ्या लिखाणावर त्याने संस्कार सुरू केले. कानेटकर-तेंडुलकर ह्यांचे दाखले देऊन एकातून दुसरा असे

प्रसंग घडत गेले पाहिजेत, त्यातून 'क्रेसेंडो' उभा राहिला पाहिजे. हा त्याचा आवडता शब्दप्रयोग मला किती कळत होते हे त्यालाच ठाऊक; पण सीन्सची मोडतोड, संवादात चढउतार तो स्वतःच करत होता. आणि 'मोरूचे पोल्युशन टीम' ही माझी पहिली एकांकिका रंगभूमीवर आली. (आबा नेमळेकर, सुधीर कवडी मुख्य भूमिकेत; तसेच, शोभा नाबर, शोभा नामजोशी, ज्योती बर्गे-माने व पालकर भगिनी होत्या.) न्यू कॉलेजमध्ये एकांकिका करताना छोटे-छोटे गाण्यांचे तुकडे होते त्यांना तेव्हा गॉसिप ग्रुपशी संबंधित मंगेश कुलकर्णी याने सोप्या व सहज गुणगुणत्या येतील अशा चाली दिल्या होत्या. (पुढे मंगेशने लिहिलेली 'मोरूची मावशी' नाटकातील गाणी आणि 'आभाळमाया'चे शीर्षकगीत खूपच गाजले.) प्रा. सदानंद रेगेंसारखे मान्यवर व जाणकार परीक्षक होते. चंदू दिग्दर्शक होण्याची ती पहिली पायरी होती. खुद्द विजय तेंडुलकरांना त्याने माझ्या एकांकिकेच्या विषयाबद्दल सांगितले, त्यांनीही अप्रूप व्यक्त केले. पुढे मी त्याचे दोन अंकी नाटक केले. त्यात 'बेस्ट'मध्ये ती एकांकिका करणारे अरविंद मुळे व अरुण नलावडे सहभागी झाले. शिवाय विद्या पटवर्धन. त्या पाहिल्या नाटकाने आळतेकर-कोल्हटकरस्पर्धांत चांगले यश मिळवले. नंतर मीच 'प्लँचेट' ही एकांकिका सिद्धार्थ कॉलेजातून लिहिली-बसवली. (कलाकार प्रदीप पटवर्धन, जयवंत वाडकर, अजित वरळीकर, मिलिंद वैद्य.) ती पाहून चंदू एकच वाक्य म्हणाला, ''काय रे, स्वतःचे बाळंतपण स्वतःच करायचे होते का? तुझ्या स्क्रिप्टमधील त्रुटी दुसऱ्या दिग्दर्शकाने कमी केल्या असत्या, तूच का केलेस?'' असे वडीलकीच्या नात्याने सुनावले. पुढे मी लिहीत राहिलो. भालचंद्र झा-उदय म्हैसकर असे दिग्दर्शक भेटत गेले. दरम्यान गॉसिप ग्रुप, उन्मेष स्पर्धा, हौशी नाट्यस्पर्धा, एकांकिकास्पर्धा पाहणे सुरूच होते. पाहणे नव्हते तर ते मौल्यवान शिक्षणच होते. मग चंदूला आम्ही अभिनेता म्हणून पाहिले. 'गॉसिप'चे क्षितिज रुंद होत होते. 'घनदाट' या नाटकात मुख्य भूमिका व अभिनयासाठी पारितोषिक मिळवणारा म्हणून त्याच्याबद्दल अधिक अभिमान वाटला. विनय आपटेदेखील सातत्याने बक्षिसे घेत होता, पण विनयपेक्षा चंदू जवळचा वाटायचा. इतका की आमचे काही मित्र त्याला विनय हाक मारत असे तसे चंद्या म्हणू लागले, तेव्हा विनयने आपल्या आवाजात झापले, 'माझा मित्र म्हणून मी त्याला चंद्या म्हणतो, म्हणून तुम्ही नाही म्हणायचे! साल्यांनो, तो दोन मुलांचा बाप आहे. माझा मित्र आहे.' नंतर सर्व चंदू किंवा मेहेंदळे म्हणून लागले. पुढे नोकरी-करिअरमुळे संपर्क कमी झाला. तरी इंटरबँक स्पर्धेसाठी मला दिग्दर्शक हवा होता म्हणून चंदूकडे गेलो. दिलीप परदेशी ह्यांची 'फिनिक्स' एकांकिका केली.


पुढे गॉसिप ग्रुपचे वेगवेगळे प्रयत्न चालू होते. ते पाहिले जात होते. विनय टीव्ही सेंटरवर नोकरीला लागला आणि हौशी-प्रायोगिकवर काम करणाऱ्या युवकांना नवे दालन मिळाले. उत्स्फूर्त नाट्याविष्कार 'गजरा', टीव्ही प्लेजमधून चंदू आणि अन्य गॉसिप मंडळी दिसू लागली. आणीबाणीच्या विरोधात 'धिंगाणा' हे पथनाट्य केले. 'द वॉल' गाजले. विनय 'चंद्र जिथे उगवत नाही', 'संध्याछाया'



अशा नाटकांतून व्यावसायिक नाटकांकडे वळला; त्यावेळी अर्थात चंदू, विलास वंजारी, सुनील शेंडे हे खास विनय-मित्र सोबत होतेच. स्पर्धेसाठी चंदूने अरुण साधूंच्या 'बहिष्कृत' कादंबरीवर नाटक लिहिले, तेच पुढे 'भूमिका' संस्थेने व्यावसायिक रंगभूमीवर आणले. (विश्वास पाटील ह्यांच्या 'झाडाझडती'वरही त्याने नाटक लिहिले होते.) खाजगी वाहिन्यांचे युग सुरू झाले होते. विनय आणि टीम 'आभाळमाया' करू लागली. चंदू मालिका-एपिसोड लिहीत होता. पुढे विनयने नोकरी सोडली, तेव्हा चंदू त्याच्या ऑफिसात क्रिएटिव्ह टीमचा भाग होताच. शिवाय पूर्णवेळ काम करताना व्यवस्थापकीय कामे करत होता. 'जिथे विनय, तिथे चंदू!' जणू अविभक्त समीकरणच बनले होते. एक मित्र, एक सखा, एक खंदा आधारवड म्हणून चंदू विनयच्या बरोबर सावलीसारखा होता. विनयच्या कंपनीत अनेक कामे करत होता. मात्र कधी तिथे किंवा बाहेर जाऊन आपली कला वाढवण्याचा, स्वतंत्रपणे काम करण्याचा विचारच केला नाही. मैत्रीमध्ये निष्ठा, एकनिष्ठता कशी असावी, ह्याचे एक आदर्श उदाहरणच.

विनय आपटे ह्यांनी शिवाजीमहाराजांवर हिंदी सिरीयलचा महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट हाती घेतला. चंदू होताच, पण तिथे त्याला हार्ट अटॅक आला, विनयने मित्रासाठी प्रयत्न केले आणि वेळीच औषधोपचार केले. विनय-चंदू मैत्री अधिक घट्ट झाली. विनय-वैजयंती आपटे ह्यांच्या 'गणरंग' या व्यावसायिक नाट्यसंस्थेचा चंदू सह-संस्थापक म्हणून अविभाज्य भाग होता. नाट्यनिर्मितीसाठी

जे जे करायचे ते मनस्वीपणे, झोकून देऊन करत होता. मग लेखकांशी संपर्क, स्क्रिप्टवर चर्चा, विनयच्या गैरहजेरीत तालीममास्तर होणे आणि बरेच काही. लेखन-दिग्दर्शन-निर्मिती असा विपुल अनुभव असूनही चंद्रकांत मेहेंदळे याला कोणी स्वतंत्र काम दिले नाही. खुद्द विनयकडे सह-साथीदार/ निर्मिती सूत्रधार म्हणून राहिला. इतका अनुभव गाठीशी असलेल्या, सर्वच निर्माते-मॅनेजर ह्यांच्या संपर्कातील आपल्याला काम दिले जात नाही, ही त्याची खंत बोलून दाखवायचा. नाही म्हणायला डहाणूकरपासून परिचित असलेल्या राजू ढवळे ह्याने रिलायन्स कंपनीतर्फे राज्य नाट्यस्पर्धेला माझे नाटक 'द जजमेंट' बसवण्याचे काम त्याच्यावर सोपवले. (तेव्हा, दोन अंकी नाटक स्वतंत्रपणे बसवायला मिळाले म्हणून चंदू कधी नव्हे इतका भावविवश झालेला आम्ही पाहिला.) एकांकिका-नाटक बसवताना लेखनात बदल करण्याची त्याला आवड होती, म्हणून मी त्याला गमतीने म्हणत असे- पुण्यात जसे मेहेंदळे गॅरेज आहे, तसे तू स्क्रिप्ट रिपेअरिंगचे गॅरेज काढ! (तसे पाहिले तर परदेशात स्क्रिप्ट डॉक्टर असतात. आपल्याकडे एरवी फॉरेनची कॉपी होते, पण कुणा मालिका-सिनेमावाल्यांना अशी कोणाची नेमणूक करावीशी वाटलेली नाही!) माझ्या आधी लिहिलेल्या नाटकातील नकारार्थी शेवट त्याला सकारात्मक हवा होता. त्याच्या वाचनसमृद्धीमुळे फाशीच्या कैद्याची समस्या निगेटिव्ह नसावे, म्हणून मीही त्याचे बदल स्वीकारले व पुनर्लेखन केले. त्याच्यातील नटावर दिग्दर्शकाचा प्रभाव होता, त्यामुळे संहिता परफेक्ट करण्यात त्याला इंटरेस्ट असे.




*चंदूच्या आयुष्यातील साहित्यपर्व* - अनेक दशके प्रायोगिक-व्यावसायिक नाटकांत काढल्यावर, आणि नवीन निर्मिती कमी झाल्यावर चंदू हा सर्वत्र परीक्षक म्हणून जाऊ लागला. आयएनटी स्पर्धेत 'बीपी'सारखी धमाल एकांकिका निवडताना त्याच्यातील चोखंदळ -नि:पक्षपाती परीक्षकाचा अनुभव आला. अनेक नामांकित स्पर्धांना परीक्षक म्हणून निमंत्रित केल्याने त्याच्या आजवरच्या अनुभवाचे काही प्रमाणात तरी चीज होत होते. पण, तो काही त्यातच रमणारा नव्हता. गेली चाळीसपेक्षा अधिक वर्षे सकस वाचन केलेल्या चंदूने अभिवाचनाद्वारे उत्तम साहित्य-आत्मकथने प्रेक्षकांपर्यंत नेण्याचा उपक्रम 'चैत्र' या संस्थेद्वारे सुरू केला. प्रज्ञा भाटवडेकर, अक्षय पेंडसे, आशा शेलार इत्यादी कलाकारांनी वेळोवेळी साथही दिली. चैत्र संस्था अभिवाचन कार्यक्रम-दीपक करंजीकर, मिलिंद फाटक, प्रकाश भाटवडेकर, तेजश्री बोरकर-दीक्षित, लतिका सावंत. दृश्य संकलन-विश्वास महाशब्दे/ प्रकाशयोजना-रंगमंच-व्यवस्था-प्रकाश भाटवडेकर, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चांगल्या पुस्तकाची आणि साहित्यिकांची ओळख व्हावी म्हणून कार्यक्रम - 'सांगावसं वाटलं म्हणून!!' या अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन करत होते. त्यांनी पुणे, नाशिक व कोल्हापूर येथे अभिवाचनाचे खास असे प्रयोग केले. रिकामे बसणे त्याच्या स्वभावात नव्हते. सतत फोनवर बोलताना, काहीतरी काम काढ, एकत्र काम करू, असे सांगणे असायचे. यामुळेच दिनकर गांगल ह्यांना सांडू ह्यांच्या पुस्तकासाठी लेखक हवा होता, तिथे मी चंदूचे नाव सुचवले. नव्या उत्साहाने त्याने गांगल-सांडू ह्यांना भेटणे, माहिती घेणे व लिखाण करणे सुरू केले (मात्र तो प्रकल्प रखडला.), मग डॉ. लेले ह्यांच्या पुस्तकाचे काम. उत्तम वाचक व संपादन-जाण असलेल्या चंदूला गांगल ह्यांचा सहवास लाभला, दोघांचे ट्युनिंग जमले, मग तो थिंक महाराष्ट्रसाठी लिहू लागला. अशाच वाटचालीत त्याचे 'ग्रंथाली'त येणे-जाणे सुरू होते. काही वर्षांपूर्वी ग्रंथालीतर्फे अभिवाचनस्पर्धा घेण्याचे ठरले, तेव्हा लेखक-दिग्दर्शक व आवाजविषयक कार्यशाळा घेणारे श्रीनिवास नार्वेकर आणि अभिवाचन चळवळीचा ध्यास घेतलेले ज्येष्ठ नाट्यकर्मी चंद्रकांत मेहेंदळे तिथे आयोजक-समन्वयक असणे हेही अटळच होते. मीही परीक्षक म्हणून सहभागी होतोच. काम हवे म्हणणाऱ्या नाट्यकर्मी-साहित्यप्रेमी चंद्रकांतला ग्रंथालीचे व्यासपीठ आपलेसे वाटले. नाट्यनिर्मिती दूर राहिलेली होती, परीक्षक म्हणून तरी किती काम करणार? म्हणून अभिवाचन चळवळ हा त्याचा ध्यास ठरला. सलगपणे ग्रंथालीच्या या उपक्रमात त्याने भाग घेतला. ती राज्य-पातळीवर विस्तारली गेली. ते काम संपले की काही महिन्यांनी चंदूचा फोन असे- 'सुदेश, अरुण आणि गांगल ह्यांना काही काम आहे का विचार!'

काही काळ त्याने कमलाकर सोनटक्केसरांच्या मालिकेसाठी लेखनही केले होते. दरम्यान अनंत पणशीकर ह्यांच्या संस्थेसाठी एकांकिकास्पर्धा, अलीकडे 'प्रणाम भारत' हा क्रांतिवीरांवर वेगळा एकांकिका लेखक-अभिवाचन-सादरीकरण उपक्रम राबवला गेला, त्यात चंदू होता. (मात्र अंतिम टप्प्यात आजारपणामुळे तो येऊ शकला

नव्हता.) 'चि.सौ.कां. रंगभूमी' या वेगळ्या नाटकाच्या निर्मितीत त्याच्या संशोधनाचा चांगला उपयोग झाला होता.


विनय आपटे म्हणजे त्याचा जणू दुसरा प्राण होता, म्हणून विनय गेल्याची अफवा आल्यावर त्याची अवस्था पायाखालची जमीन सरकल्यासारखी झालेली मी पाहिली होती. पुढे २०१३ साली विनय आपटे हे जग सोडून गेला. चंदू एकटा पडला, पण आपला जीव कुटुंब, नाटक-साहित्यात रमवत होता. वय हे कधीच अडचणीचे नव्हते, म्हणून तर त्याला नवनवे उपक्रम करावेसे वाटायचे, आजच्या एकांकिका करणाऱ्या मुलांमध्ये मिसळावेसे वाटत होते. रवी मिश्रा ह्यांच्या हिंदी एकांकिकास्पर्धांना परीक्षक राहणे त्याच्या आवडीचे, म्हणून तर कित्येक वर्षांच्या गॅपनंतर त्याने 'वर खाली-दोन पाय' या हृषीकेश कोळीच्या ('पुरुष' नाटकावरील) नाटकात भूमिकाही केली होती. कोणतीही स्पर्धा असो, की वेगळे नाटक किंवा स्पर्धेचा निकाल, चंदू माझ्याशी बोलत असे तेव्हा त्याची वैचारिक, थिएट्रिकल समृद्धता डोकावत असे. काही वर्षांपूर्वी आम्ही दोघे नागोठणे येथे परीक्षक म्हणून गेलो होतो. त्या दोन दिवसांत खूप बोललो. पुढे डहाणूकर अल्युमनी, विज्ञान एकांकिकास्पर्धा अशा ठिकाणी आवर्जून भेटत होतो. आता मात्र लॉक-डाऊन संपला तरी हा आपला गुरू-कम मित्र आपल्याला भेटणार नाही, ह्याची रुखरुख वाटते. आता फोन नाही की नवीन काय लिहिलेस, कुठे परीक्षक आहेस अशी विचारणा करणारा चंदू असणार नाही. कारण तो गेला आहे आपल्या जिवाभावाच्या मित्राच्या भेटीला. कुठे म्हणजे? जिथे विनय, तिथेच चंदू! नाही का!

गुरुऋणातून कधी मुक्त होता येत नाही. स्क्रिप्ट रिपेअरिंग करणारा माझा एक मार्गदर्शक निघून गेला आहे. हातात एक अर्पणपत्रिका आहे, माझ्या एकांकिकेच्या पुस्तकाची - 'उंच उंच झुला!' जी मी माझ्या पहिल्या गाजलेल्या एकांकिकेच्या दिग्दर्शकाला लिहिलेली आहे ती अशी- 'चंदू, इतकेच नाही, पण अनेक आठवणींचे, अनुभवांचे शब्द-बोल आहेत. जेव्हा जेव्हा उत्तम साहित्य दिसेल, तेव्हा अभिवाचन करण्याचा विचार आला की तूच समोर दिसशील. नट, दिग्दर्शक, कुटुंबवत्सल माणूस आणि अभिवाचक - चंद्रकांत मेहेंदळे!'

**- राजीव जोशी**
भ्रमणध्वनी : ९३२२२४१३१३
rmjoshi52@yahoo.co.in


ग्रंथाली

जय भीम लाल सलाम
संपादन
**संदीप रामराव काळे**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

स्वप्नपंखांना आकाश थिटे
**शिमॉन पेरेस**
अनुवाद : **मेधा आलकरी**




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**डॉ. निर्मोही फडके**

# भाषाशुद्धीचा निष्ठावंत

''**भा**षा प्रवाही असते आणि ती तशीच असली पाहिजे, ह्याच्याशी मीही संपूर्ण सहमत आहे. परंतु त्या प्रवाहाला योग्य दिशा, योग्य मार्ग आणि काही शिस्त असली पाहिजे; असेही मला मनापासून वाटते.... कुठेही तो प्रवाह 'पतित' होऊ नये ह्यासाठी दक्ष राहावेच लागते.''

स्वतःच्या या मतांशी, 'मराठी लेखन-कोश'कार अरुण फडकेसर शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले. विशाल होत जाणाऱ्या मराठी भाषेच्या नदीपात्रामध्ये स्वतःला त्यांनी झोकून दिले होते. त्यांचे हे असे झोकून देणे मात्र अतिशय डोळस आणि अभ्यासपूर्ण होते.

ठाण्यातील वडिलोपार्जित मुद्रण-व्यवसाय आणि आधुनिक तंत्रज्ञानानुसार अक्षरजुळणी करण्याचा नवा व्यवसाय या कामांची गरज म्हणून फडकेसरांनी मराठी भाषेच्या व्याकरणाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यास सुरुवात केली. या विषयातील जाणकार व्यक्तींशी चर्चा, विविध शब्दार्थकोश, उपलब्ध व्याकरणविषयक पुस्तके यांचा अभ्यास करत असताना त्यांच्या जिज्ञासू बुद्धीला अनेक शंकांची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत.

एखाद्या शब्दाचे मूळ रूप आणि व्याकरणातील विविध संकल्पनांनुसार बदलत जाणारी त्याची विविध रूपे या संदर्भातील 'शुद्धलेखनकोश' मराठी भाषेत उपलब्ध नाही, ही उणीव त्यांना जाणवली. येथे एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते, ती म्हणजे 'शुद्ध आणि अशुद्ध भाषा' या संकल्पनांविषयी फडकेसरांनी ठामपणे मांडलेले मुद्दे.

> आधुनिक शहरांमध्ये, निमशहरी गावांमध्ये, व्यवहारात आणि शालेय-महाविद्यालयीन पातळीवरील अभ्यासक्रमांत मराठी भाषेची परिस्थिती दिवसेंदिवस चिंताजनक होत असल्याचे चित्र मागील पंधरा-वीस वर्षांत तयार होत असताना अरुण फडकेसरांनी मात्र मराठी प्रमाण-भाषा आणि तिचे लेखन याबद्दलची आपली चळवळ अव्याहत चालूच ठेवली. इतकेच नव्हे तर या चळवळीतून भाषाविषयक जागृती करणारे अनेक कार्यकर्ते तयार केले.

सरांच्या 'शुद्धलेखन मार्गप्रदीप' या पुस्तकातील प्रस्तावनेत त्यांनी मांडलेले हे विचार त्याचे द्योतक आहेत.

'भाषा ही प्रवाही आणि परिवर्तनशील अशी बाब आहे. ती बोली स्वरूपात असते, तेव्हाही तिच्यात बदल होतच असतात, आणि ती लेखी स्वरूपात येते तेव्हाही तिच्यात बदल होतच असतात. भाषेचे स्वरूप हे नवीन पिढीला शिकवताना ते सर्व ठिकाणी सारखेच शिकवले जाणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे ह्या भाषेतून विविध विषयांचे लेखन ठिकठिकाणच्या लेखकांकडून होणार असते. त्यामुळे ह्या लेखनातही एकसूत्रता असणे आवश्यक असते.

... निरीक्षणांतून आणि विचारमंथनातून त्या भाषेचा काही विशिष्ट स्वभाव किंवा तिची विशिष्ट प्रवृत्ती समोर येते आणि मग त्याला अनुसरून तिच्या लेखनाचे काही नियम ठरवले जातात. भविष्यात भाषेत नव्याने येणाऱ्या किंवा तयार केल्या जाणाऱ्या शब्दांचे नियमन करण्यासाठीही हे नियम आवश्यक असतात. ह्या नियमांनुसार किंवा हे नियम पाळून केले जाणारे लेखन म्हणजेच 'शुद्धलेखन' होय.'



**अरुण फडके**

शुद्ध-अशुद्ध भाषा संकल्पनांविषयीचे वाद, शासनाचे निर्णय इत्यादी गोष्टींबद्दलच्या चर्चांमध्ये दिसून येणारा संकुचितपणा, पूर्वग्रहदूषित विचार अशा एकांगी मतांना सरांनी आपल्या संशोधनपर अभ्यासात नेहमीच बाजूला सारले. 'भाषेचे शुद्धलेखन' ही संकल्पना अनेकांगांनी तपासली. त्यांच्या अभ्यासाचे, पुस्तकांचे आणि नंतर सुरू केलेल्या भाषाविषयक चळवळीचे ब्रीदवाक्य होते, 'शुद्धलेखन हा आग्रह न राहता ती सवय झाली पाहिजे.'

२००१ साली फडकेसरांचे 'मराठी लेखन-कोश' हे शुद्धलेखनविषयक पहिले पुस्तक प्रकाशित झाले. हा लेखन-कोश तयार करताना आणि त्यानंतरही इतर पुस्तके तयार करताना सरांनी या क्षेत्रातील अनेक तज्ज्ञांशी चर्चा केली, त्यांची मते जाणून घेऊन त्या मतांची पडताळणी केली.

श्री. पु. भागवत, डॉ. सरोजिनी वैद्य, डॉ. गं. ना. जोगळेकर, संस्कृतपंडित दिवाकर घैसास, जयेंद्र साळगांवकर अशा अनेक ज्येष्ठ भाषा-अभ्यासकांचे मार्गदर्शनही त्यांनी घेतले.

त्यानंतर 'शुद्धलेखन मार्गप्रदीप', बालकांकरता 'सोपेच आहे शुद्धलेखन', 'मला मराठी शिकायचंय', 'I learn English', 'Nursery Rhymes', 'शब्दांचा चकवा' ही पुस्तके; तसेच, अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले, 'शुद्धलेखन ठेवा खिशात' हे पॉकेटबुक, अशी अनेक पुस्तके प्रकाशित झाली. १०,००० मराठी शब्द योग्य पद्धतीने कसे लिहावेत, हे या पॉकेटबुकमधून कळते. वापरण्यास आणि कुठेही काम करताना जवळ बाळगण्यास उपयुक्त असे हे पॉकेटबुक, आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रवाहात नंतर मोबाइल ॲपच्या स्वरूपातही आले आणि अधिकच लोकप्रिय झाले.

लेखन-कोश प्रकाशित केल्यावर मराठी शब्दरचना, वाक्यरचना, प्रमाण-बोली यांच्यातील फरक, तो जाणून घेण्याची आवश्यकता या विचारांचा प्रसार व्हावा असे सरांना वाटले. याकरता मराठी शुद्धलेखनासंदर्भात असलेली भीती, दुर्लक्षित वृत्ती, गैरसमज, प्रश्न, शंका इत्यादी दूर करण्याकरता स्वतःच्या संशोधनाच्या आणि अभ्यासाच्या मदतीने त्यांनी एक ठरावीक अभ्यासक्रम तयार करून कार्यशाळा घेण्यास सुरुवात केली.

महाराष्ट्रभर अनेक ठिकाणी त्यांनी या कार्यशाळा, अभ्यासवर्ग, व्याख्याने, चर्चासत्रे घेतली. विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, लेखक, मुद्रितशोधक, संपादक, अभ्यासक, संशोधक इत्यादी मराठी भाषेच्या अभ्यासाशी, नित्याच्या वापराशी, कामकाजाशी संबंधित अनेक लोकांना या निमित्ताने त्यांनी प्रशिक्षण दिले. त्यांच्या शंका दूर केल्या. गैरसमज दूर केले. भाषेच्या योग्य वापराबाबत त्यांना सजग बनवले. त्यांची दृष्टी विस्तारित केली.

फडकेसरांच्या कार्यशाळा म्हणजे, एरवी व्याकरणाचा बागुलबुवा वाटणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर विद्यार्थिदशेतून पुढे गेलेल्या अभ्यासकांकरताही आनंदाची पर्वणी असे. हसतखेळत व्याकरण किंवा मुद्रितशोधन यांचा अभ्यास असे त्या वर्गांचे स्वरूप असे. दिवसभराचे सात-साडेसात तास कधी संपत हे लक्षातही येत नसे. वर्षानुवर्षे वापरात असलेले कितीतरी शब्द अर्थाच्या आणि लेखनाच्या दृष्टीनेही का चुकीचे आहेत, हे सरांच्या शिकवण्यातून कळले, की विद्यार्थ्यांना धक्के बसत. सरांकरता मुद्रितशोधनाचे किंवा संपादनाचे काम करणे म्हणजे अभ्यासाचा कस लागणे हे जितके खरे तितकेच भाषेविषयी कितीतरी जास्त काही समजून घेणे अधिक खरे ठरत असे.

मराठी भाषेतील शब्दांची व्युत्पत्ती, प्रमाण-भाषेतील शब्दलेखनाचे नियम, वाक्यरचनेचे नियम इत्यादीबाबतचे शंकानिरसन सरांकडून करून घेताना केवळ तो एक शब्द किंवा वाक्यच नव्हे तर त्याच्या संदर्भाने येणारे अनेक विषय सर सहज सांगत असत. प्रश्नकर्त्याच्या शंकेचे अभ्यासपूर्ण पद्धतीने संपूर्ण निरसन करण्याची हातोटी सरांकडे होती.

आधुनिक शहरांमध्ये, निमशहरी गावांमध्ये, व्यवहारात आणि शालेय-महाविद्यालयीन पातळीवरील अभ्यासक्रमांत मराठी भाषेची

परिस्थिती दिवसेंदिवस चिंताजनक होत असल्याचे चित्र मागील पंधरा-वीस वर्षांत तयार होत असताना अरुण फडकेसरांनी मात्र मराठी प्रमाण-भाषा आणि तिचे लेखन याबद्दलची आपली चळवळ अव्याहत चालूच ठेवली. इतकेच नव्हे तर या चळवळीतून भाषाविषयक जागृती करणारे अनेक कार्यकर्ते तयार केले.

फडकेसरांनी आखलेल्या 'मुद्रितशोधन आणि संपादनकौशल्य' या ४५ तासांच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला मुंबई विद्यापीठाने रीतसर मान्यता दिली. शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर मराठी भाषा शिकवणारे शिक्षक, प्राध्यापक यांनाही काही व्याकरण-लेखनविषयक संकल्पना स्पष्ट झालेल्या नसतात, त्यांनाही अनेक शंका असतात, अशा शिक्षण क्षेत्रांतील जिज्ञासू मंडळींकरताही सरांनी एक अभ्यासक्रम तयार करून त्याचे अभ्यासवर्ग महाराष्ट्रात ठिकठिकाणी घेतले.

महाराष्ट्रात बोली भाषांचे प्राबल्य आहे. महत्त्वही आहे. या बोलींचे साहित्यिक योगदानही मोठे आहे. दर बारा मैलांवर इथल्या भाषेत बदल होताना दिसतात. प्रमाण-भाषा आणि बोली स्वरूपातील भाषा हे फरक शालेय पातळीच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावेत, भाषेच्या या वेगवेगळ्या रूपांचे सौंदर्य, महत्त्व तसेच वेगवेगळ्या ठिकाणी, अनेक कारणांकरता तिच्यामध्ये होत जाणारा बदल, त्याची अपरिहार्यता त्यांना कळावी याकरता सरांची सतत धडपड चालू होती.

संगणकीय तंत्रज्ञान, महाजाल समजून घेणे, इतर भाषाभगिनींच्या बरोबरीने मराठीलाही त्यामध्ये स्थान मिळवून देणे ही नव्या काळाची गरज आहे, हे सरांनी ओळखले आणि त्याअनुषंगाने कामेही चालू केली. इंग्रजी स्पेल-चेकप्रमाणे मराठी स्पेल-चेक तयार करण्याचे काम त्यांनी सुरू केले. संगणकीय मराठी फॉन्टची निर्मिती, विश्वकोशाकरता कार्यशाळा, भाषाविषयक अनेक शासकीय समित्यांच्या, मंडळांच्या कार्यामध्ये सहभाग अशा विविध पातळ्यांवर त्यांनी आपल्या कामाचे, अनुभवांचे योगदान दिले.

मराठी भाषेप्रमाणेच संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषांच्या व्याकरणाचाही सरांनी सखोल अभ्यास केला. या दोन्ही भाषांचा मराठीवर झालेला परिणाम लक्षात घेऊन त्यांनी मराठीच्या प्रकृति-धर्माप्रमाणे शब्दलेखनात काही बदल सुचवले. महामंडळाच्या चर्चासत्रांमध्ये भाषाअभ्यासकांच्या विचारांनुसार लेखनाचे काही नवे नियम आणावेत, असा त्यांचा आग्रह होता. त्यानुसारही नंतर काही बदल झाले.

'संस्कृतप्रमाणेच मराठी हीसुद्धा सामर्थ्यवान भाषा आहे. तिला स्वतःची अशी एक लेखनप्रकृती आहे. ती लेखनप्रकृती अतिशय सोपी असूनही सूत्रबद्ध आहे. त्यामुळे मराठी लेखनाचे नियम मराठीच्या ह्या लेखनप्रकृतीनुसार झाले, तर नियमांची संख्या थोडी असूनही ते सर्व शब्दांच्या लेखनाचे नियमन करतील, सर्व नियम अतिशय सोपे असतील, त्यामुळे ते सहज शिकवता येतील, सहज समजतील, सहज लक्षात राहतील, आणि त्यामुळे सहज पाळलेही जातील.' असे सरांचे ठाम मत होते.

ऑक्सफर्ड ॲडव्हान्स्ड लर्नर्स डिक्शनरीमध्येही काही चुकाही सरांनी शोधून काढल्या आणि त्यांना त्यासंदर्भात कळवले. सरांच्या सूचनांनुसार त्या डिक्शनरीमध्येही काही शब्दांच्या बाबतीत बदल केले गेले.

मराठी भाषेचा, शाळांचा, शिक्षणाचा विषय ऐरणीवर आणून त्याबाबत वर्तमानपत्रांमधून किंवा सोशल मीडियावर होणाऱ्या तथाकथित गदारोळाला, भाषाशुद्धता या विषयाबाबत प्रचलित झालेल्या संकुचित विचारसरणीला सरांनी स्वतःच्या अभ्यासाने, संशोधनाने आणि प्रत्यक्ष कृतीने उत्तर दिले.

गेल्या वीस-बावीस वर्षांमध्ये मराठी भाषाविषयक जागृतीची चळवळ चालू करून ती अधिकाधिक मराठीप्रेमींपर्यंत पोहोचवणारे अरुण फडकेसर अतिशय संयमित, पारदर्शी, ऋजू परंतु निग्रही स्वभावाचे होते. भाषाविषयक अभ्यास करताना त्यांनी सर्व प्रकारच्या शक्यता, टीका, विचारप्रणाली यांचाही अभ्यास केला. भाषाप्रेमाची भाबडी पट्टी डोळ्यांवर लावून स्वतःचे दुराग्रही मत आंधळेपणाने केवळ स्वतःचे म्हणून दुसऱ्यावर लादणे त्यांना मान्य नव्हते. एखाद्या मुद्द्यावर दुसऱ्या कुणी तितक्याच अभ्यासपूर्ण पद्धतीने बोलले आणि ते भाषाविषयक तत्त्वांच्या कसोटीवरही योग्य ठरले, तर ते स्वीकारण्याचा मोठेपणाही सरांच्या स्वभावात आणि विचारांत होता.

मातृभाषेबद्दल डोळस स्वाभिमान असावा, आंधळा दुरभिमान नव्हे, हे आपले मत त्यांनी स्वतःच्या व्यासंगी वृत्तीतून, कृतीतून निर्भीडपणे समाजासमोर ठेवले.

आजच्या प्रसारमाध्यमांच्या वाढत्या जंजाळातही स्वतःला सामावून घेताना सरांनी लोकप्रशिक्षणाचा ध्यास सोडला नाही. या माध्यमाचा वापर केवळ आपल्या या ध्येयाकरता कसा करता येईल, याचाच विचार केला.

भाषाविषयक कामाला शालेय पातळीच्या विद्यार्थ्यांपासून सुरुवात करावी असे ते सांगत. या संस्कारक्षम वयात ही मुले प्रमाण-भाषा, बोली, साहित्याची भाषा इत्यादी लवकर समजून घेऊ शकतात, असे त्यांचे ठाम मत होते. त्यानुसार सरांनी काम केलेच, शिवाय त्याकरता अनेक तरुण प्रशिक्षकही तयार केले. स्वतः मात्र कायम अभ्यासकाच्या भूमिकेत राहिले. कुणाशीही वैचारिक, तात्त्विक मतभेद झाले तरी त्याचा आकस न बाळगता स्नेह जपण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

संस्कृत भाषेमधून मराठीमध्ये आलेले शब्द, देशी मराठी शब्द, परकीय भाषांमधून मराठीमध्ये आलेले शब्द, बोली रूपांमधील व्यवहारात प्रचलित असलेले शब्द, नव्या विज्ञान-तंत्रज्ञानातील संकल्पनांकरता तयार केलेले शब्द इत्यादींचे लेखन, त्यांचे सामान्यरूप, वचन, जोडाक्षर, शब्दसिद्धी, विरामचिह्ने, वाक्यरचना इत्यादी, शब्दरचनेच्या अशा अनेक अंगांचा अभ्यास करून सरांनी आपल्या पुस्तकांतून आणि आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले.

''आजच्या काळात ज्या भाषा केवळ 'संपर्काचे साधन' एवढ्या उद्दिष्टापुरत्या राहिलेल्या नसून, ज्ञाननिर्मिती आणि ज्ञानप्रसार ह्यांचे एक प्रमुख साधन म्हणून त्यांचा वापर केला जातो, अशा प्रगत भाषांच्या बाबतीत एवढा संकुचित दृष्टिकोन बाळगून चालत नाही, चालणार नाही. मराठी ही अशा प्रगत भाषांपैकी एक आहे हे लक्षात

घेतले पाहिजे.

...शुद्धलेखन म्हणजे केवळ ऱ्हस्व-दीर्घ नव्हे. ते चुकले तरी 'संदर्भाने' अर्थ समजतो असे बहुतेकांना वाटते. अनेक बाबींचा अंतर्भाव शुद्धलेखनात होतो. प्रत्येकाने स्वतःच्याच मर्जीप्रमाणे आणि ज्ञानाप्रमाणे लेखन केले, तर अनेक शब्दांचे अर्थ बदलतील. 'केवळ संदर्भाने' ह्या सगळ्याचा योग्य तो अर्थ लावत बसायची वेळ आली तर 'संपर्क' हे किमान उद्दिष्ट साध्य होणेही दुर्लभ होईल.'' अशी प्रस्तावना करून त्यांनी 'मार्गप्रदीप'मध्ये भाषाविषयक संकल्पनांची, व्याकरणविषयक नियमांची अधिक सोप्या पद्धतीने मांडणी केली.

सरांनी केलेल्या भाषाविषयक विविधांगी कार्याबद्दल लिहू तेवढे थोडेच आहे. ध्येयासक्त असणे आणि जगणे म्हणजे काय याचे अरुण फडकेसर हे मूर्तिमंत उदाहरण होते. वर्तमान परिस्थितीमध्ये अशी ध्येयासक्त माणसे असणे, बघणे, त्यांना अनुभवणे हे दुर्मीळ होत चालले आहे. गेल्या वीस-बावीस वर्षांत आलेल्या जागतिकीकरणाच्या लाटेत मराठी भाषेला ज्ञानभाषा करण्याच्या दृष्टीने अथक परिश्रम करणारे फडकेसर, सत्कार-समारंभ, पदव्या-पुरस्कार इत्यादींपासून नेहमीच दूर राहिले. (कदाचित काही वेळा त्यांना तसे दूर ठेवले गेले.) परंतु सरांना त्याच्याबद्दल कधीच खंत वाटली नाही.

सतत कार्यरत राहणारा हा भाषा-अभ्यासक मागील अडीच-तीन वर्षे, कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराशीही निर्भयपणे लढला. उपचारादरम्यान आणि उपचारांनंतरही त्यांच्या डोक्यात आणि मनात, मराठी भाषाविषयक नव्या योजनांचेच विचार कायम चालू असत. फोनवर, सोशल मीडियावर किंवा प्रत्यक्ष भेटीतही ते सतत नवे काही सुचवत.

सरांच्या ध्येयवेड्या आयुष्यात आणि आजारपणाच्या दिवसांत त्यांच्या पत्नी वृषाली फडकेमॅडम आणि कुटुंबातील त्यांचे इतर प्रियजन यांची त्यांना कायम साथ मिळत राहिली.

अनेक महिन्यांच्या उपचारांनंतर प्रकृती सुधारल्याने, २०२० च्या जानेवारी महिन्यापासून सरांनी आपले अभ्यासवर्ग घेण्यास पुन्हा उत्साहाने सुरुवात केली.

या वर्षी मराठी भाषाविषयक अनेक योजना कार्यान्वित करण्याचा त्यांचा मानस होता. परंतु दुर्दैवाने तसे घडणे नशिबात नव्हते, असे म्हणताना, लिहितानाही लेखणी थबकते.

फडकेसर,

आपल्या मराठी भाषेकडे चिंतनशील वृत्तीने आणि डोळस दृष्टीने कसे बघावे, तिला अभ्यासावे याची प्रेरणा आम्हा मराठीप्रेमींना, अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना तुम्ही दिलीत.

सर, आणखी खूप काम करणे बाकी होते.

आमच्या भाषा-अभ्यासातून, भाषाप्रेमातून, लेखनातून तुम्ही आमच्यात असणारच आहात.


विनम्र श्रद्धांजली!

**– डॉ. निर्मोही फडके**
भ्रमणध्वनी : ९९२०१४६७११
nirmohiphadke@gmail.com

ग्रंथाली

वाटेवरले दिवे

**नीला उल्हास चांदोरकर**




**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रुपये**

अस्पृश्य देवता

**आणि निवडक कथा**

**डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रुपये**



मीना नेरूरकर

# अधुरी स्वप्ने आणि दुर्दम्य आशावाद साई गुंडेवार

**म**ला साई गुंडेवारच्या आजाराबद्दल समजले तेव्हाच कळले होते की हा आजार असाध्य आहे. फक्त ती वाईट बातमी कधी येते त्याची वाट पाहत राहायची होती. १० मे २०२० रोजी, रविवारी, मदर्स डेला ती बातमी आली. 'अ डॉट कॉम मॉम' या सिनेमातल्या माझ्या मुलाचा- साईचा- या जगातला रहिवास संपला होता.

मी फेसबुकवरच्या पोस्टमध्ये आमच्या 'अ डॉट कॉम मॉम' या सिनेमातले दोघांचे पोस्टर व मी साईला कॅलिफोर्नियातील हॉस्पिटलमध्ये भेटायला गेले होते तेव्हाचा फोटो, असे दोन फोटो टाकले होते. साईचा हसतानाचा तो शेवटचा फोटो होता. त्यानंतरच्या फोटोमध्ये त्याच्या देखण्या चेहऱ्यावरचे निर्मळ हसू पार निघून गेले होते. औषधांमुळे चेहऱ्यावर प्रचंड सूज येऊन ओळखू येणार नाही इतपत चेहरा बदलला होता. त्या सुजल्या ओठात गालात त्याचे हसू केविलवाणे होत कुठेतरी दबून गेले होते. मला आमच्या पहिल्या भेटीपासूनचा सगळा इतिहास आठवला.

> साई गुंडेवार यांनी एम टीव्हीच्या स्प्लिट्स व्हिला (पर्व ४), स्टार प्लसवरील सर्व्हायव्हर; तसेच अमेरिकेतील लोकप्रिय एसडब्लूएटी, द ऑरव्हिले, द मार्स्र कॉन्सिपरसी.. अशा मालिकांमध्ये महत्त्वाच्या भूमिका केल्या. हॉलिवूडच्या काही चित्रपट व लघुपटांमध्येही भूमिका केल्या. 'रॉक ऑन', 'पप्पू कान्ट डान्स साला' आदी हिंदी चित्रपटांत काम केले. आपले मराठीपण समजावे यासाठी त्यांनी डॉ. मीना नेरूरकर यांच्या 'ए डॉट कॉम मॉम' या चित्रपटात प्रमुख भूमिका केली. त्याच्या या आठवणी...

आमची उण्यापुऱ्या पाच वर्षांची ओळख. २०१५ साली मी अमेरिकेतला पहिला मराठी सिनेमा 'अ डॉट कॉम मॉम' करायचा ठरवला तेव्हा माझ्या मुलाच्या मध्यवर्ती भूमिकेसाठी तरुण नट शोधत होते. ज्याची पर्सनॅलिटी, देहबोली, इंग्रजी भाषेचे उच्चार अमेरिकेच्या कॉर्पोरेट वर्ल्डमध्ये शोभतील असा नट पाहिजे होता. खूप जणांच्या ऑडिशन घेतल्या. शेवटी, फक्त हिंदी सिनेमात काम करणारा अशी शिफारस असलेला, साईप्रसाद गुंडेवार नावाचा कलाकार आला. नावावरून मला मराठी न वाटता कोणीतरी कानडी माणूस असेल असे वाटले. पण त्याची ऑडिशन सगळ्यात उत्तम झाली. अर्थात त्याचीच निवड झाली.

नंतर कळले की गुंडेवार हे नागपूरचे लोक. साई वांद्र्यात वाढला व तिथल्या शाळेत गेला. शाळेनंतर ऑस्ट्रेलियात शिकायला गेला. लॉस एंजेलिसच्या फिल्म स्कूलमध्ये अक्टिंग शिकला व बॉलिवूडमध्ये काम करायची आशा बाळगून भारतात परत आला. मे २०१५ च्या आमच्या सिनेमाच्या भारतातल्या स्केड्युलच्या वेळी त्याचे अमेरिकेतल्या भारतीय मुलीशी अमेरिकेतच लग्न होणार होते. म्हणून तो अमेरिकेत होता, त्यामुळे तो विशेष कोणाला भेटलाच नाही. पण, जुलैपासून सुरू होणाऱ्या अमेरिकेतल्या स्केड्युलला तो मोकळा होता.

ठरल्याप्रमाणे भारतातून सिनेमाची टीम जूनमध्ये अमेरिकेला

येणार होती. पण नेमके त्याच वर्षी जगातल्या अमेरिकन एम्बसीमध्ये कम्प्युटरचे प्रॉब्लेम निर्माण झाले व व्हिसा प्रोसेस ऑगस्टपर्यंत लांबली. तेवढे थांबणे आम्हाला शक्य नव्हते. अमेरिकेतल्या कलाकारांना जुलैच्या अखेरीपर्यंत शूटिंग उरकेल असा शब्द दिला होता. तसे ते उरकणे भाग होते. अमेरिकेत नवीन टीम उभारून भारतातून केवळ साई, असिस्टंट दिग्दर्शक संदीप पाटील आणि मेकअप डिझायनर या महत्त्वाच्या लोकांना व्हिजीटर व्हिसावर आणायचे ठरले. साईचा पासपोर्ट ऑस्ट्रेलियन असल्यामुळे काहीच प्रॉब्लेम नव्हता. संदीप आणि शरद यांच्याबरोबर जुलैमध्ये साई अमेरिकेत येऊन पोहोचला. त्याला हॉटेलवरून सेटवर आणायला मधुवंती भाट व तेजू बांबुळकर या दोघांची नियुक्ती केली होती. साई हेल्थ फनॅटिक होता. व्हेजिटेरियन होता, व्यायामाचा प्रचंड शौकीन होता. स्वत:च्या आरोग्यासाठी काय करायचे ह्याबद्दलची त्याची स्वत:ची ठाम मते होती. शाकाहारी असल्यामुळे शरीराला पुरेसे प्रोटीन मिळत नाही याची त्याला खंत असायची. प्रोटीन मिळवण्यासाठी तो रोज बारा अंडी खायचा. वीस मिनिटे सूर्यप्रकाशात व्हिटॅमिन डी मिळवण्यासाठी उभा राहायचा व स्नायूशक्ती वाढवण्यासाठी जिमला जाऊन वजने उचलल्याशिवाय तो जगूच शकत नव्हता. तो राहत असलेल्या हॉटेलमध्ये या सोयी नव्हत्या. मग त्याने तेजूच्या मुलाशी सूत जमवून रोज त्याच्या जिमला जायची सोय केली. मधुवंतीवर रोजची बारा अंडी उकडून आणायची जबाबदारी टाकली. कधी जर तेजू सेटवर न्यायला लवकर आली, तर जोवर त्याचे सूर्यस्नान होत नव्हते तोवर तिला बाहेर तिष्ठत उभी ठेवायचा. एकदा अंडी आणायला मधुवंती विसरली तर त्याने तिला शॉटच्या मध्ये आठवण करून दिली होती. त्या दोघींकडून साईच्या हेल्थ फिक्रपणाच्या नवनव्या कहाण्या रोज कळायच्या आणि आमच्या खळखळून हसण्याला नित्य नवे कारण मिळायचे. पण हा विचित्रपणा सोडता साई म्हणजे अगदी गुणी होता. Gentle soul. कधीही आवाज चढवायचा नाही. नेहमी सगळ्यांशी अत्यंत गोड असायचा.



डॉ. मीना नेरूरकर आणि साई गुंडेवार

शूटिंगनंतर साई भारतात परतला. मग त्याची भेट डबिंगसाठी आराधना साऊंड स्टुडिओमध्ये झाली. डबिंग, एडिटिंग झाले. आमची फिल्म तयार झाली. तरीही साईला अजून दुसऱ्या सिनेमात मनासारखा ब्रेक मिळाला नव्हता.

२०१६ जानेवारीला प्रोड्युसर्सनी काहीतरी कारण काढून उरलेले पैसे द्यायला नकार दिला. आता माझ्यासमोर प्रश्न निर्माण झाला होता, फिल्म डब्यात टाकायची की स्वत: रिलीज करायची? फिल्म खरीच कशी झाली आहे हे जाणून घ्यायला मी प्रीव्ह्यू करायला लागले. साईचा मित्रपरिवार मोठा. त्याचे खूप मित्र फिल्म बघून तारीफ करून गेले. त्यातल्याच एका मित्राने– अक्षय बर्दापूरकरने – आमच्या फिल्मची गोवा फिल्म फेस्टिव्हलच्या शेट्येबंधूंकडे तारीफ केली. ९ जून २०१६ रोजी आमची फिल्म ९व्या गोवा मराठी फिल्म फेस्टिव्हलमध्ये सादर झाली. साई, मी व फिल्मची हिरॉईन अपूर्वा भालेराव असे तिघे जण गेलो होतो. आमच्या फिल्मला प्रचंड प्रतिसाद मिळाला. आदल्या दिवशी संजय लीला भन्साळीच्या 'लाल इश्क'ला प्रेक्षकांनी नाकारले होते आणि त्याच प्रेक्षकांनी दुसऱ्या दिवशी आमच्यासारख्या नवागतांच्या फिल्मला उचलून धरले होते. आम्ही सगळेच खुश झालो होतो विशेषत: साई. ह्या फिल्मच्या यशामुळे त्याच्या करिअरला चालना मिळणार होती. त्या रात्री साई त्याच्या मित्रांबरोबर पार्टीला गेला, पण तिथे पाय घसरून पडून पाय फ्रॅक्चर झाला. गुडघ्यापर्यंत प्लास्टर घालावे लागले. मात्र त्या स्थितीतही साईने व्यायाम करणे थांबवले नव्हते!

खरे तर फिल्म भारतात रिलीज करायला मी उदासीन होते. फिल्म लाइनमध्ये माझी ओळख नव्हती. तिथले पॉलिटिक्स मला जमणार नव्हते. माझा टारगेट ऑडियन्स अमेरिकेतला होता. पण गोवा फिल्म फेस्टिव्हलच्या यशाने मीही हुरळून गेले आणि भारतात फिल्म प्रसारित करायचे ठरवले.

पत्रकारपरिषदा सुरू झाल्या. साईला पाहून पुणे, कोल्हापूर इथल्या पत्रकारांनी मला विचारले की आमच्या भारतात फिल्मचा नायक झुल्फेवाला असतो. हा टकल्या हीरो तुम्हाला का घ्यावासा वाटला? मला तत्काळ साईला त्याच्या गुणवत्तेइतके यश भारतात का मिळाले नाही त्याचा उलगडा झाला. त्याचा लूक अमेरिकेत पसंदीदा

होता, पण भारतात पचनी पडणारा नव्हता.

फिल्म रिलीजची ३० सप्टेंबर ही तारीख गहन चूक ठरली. कारण त्याच दिवशी 'धोनी' ही भारतीय क्रिकेट कॅप्टनची हिंदी फिल्म रिलीज झाली.

आमच्याकडून पैसे घेऊनही आम्हाला चांगला सल्ला दिला गेला नव्हता. गिरगाव ते दादर या मराठी बेल्टमध्ये फक्त प्लाझाला बाराचा शो मिळाला. बाकीचे सर्व उपनगरांतत होते. माझे आयुष्य शिवाजी पार्कला गेले, पण तिथल्या सिटीलाइट थिएटरला कबूल करूनही फिल्म रिलीज झाली नव्हती. मी अमेय खोपकरांनाही विनंती केली. पण काहीच उपयोग झाला नाही. अतोनात पैसे, वेळ, आशा मातीमोल झाल्या. साईची स्वप्ने धुळीला मिळाली. खूप आशा लावून बसला होता तो या रिलीजवर.

मी परत अमेरिकेला गेल्यावर संपूर्ण अमेरिकाभर दौरा करून अनेक शहरांत फिल्म दाखवली. सुपरडुपर रिस्पॉन्स आला. अशाच एका स्क्रीनिंगला फिल्म बघून अत्यंत खुश झालेल्या एका गुजराती मित्राने सोनी वर्ल्ड हेडक्वार्टर्समधल्या व्हाइस प्रेसिडेंटशी संधान बांधून दिले. मी त्या व्हीपीला फिल्मची डीव्हीडी पाठवली. नंतर लॉस एंजेलिसच्या कल्चर सिटीच्या ऑफिसमध्ये त्याला भेटायला गेल्यावर तो म्हणाला फिल्म मला खूपच आवडली. तुझी फिल्म क्रॉस कल्चरल कॉमेडी या जॉनरमध्ये मोडते. उत्तम प्रॉडक्शन व्हॅल्यू आहे. बघताना माझी बायको आणि मी खूप हसत होतो. पण सोनीकडे इतक्या फिल्म येतात की तुला नक्की उत्तर द्यायला दोन-तीन वर्षे जातील. त्याऐवजी दर नोव्हेंबरमध्ये सांता मोनिकाला AFM अमेरिकन फिल्म मार्केट भरते तिथे जाऊन तू ही फिल्म पिच कर. नक्की तुला चांगला डिस्ट्रिब्युटर मिळेल व फिल्म लवकर बाहेर येईल.

त्याचे ऐकून नोव्हेंबरला AFM मध्ये दीडशे फिल्म डिस्ट्रिब्युटरना फिल्म पिच केली. मुलगी दाखवण्यासाठी टाचा घासण्यासारखाच हा प्रकार. पण सोनीच्या व्हीपीचे बोलणे खरे ठरले. AFM मध्ये मला दहा डिस्ट्रिब्युटरकडून कॉन्ट्रॅक्ट मिळाली. त्यातला एक डिस्ट्रिब्युटर मी नक्की केला. सगळ्या टीमला आपली फिल्म हॉलिवूड डिस्ट्रिब्युटरने घेतली ही खूशखबर इमेल केली.

२०१८ च्या जानेवारीमध्ये मला साईचा लॉस एंजेलिसहून फोन आला होता. तो तिथे आला होता. हॉलिवूड डिस्ट्रिब्युटरने फिल्म घेतली या गोष्टीचा त्याला अत्यानंद झाला होता. इतक्या खटपटी करून फिल्म हॉलिवूडपर्यंत पोचवली याबद्दल त्याने मला अनेकदा धन्यवाद दिले. आता आपले करिअर अमेरिकेतच आहे अशी त्याला खात्री वाटत होती. त्याला खरेच खूप चांगल्या ऑडिशन्स मिळायला लागल्या. Happy Days were here again.

पण २०१८च्या नोव्हेंबरमध्ये साईला कसलातरी विचित्र वास यायला लागला. काही केल्या तो वास त्याची पाठ सोडत नव्हता. MRI मध्ये काही दिसले नाही. त्यानंतर दिवाळीनिमित्त साई भारतात गेला. तिथेही MRI काढला. त्यातही काही निघाले नाही. वास का येतोय हे कळत नव्हते. परत अमेरिकेला आल्यावर साईचे काम जोरात चालू झाले. फेब्रुवारीत एके दिवशी तो ऑडिशनला जायला निघाला. एकाएकी त्याचे डोके प्रचंड दुखू लागले. दोन तास आराम करूनही फरक पडला नाही. ऑडिशन कॅन्सल करून तो झोपून राहिला. संध्याकाळपर्यंत बरे व्हायचे लक्षण दिसेना. शेवटी त्याला हॉस्पिटलमध्ये नेले. तेथे त्याला फिट आली. ताबडतोब MRI केला. त्यात ६ सें.मी.चा ट्युमर दिसला. आधीच्या दोन MRI मध्ये काही दिसले नव्हते आणि एकाएकी सहा सें.मी.चा गोळा? २२ फेब्रुवारीला सर्जरी झाली व ग्लीयोब्लास्टोमाचे निदान आले. अत्यंत वाईट कॅन्सर. ज्यातून वाचणे कठीण.

साईने मला ऑपरेशन झाल्यावर हॉस्पिटलमधूनच फोन केला व सगळी हकिगत कळवली. मी त्याला लगेच भेटायला गेले. तो अजूनही, बरा झाल्यावर ही फिल्म करूया ती फिल्म करूया अशा गोष्टी करत होता. पण मला डायग्नोसिस माहीत असल्यामुळे त्याच्या बोलण्यातला फोलपणा कळत होता. साईने मला मराठी जेवण करून द्या ना अशी विनंती केली, कारण त्याची बायको गुजराती होती. मी त्याच्या बायकोबरोबर घरी जाऊन वरण-भात, बटाट्याची भाजी, काकडीची कोशिंबीर असे साग्रसंगीत जेवण करून हॉस्पिटलमध्ये नेले. तो म्हणाला, मीनाताई, तुम्ही सिनेमात माझी आई होताच, पण अजूनही आईच आहात. मला प्लीज भरवा ना. त्याच्या दोन्ही हातांना ट्यूब्ज लावल्यामुळे तो खाऊ शकत नव्हता. मी त्याला चमच्याने भरवले. अगदी तृप्त होऊन त्याने बायकोला मराठी जेवणाचे गुणगान केले. मला बघून त्याचे बोलणे वाढले होते. त्याच्या डोक्यातून इतक्या नव्या आयडिया निघत होत्या की तो दमला होता. माझे तेथे असणे त्याला त्रास देत होते. खरे म्हणजे मी दुसऱ्या दिवशीही थांबणार होते, पण त्याची अस्वस्थ बडबड पाहून तेथे न राहता एका मित्राकडे जायचे ठरवले. रात्री परतीची फ्लाईट होती.

त्याआधी हॉस्पिटलमध्ये त्याला भेटायला गेले आणि म्हटले, आता काही दिवस कसल्याही नव्या फिल्मचा विचार करू नकोस. आधी बरा हो.

तीच माझी साईबरोबरची शेवटची भेट. नंतर तो फोनवर, फेसबुकवर फोटो टाकून काहीतरी असंबद्ध बोलत राहायचा. औषधामुळे सूज येऊन शरीर अस्ताव्यस्त झाले होते. त्याचे फोटो बघणे, त्याच्याशी बोलणे कष्टदायक झाले होते.

केवळ अमेरिकेत होता व चांगला इन्शुरन्स होता म्हणून त्याला अद्यावत ट्रीटमेंट मिळाली, पण रोगच इतका वाईट की कसलाच उपयोग झाला नाही. १० मे रोजी त्याने आपल्या अधुऱ्या स्वप्नांसकट आपले डोळे कायमचे मिटले.

RIP Sai. I truly was fortunate to know you.

**– डॉ. मीना नेरूरकर**
nerurkarmeena@yahoo.com
www.meenanerukar.com



**कॅप्टन नीलम इंगळे-लोबो**

# ‘ड्युटी’ला लॉकडाऊन नाही!

> १९ मार्च २०20 या दिवशी एअर इंडिया-९८३ ही फ्लाइट मुंबईहून यूएईच्या रहिवाशांना त्यांच्या देशात नेण्यासाठी आणि परतीची एअर इंडिया-९८४ ही फ्लाइट दुबईतील भारतीयांना मायदेशी आणण्यासाठी निघणार होती. कोरोनाच्या काळातील ही कामगिरी स्वीकारून, त्या फ्लाइटचे सारथ्य कॅप्टन नीलम इंगळे यांनी केले. तो अनुभव त्यांच्याच शब्दांत.

वैमानिकांना रोजच नवनव्या अनुभवांना सामोरे जावे लागते. निरनिराळे एअरपोर्ट, तेथील वेगवेगळे रन-वे, हवामान-वाऱ्यांमध्ये होणारे चढउतार, प्रवाशांची संख्या आणि त्यामुळे बदलणारे विमानाचे वजन, काळानुरूप बदलत जाणारी हवाई वाहतूक, रोज नवे को-पायलट, नवे केबिन सहकारी असा प्रत्येक फ्लाइटगणीक नावीन्याचा सामना असतो. असे येणारे विविध प्रत्यय पायलटचा अनुभव समृद्ध करतात. त्याचबरोबर नवीन आव्हानं प्रगतीच्या नव्या संधीही घेऊन येतात.

काही मराठी लोकांनी दुबईमधून महाराष्ट्रात ‘कोरोना’ आणल्याची बातमी नुकतीच पसरली होती. माझ्या १५ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये मी अगणित वेळा दुबईच्या फ्लाइट्स केल्या. मात्र १९ मार्च २०२०च्या संध्याकाळी कोरोनाच्या प्रादुर्भावांखाली असलेल्या या शहरात जाणाऱ्या माझ्या फ्लाइटचा प्रसंग फार वेगळा होता.

युनायटेड अरब एमिरेट्स (UAE) हा देश हवाई क्षेत्राचा नवा ‘रेशीम मार्ग’. यात युरोप व आशिया खंडांतील सफरींसाठी यू.ए.ई.ची राजधानी दुबई हा सर्वात सोयीस्कर थांबा. युरोपचे सर्वात पूर्वाभिमुख आणि आशियाच्या सर्वात पश्चिमेला असलेल्या ‘दुबई’ या शहरापासून जगाची दोनतृतीयांश लोकसंख्या केवळ आठ तासांच्या हवाई अंतरावर आहे. मध्यपूर्व क्षेत्रातील सर्वात मोठी असणारी ‘एमिरेट्स’ ही एअरलाइन दुबईहून दर आठवड्याला ३६०० पेक्षा जास्त फ्लाइट्सने सहा खंडांतील ८० देशांमधील १५० हून अधिक शहरांना जोडते. भरगच्च हवाई वाहतूक असलेले दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे जगातील सर्वात जास्त आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक असलेल्या मुख्य विमानतळांपैकी एक आहे. व्यापारी मार्गाच्या केंद्रस्थानी असण्याव्यतिरिक्त दुबईने आपल्या ‘ब्लॅक गोल्ड’ म्हणजेच तेलसंपत्तीने विलासी हॉटेले, थीम पार्क, अफाट मोठे शॉपिंग मॉल इत्यादीसारखी फॅमिली फ्रेंडली पर्यटनस्थळे बनवून या शहरास एक मनमोहक ‘हॉलिडे डेस्टिनेशन’ बनवले आहे.

आंतरराष्ट्रीय प्रवासाचे ‘हब’ आणि पर्यटन एवढेच दुबईचे आकर्षण नसून, आखाती देशांतील सर्वात उदारमतवादी व्यवस्था असणाऱ्या या शहरात विनाकर उत्पन्नाचा (टॅक्स फ्री इन्कम) लाभ घेऊन पैसा कमावणे हेसुद्धा आहे. त्यामुळे अनेक देशांतील लोकांनी दुबईत स्थलांतर केले आहे. त्यामध्ये भारतीयांची संख्या दुबईच्या एकूण जनसंख्येच्या सुमारे ३० टक्के आहे.

कोरोना या अतिसूक्ष्म महाराक्षसाचे वाहन विमान झाल्यामुळे विमानांनी गजबजणाऱ्या दुबईस कोविड-१९ने सहज आपल्या अजस्र विळख्यात लपेटून घेतले आहे. तेथील रहिवाशांबरोबर आपल्या भारतीय बांधवांनासुद्धा संकटात टाकले आहे.

१९ मार्च २०२० या दिवशीची आमची एअर इंडिया-९८३ ही फ्लाइट मुंबईहून यूएईच्या रहिवाशांना त्यांच्या देशात नेण्यासाठी आणि परतीची एअर इंडिया-९८४ ही फ्लाइट दुबईतील भारतीयांना मायदेशी आणण्यासाठी निघणार होती.

मुंबई विमानतळाच्या टर्मिनल टू-ला पोहोचताच मी बी.ए. टेस्ट करण्यास गेले. आम्हाला फ्लाइटच्या आधी किंवा नंतर शरीरात अल्कोहोल नसल्याचे सिद्ध करावे लागते. त्या तपासणीसाठी ब्रेथ ॲनालायझर (बी.ए.) टेस्ट करावी लागते. त्यानंतर फ्लाइटसंबंधी संक्षिप्त माहिती, ज्यास आम्ही प्री फ्लाइट ब्रिफिंग म्हणतो, घेण्याकरता आमच्या फ्लाइट डिस्पॅच ऑफिसमध्ये गेले. तेथे माझा को-पायलट सगळी कागदपत्रे न्याहाळत हजर होता. क्षेमकुशल विचारल्यावर तो म्हणाला, ''कॅप्टन, मुंबई, दुबई, शारजाह, मस्कट या सर्व ठिकाणचं 'वेदर' अगदी क्लीअर आहे. दुबईचे 'टॅक्सी वे' वगळता कुठल्याच एअरपोर्टवर ठळक असा बदल नाहीये. लेटेस्ट पॅसेंजर लोड विचारल्यावर, फक्त ४० म्हणाला. १८० प्रवासी क्षमता असलेल्या एअरबस ए-३२० मध्ये आपण केवळ ४० पॅसेंजर घेऊन जाणार! खरंच 'ट्रॅवलिंग लाईट'.''



''ओ! हो! परतीचा पॅक्स लोड विचारलास?''

''हो. फुल फ्लाइट.''

''चला, आपल्या बंद्यांना विमानात खचाखच भरून आणू. अरे हो, डिस्पॅचरला विचार दुबईहून परतल्यावर विमान पुढे कुठल्या फ्लाइटवर जाणार आहे? त्या अनुषंगानं तिथलं स्वस्त असणारं इंधन भरून आणू.''

''कॅप्टन, नो फर्दर मूव्हमेंट म्हणताहेत. विमान मुंबईला परतल्यावर इथेच पार्क होऊन राहणार. पुढे कुठल्याच फ्लाइटवर जाणार नाही.''

''असं का? विमानं अशी जमिनीवर उभी राहणं म्हणजे एअरलाइनचं मोठं नुकसान असतं. बरं ते जाऊ दे. बी.ए. केलंस का? ते विसरणं म्हणजे फौजदारी गुन्हा होतो. माझं काम आहे तुला आठवण करून देण्याचं.''

''हो कॅप्टन. बी.ए. डन. कस्टमचे फॉर्म घेतले आहेत. पासपोर्टसुद्धा स्कॅन करून आलोय.''

''छान. चल १३ टन फ्युएल घेऊन जाऊया.''

''कॅप्टन, १३ का बरं? एविएशनमध्ये १३ आकडा अन्लकी मानला जातो.''

''अरे, तेरा माझा लकी नंबर आहे. चल लेट्स गो.''

सिक्युरिटी चेक करताना कुठेच गर्दी दिसत नव्हती. लपवून ठेवलेली हत्यारे, बॉम्ब बनवण्याचे सामान, अवैध गर्द वगैरे तपासण्यांसाठी सेन्ट्रल इन्डस्ट्रियल सिक्युरिटी फोर्स म्हणजे सी.आय. एस.एफ.चे ऑफिसर प्रत्येकाची अगदी कसून तपासणी करतात. मन लावून 'फ्रिस्क' करणाऱ्या सी.आय.एस.एफ.च्या ऑफिसरला मी मस्करीच्या सुरात म्हटले,

''मॅडम, आज काही नाही हो माझ्याकडे.''

''कॅप्टन, आम्ही रोज बघतो तुम्हाला. तरीसुद्धा आमचं काम आहे तपासणी करणं. प्रत्येकानं आपापलं काम चोख बजावलं की आपोआप सिक्युरिटी निर्माण होते.''

''पण काही म्हणा मॅडम, तुम्ही सी.आय. एस.एफ.वाले फारच शिस्तबद्ध आहात. ड्युटी म्हणजे ड्युटी करता.''

''सगळेच करतात कॅप्टन. देशाचं संकटापासून रक्षण करणं संविधानातील मूलभूत कर्तव्यांपैकी एक आहे. आज कोरोनाशी दोन हात करण्यासाठी शासनानं घालून दिलेल्या गाईडलाइन्सचं प्रत्येक भारतीयानं पालन करणं आवश्यक आहे. पण बऱ्याच प्रवाशांना मी विनामास्क बघते. हे नियमाचं उल्लंघन नाही का? तुम्हीसुद्धा मास्क घालायला हवा.''

''अगदी बरोबर आहे. आमचे मास्क एअरहोस्टेस घेऊन गेल्या आहेत. विमानात गेल्यावर देतील.''

''चला, तुम्हाला सेफ फ्लाइट.''

तिथून कस्टम आणि इमिग्रेशन संपवून आम्ही बोर्डिंग गेटवर पोहोचलो. उड्डाणास ५० मिनिटे उरली होती. मात्र तेथे एकही प्रवासी नजरेस पडला नाही म्हणून मी तिथल्या स्टाफला विचारले,

''बोर्डिंग झालं वाटतं. सगळे पॅसेंजर आले असतील तर लवकर निघू आम्ही.''

''नाही कॅप्टन, अजून बोर्डिंग सुरूच नाही झालं.''

''फक्त ४० जण आहेत. किती वेळ लागतो एवढ्यांना विमानात बसवायला? पटापट संपवा. डिपार्चर टाइमच्या कमीत कमी १० मिनिटं आधी मला विमानाचे सर्व दरवाजे बंद हवेत.''

''शुअर कॅप्टन! शंभर टक्के.'' स्टाफ थम्स अप करत म्हणाला.

मी, आणि को-पायलट कॉकपिटमध्ये गेलो. को-पायलट फ्लाइटसंबंधीचे - रूट, रनवे, वाऱ्याचा वेग आणि दिशा इत्यादी तपशील विमानाच्या कंप्युटरमध्ये भरू लागला. मी टॉर्च घेऊन एअरोब्रिजच्या शिडीने विमानाचे बाह्य निरीक्षण करण्यास खाली उतरले. विमानाला प्रदक्षिणा घालत असताना कार्गो कंपार्टमेंटमध्ये मोठमोठे बॉक्स, डाक, मटण, मिरच्या, कोथिंबिरीसारखा भाजी-पालासुद्धा दुबईस नेण्यास भरला जात होता. मात्र प्रवाशांचे सामान भरल्याचे आढळले नाही. मी एक्स्टीरिअर इन्स्पेक्शन करून कॉकपिटमध्ये परत येताच माझ्या मागोमाग कॅबिन क्रू इन्चार्ज रोमामॅडम आत येत म्हणाल्या,

''गुड इव्हिनिंग कॅप्टन, हाऊ आर यू? काही घेणार तुम्ही- चहा, कॉफी, ऑरेंज ज्यूस? आज अल्कोहोलसुद्धा मिळेऽऽल!''

कामात व्यग्र असलेला को-पायलट सगळे काम सोडून, अगदी दचकून मागे वळत एअरहोस्टेसला म्हणाला,

'' मॅम? अल्कोहोल? आमच्यासाठी? कॉकपिटमध्ये?''



**कॅप्टन रॉबिन लोबो**

''ऑफकोर्स यंग मॅन! हे घे हॅन्ड सॅनिटायझर. यात भरपूऽर अल्कोहोल आहे. याबरोबर एन-९५ मास्क आणि ग्लोव्हजसुद्धा फ्री!''

को-पायलट म्हणाला,

''काय मॅम, कमालीची विनोदबुद्धी आहे तुमची! मला वाटलं खरंच आज आमचे लाड होतील. नॉट फेअर! प्लीज मला ऑरेंज ज्यूस द्याल का? परतीच्या फ्लाइटमध्ये कोणी कोरोना पॉझिटिव्ह असला तर विटॅमिन सी मुळे प्रतिकारशक्तीला थोडा बूस्ट मिळेल.''

''शुअर, आणते. पण डिकरा इम्युनिटी अशी बनत नसते. ती स्ट्राँग करण्यासाठी शरीराला विषाणूंशी सामना करावा लागतो. लसीकरण असंच करतात नाही का?''

''ओके मॅम. दुबईहून येणाऱ्या प्रत्येक पॅसेंजरला मी मिठी मारणार. आमच्या एवरग्रीन रोमामॅडमचा सल्ला आहे, आफ्टर ऑल.''

''एऽ क्रेजी छोकरो छे तू! आसं काही करू नको बावा. माझा सल्लाच घ्यायचाय तर ऐक, कॉकपिटच्या बाहेर अजिबात पाऊल टाकू नको. ते रिस्की आहे फार.''

मी म्हटलं, ''मॅडम, आम्ही तरी कॉकपिटचा दरवाजा बंद करून आत बसू. पण तुम्हाला मात्र लोकांच्या संपर्कात यावं लागणार. तुम्हा सगळ्या कॅबिनकर्मींना जास्त रिस्क आहे''

''हो कॅप्टन. आपला जॉबच असा आहे. मला सांगा, आजपर्यंत एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांनी काय नाही केलं? कर्तव्यनिष्ठेत कधी कसर ठेवली आपण? मला तीस वर्षं झाली इथे. कित्येक धोक्याच्या फ्लाइट केल्यात. एअर लिफ्टवाल्या फ्लाइटमध्ये तर अतिरेक्यांच्या बॉम्बनं 'शॉट डाऊन' होण्याचा धोका असायचा.''

को-पायलट आश्चर्यचकित झाला. तो त्यांना म्हणाला,

''खरंच?''

''अगदी खरं यंग मॅन. तू कधी जन्मलास?''

''१९९० साली.''

''मग १९९० पासूनचा एअर इंडियाचा इतिहास ऐक.'' मला विचारत म्हणाल्या, ''आहे ना वेळ कॅप्टन?''

''पुष्कळ वेळ आहे. सांगा.'' मी कुतूहलाने म्हणाले.

''ओ.के. १९९०मध्ये कुवेतमधून १ लाख ७० हजार भारतीयांचं एअरलिफ्ट केल्याबद्दल एअर इंडियाची गिनिज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. तसेच १९९४ ला येमेनमधून, १९९६ ला यूएईमधून ऑपरेशन ॲम्नेस्टी, १९९७ साली सौदी अरेबियानं हद्दपार केलेल्या ८५०० भारतीयांचं, शिवाय २००३ला इराकमध्ये अडकलेल्या भारतीयांचं कुवेत मार्गे इवॅक्युएशन, त्याच साली सार्सग्रस्त आग्नेय आशियातील देशामधून, २००४ला अंदमान-निकोबार, तामिळनाडू आणि ओरिसा अशा त्सुनामीनं विध्वंस केलेल्या राज्यांमधून २००० लोकांना बाहेर काढलं. २००६ साली सायप्रसमधील देशबांधवांना, तर २०११ मध्ये लिबियाच्या सैनिकी अशांततेतून ३५०० भारतीयांची सुटका केली. ऐका, २०११ साली पुन्हा इजिप्तम धील राजकीय अशांततेतून ११०० भारतीयांची सुटका, २०१३ ला उत्तराखंडच्या पुराच्या महाप्रलयातून लोकांना देहरादूनमार्गे आणलं. २०१४ ला आयएसआयएसनं २३ दिवस कैद केलेल्या केरळच्या ४६ परिचारिकांना इराकी कुर्दीस्तानच्या एरबीलमधून भारतात सुखरूप आणलं. यावर सलमान खानचा 'टायगर जिंदा है' हा सिनेमा आधारला आहे. २०१४ ला जम्मू-काश्मीरच्या पुरातून २७० पर्यटकांची सुटका, २०१५ मध्ये ऑपरेशन राहत अंतर्गत येमेनमधून ५६०० भारतीयांना सोडवलं. त्याच वर्षी ऑपरेशन मैत्रीच्या माध्यमातून भूकंपग्रस्त नेपाळच्या काठमांडूहून भारतीयांना परत आणलं. शिवाय चेन्नई एअरपोर्टवर पावसानं घातलेल्या धुमाकूळातून १००० प्रवाशांची सुटका केली. २०१६ ला अंदमान बेटावर आलेल्या चक्रीवादळातून भारतीयांना वाचवलं. तर २०१८ मध्ये ऑपरेशन सहयोगअंतर्गत केरळमधील पुरात अडकलेल्यांना बाहेर काढून, छोट्या विमानाच्या साहाय्यानं सुरक्षित ठिकाणी पोचवलं. आणि आता २९ फेब्रुवारी २०२० रोजी ऑपरेशन वुहान-कोविड-१९ या जागतिक महामारीग्रस्त चीनमधील वुहान येथून ६४८, जपानमधील २३०, रोममधून २६३, मिलानहून २३०, इराणमधून ३८९ अशा कित्येक भारतीयांना मायदेशी आणलं आहे. अजूनही अशी ऑपरेशन चालूच राहणार आहेत. आजची आपली ही 'शेड्युल' फ्लाइट असली तरी हिचं स्वरूप इव्हॅक्युएशन फ्लाइटसारखंच आहे. मग कॅप्टन, आपण एअर इंडियन का करतो अशा फ्लाइट्स? तुम्हाला तर दोन लहान मुलं आहेत. तरीसुद्धा का बरं स्वीकारली अशी फ्लाईट?''

''मॅडम, कर्तव्याची भावना. गणवेशात एक प्रकारची जादू असते. सीमेवर जवान कशासाठी सर्वस्व अर्पण करतात? आपले पोलिस २४ तास ड्युटी बजावतात. वॉचमन, सफाई कामगार, परिचारिका, मालवाहतूक करणारे ड्रायव्हर इत्यादी अत्यावश्यक सेवा देणारे रात्रंदिवस राबतात. एरवी पायलट आणि डॉक्टरची तुलना व्हायची. पूर्वी म्हटलं जायचं, की विमान उडवताना वैमानिकाचे प्राण पणाला लागतात तसा पेशन्टची शस्त्रक्रिया करताना डॉक्टरच्या जिवाला अजिबात धोका नसतो, पण आज हा समज खोटा ठरत आहे. आज कोरोना वार्डमध्ये असंख्य डॉक्टर सेवा करत आहेत. त्यांना

कर्तव्य बजावल्याचं आत्मिक समाधान मिळतंय.''

''अगदी बरोबर कॅप्टन. मी पुढच्या वर्षी सेवानिवृत्त होत आहे. मी मागच्या तीन दशकांच्या कारकिर्दीचा विचार करते तेव्हा वाटतं आपण आयुष्यात काय मिळवलं? सगळं मनोहारी जग बघितलं, चैन केली, पैसा कमावला. घरच्यांना मनसोक्त विमानप्रवास घडवला. पण, या सर्व गोष्टींपेक्षा ज्यासाठी एअरलाइननं माझी निवड केली होती ते काम मी कर्तव्यनिष्ठेनं केलं. 'ड्युटी' निभावली याचं समाधान मोठं आहे. ते माझ्या आत्म्याला भिडतं आहे. चला कॅप्टन, पॅक्स येण्याची वेळ झाली. यंग मॅन, ऑरेंज ज्यूस घेऊन येते.''

रोमामॅडम भानावर येत कॉकपिटच्या बाहेर गेल्या. क्षणार्धात प्रवाशांचे बोर्डिंग व कार्गोचे लोडिंग करणारे 'कमर्शियल स्टाफ' कॉकपिटमध्ये आले. विमानाचा भार आणि संतुलनाचे हिशोब असणारे पत्रक माझ्याकडे देत म्हणाले, ''कॅप्टन, ऑल डन. डिपार्चरच्या २० मिनिटं आधी सगळं रेडी आहे.''

''अरे व्वा!'' म्हणत मी वेट ॲण्ड बॅलन्स शीट घेतली. त्यात दिलेले विमानाचे वजन, गुरुत्वकेंद्राचे ठिकाण, इंधनाचे परिमाण आदी बाबी कम्प्युटरमध्ये फीड केल्या. त्यावर छापलेली प्रवाशांची संख्या पाहून चकित झाले.

''पॅसेंजर शून्य?''

''हो कॅप्टन. एकाही प्रवाशानं चेक इन केलं नाही.''

''ठीक आहे. हलकंफुलकं विमान घेऊन जाऊ,'' म्हणत सगळ्या कागदपत्रांवर सह्या करून, विमानाचे सर्व दरवाजे बंद करण्याचा आदेश दिला. नेहमी एअर ट्रॅफिक कंट्रोलरला (ए.टी. सी.) पुशबॅक आणि इंजिन सुरू करण्याची परवानगी मागितल्यानंतर संध्याकाळच्या हेवी एअर ट्रॅफिकमुळे कमीत कमी पाऊण तास वाट पाहावी लागते. त्या दिवशी बऱ्याच फ्लाइट रद्द झाल्यामुळे परवानगी मागितल्याबरोबर मिळाली. रन-वेवर एकावेळी एकच विमान टेक ऑफ किंवा लँडिंग करण्यास हजर असू शकते. त्यामुळे जमीनीवरील विमानांची टेक ऑफसाठी आणि हवेतील विमानांची लँडिंगसाठी एकामागे एक रांग लागलेली असते. त्यात आपल्या विमानाची पाळी येण्यासाठी 'डिले' पत्करावा लागतो. त्या दिवशी तोही विलंब सोसावा लागला नाही.

आम्ही मुंबईहून पश्चिमेकडे अरबी समुद्रावरून आखाती प्रदेशाकडे टेक ऑफ केला. फ्लाइट स्थिरस्थावर झाल्यानंतर कॉकपिटमधला प्रकाश मंद करून, समोरचे आसमान न्याहळत को-पायलटला म्हटलं,

''ऑल क्लीअर! शांततेत फ्लाइट चालणार. पण वारे आपल्या विरुद्ध दिशेनं आहेत. १०० नॉट्सची 'हेडविंड' होईल काही वेळातच.''

''चेक्ड! कॅप्टन, असं मोकळं विमान इतक्या लांब न्यायचं म्हणजे एअरलाइनचं मोठं नुकसान नाही का?''

''हो. अगदीच मोकळं नाही. कार्गो आहे ना. तरीपण एअरलाइनचं नुकसान होणार यात शंका नाही. काही दिवसांनी सगळ्याच फ्लाइट बंद होतील. विमानं जमिनीवरच पडून राहतील. या कोरोनामुळे एव्हिएशनला चांगलाच आर्थिक फटका बसेल.''

''मी तर ऐकलंय की जगातील बऱ्याच मोठमोठ्या एअरलाइन्सनी आपला वर्क फोर्स कमी केलाय. कर्मचाऱ्यांना धडाधड नोकरीवरून काढलं जात आहे. आपला जॉब राहील का? मला तर पाच वर्षं थांबल्यानंतर जॉब मिळाला आहे.''

''अरे, एवढा विचार नको करू. काहीतरी मार्ग निघेल. परिस्थिती चिंताजनक असली तरी एव्हिएशन फिल्ड फारच जोमदार आहे. तू, नस्सीम तालेब या लेखकाचं 'ॲन्टी फ्रजाईल' वाचलंय का?''

''नाही कॅप्टन. आजकाल नेटफ्लिक्समुळे वाचन कुठं होतं?''

''मी सांगते त्याची संकल्पना, फ्रजाईल म्हणजे तकलादू. अशा वस्तूवर एखादा आघात केला तर ती तुटते. जशी काच. मग मला सांग तकलादूच्या उलट काय?''

''रोबस्ट. मजबूत. ज्याच्यावर आघात केला तरी तुटत नाही.''

''हो. पण तालेबच्या मते फ्रजाईलच्या उलट 'ॲन्टी फ्रजाईल' म्हणजे अशी वस्तू की जिच्यावर आघात केल्यास ती तुटत तर नाहीच पण पहिल्यापेक्षा अधिक मजबूत होते. उदाहरणार्थ, तलवार बनवताना तिच्यावर जितके घाव घालू तितकी ती धारदार व मजबूत बनते. आपलं एव्हिएशन असंच ॲन्टी फ्रजाईल आहे. जितक्या अडचणींना सामोरं जावं लागतं तितक्या प्रमाणात या क्षेत्रात सुधारणा होतात. ९/११च्या एव्हिएशन सिक्युरिटीवर झालेल्या हल्ल्याचा परिणाम काय झाला?''

''त्या हल्ल्यानंतर सुरक्षिततेत झालेल्या सुधारणांमुळे ती अभेद्य झाली. पण कोरोना आपल्या एव्हिएशनमध्ये कोणतं परिवर्तन करील?''

''सध्या तरी जोपर्यंत या जीवघेण्या वायरसचा प्रभाव टिकून आहे तोपर्यंत जास्त सावधगिरी बाळगली जाईल. प्रवाशांचा इतरांशी संपर्क येऊ नये म्हणून प्रवाशांचे चेक इन, सिक्युरिटी चेक या प्रक्रियांत यांत्रिकीकरण करण्यात येईल.''

''म्हणजे कॅप्टन, 'डिजि-यात्रा'सारखं स्वयंचलन का? ज्यात सगळंच डिजिटल आणि ऑटोमेटेट असतं.''

''अगदी बरोबर. असल्या प्रक्रिया राबवल्या जातील.''

''पण काही म्हणा कॅप्टन, अशा परिस्थितीत घाबरलेले प्रवासी कशाला उगाच हवाई यात्रेच्या फंदात पडतील?''

''का नाही पडणार? हवाई प्रवास सर्वात सुरक्षित व वेगवान आहे. कोरोनाचा संसर्ग लोकांच्या संपर्कात आल्याने होतो. रेल्वेपेक्षा विमानप्रवास अतिवेगवान आहे. म्हणून कमीत कमी वेळ संपर्क येऊन कोरोनाचा संसर्ग टाळता येऊ शकतो.''

''हो. विमानात रिस्क कमी आहे, पण हवाई प्रवास महागडा होईल. तो सर्वांना परवडेल का?''

''विमानाच्या तिकिटाचे दर मागणी-पुरवठा यावर आधारलेले असतात. फ्लाइट कमी असेपर्यंत प्रवास महागडा होईल, परंतु फ्लाइट सुरळीत सुरू होतील तेव्हा आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी विमानप्रवासाचे दर निश्चितच खाली येतील. जेवढे जास्त लोक प्रवास करतील तेवढा नफा होईल, म्हणून लो कॉस्ट एअरलाइन्स फारच कमी दरात तिकिटं देतील. फुल सर्व्हिस एअरलाइन्ससुद्धा वेगवेगळ्या

सवलती देऊन प्रवाशांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतील. शिवाय हवाई वाहतूक ठप्प झाल्यानं इंधनाचे दर कमालीचे पडले आहेत. याचा लाभ हवाई प्रवाशांना निश्चित होईल.''

''हो. ते साहजिक आहे. पण मॅम, आपले फ्रिक्वेंट फ्लायर बिझनेससाठीच प्रवास करतात. आजकाल झूम, गुगल टीम वगैरेवर लोक मीटिंग घेत आहेत. त्याकरता एकमेकांना प्रत्यक्ष भेटण्याची गरज नाही, असं कोरोनामुळं सिद्ध झालंय. 'वर्क फ्रॉम होम'ची संकल्पना अमलात येऊ लागली आहे. लोकांनी कामासाठीचा प्रवास सोडला तर एअरलाइनचे मुख्य ग्राहक हातातून निसटतील.''

''अरे, हवाई प्रवास भविष्यात कमी होईल, असं मला वाटत नाही. तू म्हणतोस तशी टेक्नॉलॉजी जोमानं प्रगती करेल. 'व्हर्च्युअल रियालिटी' आणि 'हॅप्टिक' तंत्रज्ञानामध्ये कमालीची प्रगती होईल. त्यामुळे सातासमुद्रापलिकडच्या व्यक्ती प्रत्यक्ष समोर असल्याच्या भासतील, पण तरीसुद्धा सगळ्याच मीटिंग तशा होऊ शकणार नाहीत. अशा प्रकारचं आभासी वास्तव थाय मसाज देऊ शकत नाही, आफ्रिकेतल्या प्रत्यक्ष सफारीचा अनुभव देऊ शकत नाही. प्रवास होतच राहणार. भारताचं आकाश विमानांनी गच्च भरलेलं असणार. अरे, जगात चीननंतर आपण लोकसंख्येत दुसऱ्या क्रमांकावर आहोत. कुठल्याही देशात गेलं की तिथे भारतीय रहिवास करताना दिसतात. या मंडळींनी भारताशी नातं तोडलेलं नाही. सण, लग्नकार्यं, एकमेकांच्या भेटीगाठी घेण्यास ते व त्यांचे भारतीय आप्तेष्ट सतत ये-जा करत असतात. जोपर्यंत आपला भारतीय 'डायस्पोरा' अख्ख्या जगात पसरलेला आहे तोपर्यंत आपल्या विमानप्रवासाला मरण नाही.''

१०० नॉट्सची हेडविन्ड असूनसुद्धा आम्ही झटकन दुबईच्या हवाई क्षेत्रात पोहोचलो. सामान्य परिस्थितीत दुबईच्या कंट्रोलरशी रेडिओवर संपर्क झाल्याबरोबर प्रत्येक विमानास लँडिंगसाठी डॉक्टर जसे दवाखान्यात टोकन देतात तसा एक क्रम देऊन विमानांना एअरपोर्टभोवती योजनाबद्ध रीतीने फिरवत राहतो. विमानाचा नंबर आल्यास त्या पायलटला उंची, गती कमी करण्याचा आदेश देतो. हवेतच रन-वेशी संरेखित असलेल्या मार्गावर प्रत्येक विमानाला क्रमाने सुरक्षित उंची व अंतरावर आणून लँडिंगसाठी रांगेत आणून ठेवतो. आम्ही या रांगेत रन-वेची दिशा अभंग राखण्यासाठी 'आय.एल.एस.' म्हणजेच इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टमची मदत घेतो. विमानांनी खचाखच भरलेल्या दुबईच्या एअरस्पेसवर लँडिंगसाठी आपला नंबर येईपर्यंत विमानतळाभोवती अनेक घिरट्या घालून प्रतीक्षा करावी लागते. मात्र त्या दिवशी दुबई कंट्रोलरशी रडारवर संपर्क होताच त्याने म्हटले, ''एअर इंडिया-९८३, डिसेन्ड ऑलटिट्यूड टू थाऊजंड, राईट हेडींग थ्री फाईफ झीरो, क्लीअर्ड आय एल एस थ्री झीरो लेफ्ट कॉल एस्टाब्लिश्ड.''

को-पायलट कंट्रोलरला प्रतिउत्तर देऊन मला म्हणाला,

''कॅप्टन, आज 'हबिबी' मूडमध्ये आहे. आल्याबरोबर आय. एल.एस. क्लिअर करतोय!''

त्या दिवशी नेहमीचा गलबला अजिबात नव्हता. लँड केल्यावर पाहते तर एमिरेट्सची शेकडो विमानं जमिनीवर खिळून होती. एकवेळ



कॅप्टन नीलम इंगळे पती कॅप्टन रॉबिन लोबो यांच्यासमवेत

या वाळवंटात बर्फ पडलेला बघून विश्वास बसला असता मात्र तिथली गतिशून्यता अविश्वसनीय होती. अशी अपशकुनी स्तब्धता जणू येणाऱ्या भविष्याचं भाकीत करत होती. विमान पार्क झाल्यानंतर दोन तासांचा विराम होता. अशावेळी विमानातील कर्मचारी विरंगुळा म्हणून 'ड्युटी फ्री'मध्ये वेळ घालवत असतात. परंतु त्या दिवशी सगळ्यांनी रोमामॅडमचा सल्ला ऐकला. आम्ही विमानाबाहेर पडलोच नाही. पुढच्या सेक्टरसाठी विमानाचे स्वास्थ्य तपासण्यास तिथला स्थानिक तंत्रज्ञ विमानात आला. मी माझ्या सीटवर डोळे बंद करून बसले होते. मला उठवत म्हणाला,

''गुद मॉर्निंग केपतन!''

''हाय! गुड मॉर्निंग!''

आम्ही एरवी आखाती देशातून विमानाच्या टाक्यांमध्ये भरपूर इंधन भरून आणत असतो. आज मुंबईपुरतंच इंधन आणणार होतो. त्यामुळे तो अरबी मला म्हणाला,

''केपतन, तेक मोरर् फ्यूल. सो मच इक्स्त्रा ऑईल इन गल्फ. बिग लॉस फॉर अस.''

''नो, वी डोन्ट नीड मोर'' मी त्याला प्रतिउत्तर देत मनात म्हटले, की बाबा चांगलेय ना. तुमच्याकडे एक्स्ट्रा तेल असले तर, तुम्ही त्याचा दर कमी कराल. आम्हाला फायदाच होईल.

रात्री दीडचा सुमार होता. मी दीड तासापासून एका जागी बसल्यामुळे आणि डोळे झोपेमुळे जड झाल्याने त्या टेक्निशियनबरोबर गप्पा मारण्याचा मूड नव्हता. मग त्याने को-पायलटला दुबई कशी ठप्प होत चालली आहे. शाळा, कॉलेज कसे बंद आहेत, कोविड-१९ हे एक 'बायोवेपन' म्हणजे जैवशस्त्र असून ते तिसरे महायुद्ध आहे, असे विवेचन सुरू केले.

मी कॉकपिटच्या खिडकीबाहेर वळून पाहिले. प्रवासी विमानात प्रवेश करू लागले होते. आपल्यावर कोणाकोणाची जबाबदारी आहे, हे बघण्यास त्यांना न्याहाळू लागले. पारदर्शक एअरोब्रिजमधून त्यांनाही कॉकपिट आणि आम्ही दोघे दिसत होतो. बरेच जण शांतपणे आत येत होते, मात्र काही जण आपली फार जुनी ओळख असल्यासारखे हात

हलवून मला 'हाय हॅलो' करत होते. एका महिलेने थम्स अप केले. दोन लहान मुली फ्लाईंग किस देत गेल्या. एका वृद्ध सद्गृहस्थांनी चक्क नमस्कार केला. एक जण कॉकपिटची पार्श्वभूमी घेऊन सेल्फी काढू लागला तर कामगारवर्गातल्यासारख्या दिसणाऱ्या एका प्रवाशाने कॉकपिटकडे बोट दाखवत मित्रास म्हटले असावे, ''बापरे! महिला वैमानिक! पोहोचू ना रे आपण सुखरूप?''

त्याच्या मित्राने मात्र प्रतिउत्तर म्हणून मला एक मस्त सॅल्युट केला.

माझ्या प्रवाशांनी आपुलकीने केलेली ती महिला सक्षमीकरणास मानवंदना होती. माझ्या डोळ्यांवरची झोप व डोक्यातली कोरोनामुळे आलेली नकारात्मकता नाहीशी होऊन त्या जागी पॅसेंजरने आपल्यावर टाकलेल्या विश्वासाची जाणीव झाली. नव्या ऊर्जेने पुन्हा कॉकपिटमधली कामे सुरू झाली.

शंभर नॉट्सची 'हेडविंड' परतीच्या फ्लाइटसाठी शंभर नॉट्सची 'टेलविंड' झाली होती. ध्वनिगतीच्या ८० टक्के वेगाने उडत मुंबईचे छत्रपती शिवाजीमहाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ सकाळी चार-साडेचारच्या सुमारास गाठले. सर्व प्रवासी उतरल्यानंतर माझी जबाबदारी संपली.

येथपर्यंत सर्व व्यवस्थित चालले होते. मात्र विमानाबाहेर पडल्यानंतर इमिग्रेशनकडे जाताना समोरच्या दृश्याने मला अस्वस्थ केले. कोरोनाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी आरोग्य मंत्रालयाने नेमलेले कर्मचारी, प्रवास करून आलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या शरीराचे तापमान मोजून ज्वर असलेल्या व्यक्तीला इतरांपासून अलग करत होते. माथ्यावर थर्मामीटर लावणाऱ्या कर्मचाऱ्यांसमोर शेकडो लोक जमा झाले होते. या शिंकणाऱ्या, खोकणाऱ्या घोळक्यातून जाण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. मला को-पायलट म्हणाला,

''कॅप्टन, आपण आतापर्यंत या प्रवाशांची घेतलेली काळजी वाया जाणार असं दिसतंय.''

मी दहावीत असताना अनिता पाध्ये संपादित दादा कोंडके यांचे 'एकटा जीव' आत्मचरित्र मोठ्या उत्साहाने वाचले होते. प्रवाशांचा घोळका पार करताना त्यातले दादा कोंडकेंचे इरसाल वाक्य आठवले, 'जब उखळ मे डाला सर, तब मुसळ से क्या डर.'

माझ्या डोक्याचे तापमान घेणाऱ्या पी.पी.ई. सूट परिधान केलेल्या आरोग्य मंत्रालयाच्या कर्मचाऱ्यास म्हटले, ''हा फार चांगला उपक्रम आहे. पण इतक्या लोकांनी असं एकत्र थांबणं तुम्हाला योग्य वाटतं का? या प्रतिबंधात्मक उपायातला हा विरोधाभास तुम्हाला जाणवत नाही, याचं मला नवल वाटतं.''

''खरंय तुमचं मॅडम, पण त्यासाठी स्टाफची संख्या वाढवावी लागेल. स्टाफ शॉर्टेज आहे ना!''

भारतासारख्या मानवी संसाधनाच्या महाआगारात मिळालेल्या या 'स्टाफ शॉर्टेज'च्या उत्तराने मला 'क्लीन बोल्ड' केले.

इमिग्रेशन काऊंटरवर पोहोचले. त्या ऑफिसरला माझा पासपोर्ट आणि फ्लाइटची माहिती देत म्हटले,

''तुम्हाला तर डॉक्टरपेक्षा जास्त रिस्क घ्यावी लागत आहे. इतक्या सर्व प्रवाशांशी बोलायचं, त्यांचे पासपोर्ट हाताळायचे...''

''ड्युटी आहे मॅडम.

बलवानप्यशक्तोऽसौ धनवानपि निर्धनः।

श्रुतवानपि मूर्खोऽसौ यो धर्मविमिखो जनः।।''

''वा! सकाळी सकाळी संस्कृत सुभाषित ऐकून प्रसन्न वाटलं. प्लीज याचा अर्थही सांगा ना.''

''ऐका. जी व्यक्ती आपल्या कर्तव्यापासून विमुख होते ती बलवान असूनही असमर्थ, धनवान असूनही निर्धन आणि ज्ञानी असूनही मूर्ख असते. कर्तव्य पार पाडणं फार मोलाचं काम आहे. कॅप्टन, टोपी काढा आणि कॅमेऱ्याकडे पाहा.''

मी एअरपोर्टच्या बाहेर पडले. एअर इंडियाच्या गाडीत बसून घरी पोहोचले. माझा तीन वर्षांचा लिंकन दरवाजाच्या आवाजाने दचकून उठला. माझा मास्क लावलेला चेहरा पाहून, दोन्ही हातांत स्वतःचे डोके धरून म्हणाला,

''मम्मा, तुला कयोना वाय्यस झाला? ओ. नो.!''

माझ्या मनात विविध शंका होत्या म्हणून ठरवले की कमीत कमी दहा दिवस तरी मुलांना हात लावायचा नाही. आईने असा तोडलेला संपर्क लेकरांना फारच अवघड गेला. काही दिवस उलटले तरी कोरोनाची कसलीही लक्षणे दिसली नाहीत.

या फ्लाइटने मला आगळेच समाधान दिले हे खरे, तरी याचा वेगळा त्रासही सहन करावा लागला. फ्लाइटनंतर दहा-बारा दिवसांनी माझ्या ७१ वर्षीय सासूबाईंना 'ब्रेन स्ट्रोक'चा अ‍ॅटॅक आला. माझे पती रॉबिन यांनी आईंना स्वतःच्या गाडीने ताबडतोब रुग्णालयात नेले. त्यांना आसपासच्या प्रसिद्ध इस्पितळांनी अ‍ॅडमिट करून घेण्यास नकार दिला. कारण त्यांनी घरातील व्यक्तींची 'ट्रॅव्हल हिस्टरी' विचारली आणि माझी दुबईची फ्लाइट नडली.

''आपल्या फॅमिलीमध्ये आंतरराष्ट्रीय प्रवास झालेला असल्यामुळे कोविड-१९च्या आयसोलेशन वॉर्डमध्ये ठेवावं लागेल तुमच्या आईला. सध्या इथे तशी सोय नाही.'' असे एका हॉस्पिटलच्या परिचारिकेने सांगितले.

''पण सिस्टर, मी तीन हॉस्पिटल फिरलोय. माझ्या आईची प्रकृती बिघडत चालली आहे. इमर्जन्सी आहे. जगात कोरोनाशिवाय दुसऱ्या विकारांनीसुद्धा लोक ग्रस्त आहेत. सगळी हॉस्पिटल फक्त कोरोनावाल्यांना पेशंट मानताहेत. बाकीच्या रोग्यांचं काय?''

''सॉरी सर, तुम्ही एक काम करा. अंधेरीच्या कोकिळाबेन हॉस्पिटलला जा. तिथे सोय होऊ शकते.''

कोकिळाबेनमधल्या डॉक्टरांनी कसेबसे माझ्या सासूबाईंचे एमआरआय काढून अ‍ॅडमिट करून घेतले. पाच दिवसांनी आवश्यक ती औषधे लिहून दिली आणि त्यांना घरी नेण्याचा सल्ला दिला.

'लॉकडाऊन' असल्यामुळे आम्ही त्यांची घरीच शुश्रूषा केली.

सासूबाईंना थोडा आराम पडत नाही तोच जगभरातील कोरोना वायरसच्या विळख्यात अडकलेल्या भारतीयांना परत आणण्याची योजना भारत सरकारने आखली. या मोहिमेचा म्हणजे 'ऑपरेशन वंदे भारत'चा एअर इंडियाने आरंभ केला. बोईंग-७७७ उडवणाऱ्या

आमच्या कॅप्टन रॉबिन यांनी अमेरिकेतील सॅन-फ्रान्सिस्कोच्या फ्लाइटची ड्युटी स्वीकारली.

या निर्णयाने सासूबाई नाराज झाल्या.

मुलाला म्हणाल्या, ''रॉबिन, करावीच लागेल का तुला ही फ्लाइट? अव्हॉइड नाही करता येणार? माझी कंडिशन बरी नाही. ॲडमिट व्हावं लागलं तर.''

''ममा, डोन्ट वरी. नीलमनं फ्लाइट्स केल्या तशी आता परिस्थिती नाही. प्रोसिजरमध्ये बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत. फ्लाइटच्या आधी माझी कोविड टेस्ट होणार आहे. फ्लाइट झाल्यावरसुद्धा तपासणी होईल. त्यानंतर सहा दिवसांनी पुन्हा कोविड टेस्ट. ती पॉझिटिव्ह आल्यास मला घरी येण्यास परवानगी मिळणार नाही. हॉटेलमध्येच क्वारंटीन व्हावं लागेल. शिवाय ग्लोव्हज, सॅनिटायझर, मास्क एवढंच नाही तर फ्लाईटभर पी.पी.ई. किंवा 'हॅजमॅट सूट' घालण्यास एअर इंडियानं सक्तीचं केलं आहे. ममा, मला ही 'कॉल ऑफ ड्युटी' आहे. अशावेळी एअर इंडियाचा प्रत्येक पायलट, कॅबिनचा सगळा स्टाफ आपलं योगदान देण्यास मनातून उत्सुक आहे. तुझी जिजसवर नितांत श्रद्धा आहे ना ममा. मग काळजी नको करूस.''

''तरी मला वाटतं की फ्लाइटमधून बाहेर निघता आलं तर बघ.''

त्यांचे संभाषण ऐकत असणारी माझी सात वर्षांची शनेल आपल्या आजीला म्हणाली, ''अगं आजी, या वायरसमुळे जगभरातल्या लोकांची मुलं अडकली आहेत. कुणाचे आजी-आजोबा अडकले आहेत. आमच्यासारख्या लहान मुलांचे ममा-डॅडासुद्धा अडकले आहेत. डाडा फ्लाइटवर गेले नाही, घरीच राहिले तर या सगळ्यांना कोण घरी आणणार? डाडा मस्ट गो! ओके डाडा? आणि हो, कॉकपिटमध्ये बसून त्या फनी सूटमधला फोटो काढून आणायला विसरू नका हं. हॅपी लँडिंग्स डाडा! हॅपी ऑपरेशन वंदे भारत!''


कोविड-१९च्या या समरप्रसंगी प्रत्येकाने आपापले काम चोख करावे. आपल्याकडून जे अपेक्षित आहे ते पार पाडावे. आनंदाने 'ड्युटी' करावी. कर्तव्यनिष्ठेच्या सादेस प्रतिसाद देत योगदान देण्याची हीच सुवर्ण संधी आहे.

**- कॅप्टन नीलम इंगळे-लोबो**
भ्रमणध्वनी : ९८३३१६५७५९
neelam.ingale13@gmail.com

ग्रंथाली

## भगवान इंगळे यांची आगामी तीन पुस्तके!

**ढोर** **भिडू** **उभारणी**










**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**राधिका कुंटे**

# भाषाशास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या मिलाफाची झेप

**भा**षाशास्त्राची अभ्यासक अर्चना आंबेरकर हिनं केवळ भाषाशास्त्राच्या विद्यापीठातील ठरावीक अभ्यासाच्या चौकटीत न अडकता, झपाट्यानं बदलणाऱ्या तंत्रज्ञानाची कास धरत आपलं करिअर घडवण्याचा निर्णय घेतला. आज करिअरच्या यशस्वी टप्प्यावर असणाऱ्या अर्चनाच्या या प्रवासाविषयी जाणून घेऊया.

तिच्याबद्दलच्या माहितीच्या सारांशावर एक नजर टाकली तर दिसतं, की ती आहे भाषाशास्त्राची अभ्यासक. भाषा आणि तंत्रज्ञानाची सांगड घालत ती करिअरचा एकेक टप्पा यशस्वीरी त्या पार करते आहे. सध्या अशी माणसं मोजकीच आहेत. त्यामुळं अर्चना आंबेरकरशी संवाद साधायचं ठरवलं. अर्चनाच्या भूतकाळात थोडंसं डोकावायचं तर मालाडच्या उत्कर्षमंदिर या मराठी माध्यमाच्या शाळेत असल्यापासूनच तिला भाषांची आवड होती. मात्र पुढं भाषेमध्ये काही करिअर करेन, असं तिला वाटलं नव्हतं. कलाशाखेत प्रवेश घेतल्यावरही तिला गणित, खगोलशास्त्रात अधिक रस होता. बारावीच्या वर्षात संगणकावर विविध विषयांचा शोध घेताना भाषाशास्त्राची तोंडओळख झाली आणि ते भावलं. एरवी भाषेची सांगड आपण साहित्याशी घालतो. मात्र साहित्य, आलंकारिक भाषा वगैरे गोष्टींखेरीज भाषेत शब्दांचा वापर, वाक्य कसं तयार होतं इत्यादी गोष्टींचा अभ्यास भाषाशास्त्रात होतो, हे कळल्यावर हा अभ्यास करायला आपल्याला आवडेल, असं तिला मनोमन वाटलं. मग हे शास्त्र कुठं शिकता येईल हा शोध घेतल्यावर पुण्यात डेक्कन महाविद्यालयात ते शिकवलं जातं, ही माहिती कळली. बारावीच्या सुट्टीत तिथं जाऊन चौकशी केल्यावर कळलं की आपल्याकडं पदवीनंतरच या विषयाचा अभ्यास करता येतो. विषय कोणताही घेतला तरी त्याची भाषाशास्त्राशी सांगड घालता येते, हे कळलं. पुढं तिनं संस्कृतमध्ये पदवी घेतली आणि मुंबई विद्यापीठातल्या भाषाशास्त्राच्या अभ्यासक्रमाकडं वळली. हा अभ्यास सुरुवातीला खूपच कठीण गेला, मात्र थोड्याच कालावधीत गाडी रुळावर आली आणि आपण योग्य निर्णय घेतल्याचं समाधान तिला वाटलं.

> कॉम्प्युटेशनल लिंग्विस्टिक्सच्या क्षेत्रात तज्ज्ञांची नेमणूक करताना त्यांची भाषा कोणती आहे हे पाहिलं जातं. भाषाशास्त्रज्ञ त्याच्या मातृभाषेत काम करतात. त्यामुळं मराठी भाषकांना यूएसए इंग्रजीवर काम करायची संधी खूप कमी मिळते. भारतीय इंग्रजी, हिंदी, मराठी असेल तर संधी मिळते. अर्चना सध्या भाषेचे विविध कंगोरे लक्षात घेऊन काम करते आहे. भारतातले काही स्टार्टअप्स भारतीय भाषांमधले चॅटबॉट विविध व्यवसायांसाठी तयार करून देतात. यासाठी कॉम्प्युटर सायन्स, कॉम्प्युटर इंजिनीयररिंग, सॉफ्टवेअर इंजिनीयरिंग हे मुळात महत्त्वाचे विषय आहेत. त्यात भाषाशास्त्रज्ञ भाषेचं विश्लेषण करून देतात आणि त्याचा उपयोग केला जातो.

अर्चना सांगते, की ''मुळात मी कलाशाखेकडं जायचा निर्णय घेतल्यावर पालकांचा पाठिंबा काही प्रमाणात मिळाला आणि काही प्रमाणात

नाहीदेखील शालेय वर्षांत चांगले गुण मिळत होते. माझं गणित चांगलं असल्यानं त्या दृष्टीनं माझ्याकडून भोवतालच्यांच्या अपेक्षा वाढल्या. अगदी कलचाचणीतही मला इंजिनीयरिंग जमू शकेल असा निष्कर्ष आला होता. त्यामुळं पालकांचा कल थोडासा त्या दिशेनं झुकला होता; पण मी कलाशाखेत जायच्या निर्णयावर ठाम राहिले. तेव्हा भाषेत करिअर करावं असं मनात नव्हतं, पण कलाशाखेतच जायचं होतं. मला रॅटरेसमध्ये अजिबात पडायचं नव्हतं. रुळलेलली वाट चालायची नव्हती. स्वतःचा स्वतंत्र मार्ग शोधायचा होता. अगदी प्रांजळपणं सांगायचं तर स्वतःकडून फारशा अपेक्षाही नव्हत्या. तेव्हा कुणी विचारलंच, की पुढं काय करणार, तर त्याचं 'शिक्षकी पेशा' हेच एक उत्तर होतं. माझ्या निर्णयामुळं मिळणाऱ्या यश-अपयशाची जबाबदारी सर्वस्वी माझी असणार होती.''

तिला मुळात संशोधनामध्ये रस होता. पण एम.ए.नंतर लगेचच पीएचडी करावं, असं वाटत नव्हतं. पीएचडीखेरीज भाषाशास्त्रातही वेगवेगळ्या वाटांवर चालता येऊ शकतं. उदाहरणार्थ, संगणक उपयोजन, केवळ भाषेचा अनेक प्रकारे अभ्यास करणं, भाषांतर, भाषा शिकवणं इत्यादी. तेव्हाची तिची परिस्थिती अशी होती, की तिला हे सगळंच खूप आवडतं होतं आणि सगळ्याच गोष्टी शिकून घ्याव्यात असं वाटत होतं. साहजिकच सुरुवातीच्या काळात संशोधनासाठी म्हणून बरेच विषय काढले गेले; कारण तिला अनेक प्रश्न पडायचे. मात्र तिच्या मते, एक विषय घेऊन त्यासाठी पाच-सहा वर्षं मेहनत घेण्यासाठी लागणारी परिपक्वता तेव्हा तिच्यात नव्हती. दरम्यान तिनं व्यावसायिक स्तरावर मराठी-इंग्रजी आणि इंग्रजी-मराठी असं भाषांतर करायला सुरुवात केली. काही वर्ष हे काम करत असताना कॉम्प्युटेशनल लिंग्विस्टिक्समध्ये एकही संधी नव्हती. या विषयाचं शिक्षण तेव्हा आयआयआयटी हैदराबादमध्ये मिळायचं. ते घेणाऱ्यांना नोकरीची संधी आधी मिळत होती.



अर्चना आंबेरकर

कालंतरानं आयआयटी मुंबईतल्या एका संशोधन प्रकल्पात संशोधक साहाय्यक म्हणून काम करायची संधी तिला मिळाली. मराठीतून हिंदीमध्ये भाषांतर करणारी प्रणाली तयार करायचा तो प्रकल्प होता. त्यात काही पायऱ्या मराठीच्या होत्या. शब्दांच्या संदर्भात काम करायचं होतं. तसंच दुसऱ्या बाजूला हिंदीतल्या शब्दांसाठी काम करायचं होतं. तिनं मराठी भाषेचं- विशेषतः शब्दाला प्रत्यय लावलेले असताना मूळ शब्दापर्यंत कसं यायचं, हे काम केलं. या दोन वर्षांच्या कामानंतर टीआयएफआरच्या एका प्रकल्पामध्ये काम केलं. त्यात पाच स्त्रिया, पाच पुरुष अशा दहा मराठी भाषकांच्या संभाषणातले एकूण तीस हजार शब्द रेकॉर्ड करून घेतले. त्यांच्या उच्चारांचा-ध्वनींचा अभ्यास केला. मराठीतल्या अशा प्रकारच्या या पहिल्याच प्रकल्पात आपल्याला सामील होता आलं, याचा तिला खूप अभिमान वाटला होता. दोन वर्षं हे काम करताना भाषांतराचं काम सुरूच होतं. नंतर तिनं मुंबई विद्यापीठाच्या भाषाशास्त्र विभागात सर्टिफिकेट कोर्स इन फोनेटिक्स अँड फोनोलॉजीचा अभ्यासक्रम तीन वर्षं गेस्ट लेक्चरर म्हणून शिकवला.

दरम्यान भाषांतराच्या कामासोबतच कॉम्प्युटेशनल लिंग्विस्टिक्समध्ये लागणाऱ्या भाषेच्या अभ्यासाची कामं ती स्वीकारायला लागली. उदाहरणार्थ - शब्दांच्या जाती ओळखणं. अर्चना सांगते, ''या कामामध्ये अभ्यासकाला जवळपास दहा हजार शब्दांचा संग्रह दिला जातो. त्यातलं एकेक वाक्य घेऊन त्यातल्या शब्दांची जात शोधून काढायची असते. भाषाशास्त्रात आपल्या पारंपरिक व्याकरणातल्या संज्ञांखेरीज अनेक संज्ञाचा सखोल अभ्यास केलेला आहे. या सगळ्या अभ्यास करण्याच्या प्रक्रियेला 'टॅगिंग' असं म्हटलं जातं. याखेरीज कधी कधी दुसऱ्या प्रकारच्या कामात लोकांचं रेकॉर्ड केलेलं संभाषण दिलं जातं. 'आयपीए' या भाषाशास्त्रात वापरल्या स्क्रिप्टमध्ये उच्चारांचा नेमकेपणा शोधून काढला जातो.

उदाहरणार्थ, डब्यातला 'ड' आणि कडकमधला 'ड' या दोन्ही 'ड'चे ध्वनी वेगवेगळे आहेत. त्यामुळं (International Phonetic Alphabet - IPA) आयपीएमधल्या लिपीत दोन्ही ध्वनींसाठी वेगळं अक्षर असेल. ही लिपी वापरून तासाभराचं रेकॉर्डिंग असतं आणि त्याचं प्रतिलेखन करायचं असतं. अशा प्रकारच्या कामांचं फ्रीलान्सिंग करताकरता व्यावसायिक स्तरावर मराठीसह अन्य भाषांमधल्या कामांचा अंदाज यायला लागला.''

कालांतरानं ती एका स्टार्टअपमध्ये काम करायला लागली. तिथं लहान मुलांशी गप्पा मारायला रोबो तयार केला जात होता. तो रोबो मुलांशी कसा बोलेल या मुद्द्यांत अनेक गोष्टी येतात. उदाहरणार्थ – मुलं बोलतील ते त्याला ऐकू आलं पाहिजे. त्याचा अर्थ समजला पाहिजे. तो समजून त्याच्याशी संबंधित उत्तर दिलं पाहिजे. उत्तर बोलून दाखवलं पाहिजे वगैरे. हे काम तिनं वर्षभर केलं. त्यानंतर ती 'चॅटबॉट'वर काम करायला लागली. 'चॅटबॉट'द्वारे थेट व्यक्तीशी संपर्क साधणं टाळून काही क्लिक्ससरशी आपल्याला हव्या त्या आज्ञा देऊन रेस्तराँमध्ये पदार्थांची ऑर्डर देणं, विमानाची तिकिटं रद्द करणं अशी कामं करता येतात. सध्या ती याच संदर्भात भाषेचे विविध कंगोरे लक्षात घेऊन काम करते आहे. भारतातले काही स्टार्टअप्स भारतीय भाषांमधले चॅटबॉट विविध व्यवसायांसाठी तयार करून देतात. यासाठी कॉम्प्युटर सायन्स, कॉम्प्युटर इंजिनीयरिंग, सॉफ्टवेअर इंजिनीयरिंग हे मुळात महत्त्वाचे विषय आहेत. त्यात भाषाशास्त्रज्ञ भाषेचं विश्लेषण करून देतात आणि त्याचा उपयोग केला जातो.

तिच्या मते, भाषेचा अभ्यास आणि तंत्रज्ञानातलं उपयोजन हे अर्थकारणावर अबलंबून असतं. भाषांबद्दलचं काम दोन स्तरांवर चालतं. एकात संशोधनासाठी संशोधन केलं जातं. त्यात पैसे कमावणं हा मुख्य उद्देश नसतो. पहिल्या स्तरावरचं संशोधन हे फंडिंगवर अवलंबून असतं. हे अर्थसाहाय्य सरकार किंवा खाजगी संस्थांकडून मिळतं. त्या अर्थसाहाय्यात हिंदी भाषकांची संख्या अधिक असल्यानं साहजिकच हिंदीला प्राधान्य दिलं जातं. भारतातले बहुसंख्य स्वत: हिंदी बोलत नसले तरी त्यांना कामचलाऊ इंग्रजी–मिश्रित हिंदी समजतं. त्यामुळं कोणतंही साधन (टूल) हिंदीत आधी आणलं तर ते वापरलं जाण्याची शक्यता खूप मोठी असते. त्याच्या या अधिकाधिक वापरामुळं त्या टूलच्या मर्यादा आणि शक्तिस्थानं चांगल्या प्रकारे स्पष्ट होतील. त्यामुळं हिंदी किंवा भारतीय इंग्रजी भाषेपासून एखादं टूल सुरू होणं हे खूप साहजिक वाटतं. त्यानंतर मराठी, तेलुगू, तमिळ इत्यादी भाषा किती जण वापरतात, हे बघितलं जातं. शिवाय सध्या उपलब्ध असणारी साधनं (टूल) हे भाषिक वापरण्याची शक्यता चाचपडली जाते. जागतिक स्तरावरही इंग्रजीवर पहिलं काम होतं कारण ती सर्वाधिक वापरली जाते.

सध्या लॉकडाऊनच्या काळात ती वर्क फ्रॉम होम करते आहे. सुरुवातीचे काही दिवस, स्वभावानं अंतर्मुख असल्यानं, तिला घरात बसून राहण्याचा, काम करण्याचा त्रास झाला नाही. पण घराबाहेर पडून प्रत्यक्ष संवाद साधायला आवडणाऱ्या माणसांना घरीच राहण्याचा खूप त्रास झालेला तिला दिसला. आता तिलाही घरी राहण्याचा कंटाळा यायला लागला आहे. ती आणि तिच्या ऑफिसमधल्या मैत्रिणी छान बाहेर फिरायला वगैरे जायच्या. ते घडत नाही आणि मुख्य म्हणजे प्रत्यक्ष भेटता येत नाही याचं त्यांना दुःख वाटतं. त्यावर उपाय म्हणून त्या रोज व्हिडीओ कॉल करतात. या बोलण्यामुळं आपापसांतला संवाद टिकून राहतो. त्या सगळ्यांच्या कलागुणांना बहर आला असून त्या कलागुणांचे फोटो–क्लिप्स शेअर केले जातात. अर्चनाचा आई–बाबांनाही फोन होतो. तिला वाटतं, की ही सगळी सपोर्ट सिस्टिमही तितकीच महत्त्वाची आहे. आताच्या काळात ताणाची कारणं बदललेली आहेत. असुरक्षित वातावरण, नोकरी जाणं आहे तसं हातात काम असणाऱ्यांचं काम वाढलं आहे. शिवाय घरातली कामंही करायला लागत आहेत. मात्र मैत्रिणींसोबतच्या गप्पांमुळं हा ताण कमी व्हायला मदत होते.

अर्चना सांगते की, ''या क्षेत्रातलं पुढचं चित्र रंगवणं तसं कठीण आहे. कॉम्प्युटेशनल लिंग्विस्टिक्सच्या क्षेत्रात तज्ज्ञांची नेमणूक करताना त्यांची भाषा कोणती आहे हे पाहिलं जातं. भाषाशास्त्रज्ञ त्याच्या मातृभाषेत काम करतात. त्यामुळं मराठी भाषकांना यूएसए इंग्रजीवर काम करायची संधी खूप कमी मिळते. भारतीय इंग्रजी, हिंदी, मराठी असेल तर संधी मिळते. त्यामुळं भारतीय भाषांमध्ये सध्या निर्माण होत आहेत, तशी टूल्स निर्माण होणं हे मार्केटवर अवलंबून असतं. सध्याच्या निरीक्षणानुसार लोकांना आपल्या भाषेत बोलायला, व्यक्त व्हायला अधिक भावतं आहे. त्यामुळं कदाचित संधी वाढेल, पण ठोसपणं यावर काहीच बोलता येणार नाही. आता या क्षेत्रात येणाऱ्यांना कोडिंग येणं, कॉम्प्युटर सायन्स येणं, सॉफ्टवेअर इंजिनीयरिंग येणं ही एक आवश्यक गोष्ट ठरते आहे. दुसरीकडं असंही दिसतं, की मोठ्या कंपन्यांना पदव्यांच्या भेंडोळ्यांपेक्षा त्या विषयातलं ज्ञान किती आहे, हे महत्त्वाचं वाटतं. त्यामुळं संधी मिळू शकते. सध्याच्या वेळेचा सदुपयोग ऑनलाइन सर्टिफिकेट कोर्स करण्यासाठी करता येईल. संधी वाढल्या तरी आवश्यक कौशल्यंही अनेक असल्यानं ती आत्मसात करायचा प्रयत्न कराच. आपल्या कामाच्या मार्केटचा ऑनलाइन अंदाज आणि अदमास घ्यायला शिकायला हवं. मागणी तसा पुरवठा हे तत्त्व लक्षात घेऊन आंतरशाखेतील ज्ञान संपादन करणं आणि परिस्थितीनुसार स्वतःमध्ये योग्य ते बदल करणं गरजेचं आहे. भाषाशास्त्रातलं ज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मिलाफ साधता आल्यास लोकल ते ग्लोबल झेप नक्कीच कष्टसाध्य होऊ शकेल. त्यासाठी नवोदितांना ऑल द बेस्ट.''

**– राधिका कुंटे**
भ्रमणध्वनी : ९८२००८९३७६
kunte.radhika@gmail.com



विलास माने

# टाळेबंदी भटक्या-विमुक्तांच्या जगण्याची!

**म**हाराष्ट्रात जवळपास सव्वादोन महिन्यांपासून कोरोनाने हाहाकार माजवला आहे. त्यात शेतकरी, शेतमजूर, सरकारी कर्मचारी, व्यापारी रेशनकार्ड धारक एकमेकांच्या पतीवर, सरकारी सवलतीवर पोट भरत आहेत. या देशात त्यांच्याबरोबर भटके-विमुक्त मोठ्या संख्येने राहत आहे त्यांचा विसर समाजाला, सरकारला पडलेला आहे. भटक्या जमातीतले बहुतांश लोक स्वत:च्या कलाकुसरीने, हातचलाखीने पक्षी, प्राणी यांच्या मदतीने गावगाड्यातील लोकांच्या बारीकसारीक गरजा भागवत असतात.

आमचा भटका-विमुक्त समाज गावगाड्यातील लोकांना देव मानून त्यांची पिढ्यान् पिढ्या सेवा करतो. करमणूक करतो. त्यांच्या शेतीची, जागेची इमानेइतबारे राखण करतो. मालकाच्या तनसाला (गवताच्या काडीला) सुद्धा कोणाला हात लावू देत नाही. त्यांच्या सेवेसाठी आमचा जन्म झालाय अशी आमची भावना असते. मालक जे काही खरकटं-मरकटं, शिळंपाकं देईल ते खाऊन पोट भरतो. त्यांनी दिलेल्या जुन्या कपड्यांत अंग झाकतो. गावाच्या कडेला पडीक जमीन, जनावराच्या गोठ्यात पाली ठोकून मुक्काम करतो. दुसऱ्या दिवशी तांबडं फुटायच्या आधी दुसऱ्या गावाला भीक मागायला जातो. रोज नव्या गावात सूर्याचं तोंड बघतो. बारीकसारीक कामं, कला, करमणूक केल्याशिवाय आमची चूल पेटत नाही.

आतातर साठ-सत्तर दिवस गाव बंद आहे. कोरोनामुळे एका गावातले लोक दुसऱ्या गावात येऊ देत नाहीत. पोलीस बाहेर तोंड काढू देत नाहीत. आज मागितलं आन खाल्लं. उद्याचं उद्या बगुत. (पाहुत) आता कोरोनाच्या दणक्यानं पालाच्या बाहेर पडता येईना. आमची लेकरे गिटीगिटी उपाशी मरत आहेत. सकाळी उठून झाडाच्या आडुशानं परसाकडला बसलं तरी पोलीस मारू लागलेत. आमच्या नशिबानं थट्टा मांडलीय. कोनीतरी दानकरी येईल आन किलो दोन किलो धान्य लेकराबाळांना देईल म्हनून पालीतल्या भोकातून रोडकडं टकाटका बघत बसतोत. कोनीतरी देव हून पसा मूठ द्यायला इल आसी वाट बगतोय. लेकरं चिमनीच्या पिलासारके गोळा हून बसल्यात. आमच्या जीवनमरनाचा प्रश्न आहे. आम्ही करोनानं मरनार नाही तर अन्नपान्यावाचून मरूत. धोबी का कुत्ता न घर का ना घाट का

> आमी वैदवाले. इतं संभर पाली हाईत आमच्या. आतापस्तर फकस्त दोनदा पाच किलू गव्हाचं पीट, दोन किलू तांदूळ आन यक गोडतोलाचं पाकीट एवडं मिळूय बगा. आमचा धंदा मंजी गावात जाऊन आरडायचं, वैदू तुमच्या घरापस्तर आलाय. कुनाला नारू, तापू, ताप खोकला आलंय का? आमी झाडपाल्यानं नीट करताव. गावातल्या मायभयनीकडून जीबी भाजी-भाकर घिऊन पोट भरताव. आता तर गाव बंद झालंय. रस्ते बंद झालेत. इकडं सरकार मनालंय, घराच्या भाएर निगू नका. कवाड लावून बसा. आमच्या पालीला कवाड हाय का सायेब? सरकार मन्तय, लाइट बंद करा. दिवं लावा! आमच्याकडं लाइट बी न्हाय आन दिवाबी न्हाय, आमी आंदारात हाव.

आशी परिस्थिती झाली आहे.

मी लातूर जिल्ह्यातल्या निलंगा तालुक्याला राहातो. तिथं पाचशे पाली आहेत. सगळीकडं अंधकार आहे. आपल्या देशात कुत्रे, मांजरं, पाखरांचं संरक्षण केलं जातं. त्यांची जिवापाड काळजी घेतली जाते. त्यांना चांगलं खाद्य, बिस्किटं, जेवन, अंग धुवायला साबन, शॅम्पू मिळतो. आम्ही तर जिवंत माणसं! स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्सं झाली. आम्हाला पॅन कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड काही मिळालं नाही. मतदान करायचं कार्ड बरीक मिळालंय. श्रीमंतासारखं पांढरं रेशन कार्ड मिळालंय. त्याच्यावर घासलेट तेवढं मिळतंय. सरकारनं गोरगरिबांना रेशन कार्डवर मोफत धान्य, तेल द्यायला सुरुवात केली आहे. आमच्याजवळ रेशनकार्ड नसल्यानं सरकारची मदत आमच्यापर्यंत पोचत नाही. आम्ही हताश झालोत.

मी व माझ्या कार्यकर्त्यांनी करोनाच्या संचारबंदीत अनेक पालीत जाऊन फेरफटका मारला.

घिसाड्याच्या मोरेला पुसलं, ''काय, शंकरराव बराय का?''


''कस्याचं बरं सायेब, आमाकडं सरकार डुकूनबी बगाना झालंय. आता आमी लेकरावाना आदी इक (विष) पाजून झुपी घालावं आन पुन्ना आपुनबी घेऊन मरावं आसं वाटु लागलंय. लेकराबाळाइचे लई हाल चाल्लेत. करुनाला यीवून दोन-आडीच महिनं झालं. पयल्या महिन्यात हजार-दोन हजार कामाचं बचत करून ठेवलं होतं. त्यात महिना काडला. आता ती पुंजी संपली. दुसऱ्या महिन्यात काय पोट चालना गेलंय. आमी लोखंड तापवून लालबुंद झाल्यावर, आमची बाइ इस किलुचं घन मारून, त्याला इतळून टिकाव, खोरं, खुरपं इळी, आशा वस्तू बनीवताव. थोडा बहुत मालबी करून ठिवलाय, गिराईक न्हाई. गावात, खेड्यात माल घिवून जावं मन्तोय पर गावातले लोक काठ्या घेऊन तान द्या लागलेत.''

वडराच्या मिरग्याची बायकू सांगू लागली,

''निडला कुसून ना अंता चेपता चपचप (म्या सगळं सांगते सायब.) काल म्या, माजी सून, पोरगं १० जाती घिवून लांबोट्याला गेलतो. लांबोट्याच्या सिवारावर गावचं राकन करनाऱ्यांनी आमाला आडवून तितं आमच्याकडचे जाते हिस्कावून घेतले. आन धोंडे घालून जाते तोडून टाकले. आमाला धकाबुकी करून तान दिवू लागले. आमी जीव मुटीत धरून पळून आलाव. ही सम्दं माज्या नवऱ्यानं बगितलं. त्याची छाती फुटली. पानी पानी झालं धास्तीनं. आज्यारी पडलाय. कुनी पालावर येऊन एकादा खलबता नेला त पाचपन्नास मिळतंय त्यात भागीवतोय कसंतरी. सरकारी कायबी मिळंनाय. जीव कटाळून गेलाय. एकदम किलारीसारकं भूकंप व्हवून सगळे लेकराबाळा सकट मरून जातय. कोन कुनाचं दुक बगायला तयार न्हात नाव. आता आसं वाटू लागलंय.''

''लाज बाई, तुजं कसं चालंय?'' पुसल्याव म्हन्ली,

''आमचं व्हय सायब. आम्ही पयलं फाटं चार पाचला उटत व्हुतो. सगळं गाव फिरून भंगार गोळा करून ती इकून पॉट भरत व्हुतो. करना झाल्यापासून पोलीस गावात फिरू दिनात. लय आवगड झालंय.''



''तुमचा नवरा काय काम करत व्हता?''

''तेव रानावनात कुटनं जावून दोन-चार चितरं, पारवे धरून आनून, त्याच्याव शे-दोनशे रूपय, आन भंगाराचं पाचपन्नास, आसं घर बरं चालत व्हतं. आता गावात फिरू दिना झालेत. चुरून लपून म्या आन माजा नवरा सिनू, रानात जावून एक-दोन चितरं धरून आनतोत, पर ती गावात इकता येइना. पोलीसाला देताव ते से-दोन से रुपय देतील त्याच्यात चार-दोन किलु घव घिऊन, तिच्या कन्या करून खाव लागलोत. आमी बदनाम जातीचे लोक. कुटंबी चोरी झालीत, पारद्याचं (पारधी) बगा, त्ये लइ चोर आस्तत, आसं सांगितलं जातं. आमी मोट्या चोऱ्या केल्या आसल्यातं आसं भंगार गोळा केलं आस्तं का? रानावनात पाकरं मारीत फिरलू आस्तू का? आसं पालीत ऱ्हायलू आस्तू का? आमचं आता लई हाल हू लागल्यात. काय करावा काय कळंना गेलंय.

पयलं गावात जाऊन कुनाच्या नळाचं नाइतर हापस्याचं पानी आनत हुतो. आता गावबंदी झालीय. तुमी गावात यव नका, तुमी आला मजी गावाला बिमारी आली मनून समजा मनून हाकलून देवू लागलेत. आट दिवस आंगुळ नाई. प्याला पानी नाई. सद्या आमची आसी बेकार कंडीसन जाली हाय.

हाताला काय स्यानीटारजर का काय लावा मंतेत. हात साबनानं धॉ मनतेत. साबनानं दोन्दा आंगुळ करा मनालेत. हितं हागुन धुवायला पानी मिळंनाय, आता काय करावं माय?''

तयपा आन बाळू सांगू लागले,

''सायब, आमी वैदवाले. इतं संभर पाली हाईत आमच्या. आतापस्तर फकस्त दोनदा पाच किलू गव्हाचं पीट, दोन किलू तांदूळ


आन यक गोडतोलाचं पाकीट एवडं मिळय बगा. आमचा धंदा मंजी गावात जाऊन आरडायचं, वैदू तुमच्या घरापस्तर आलाय. कुनाला नारू, तापू, ताप खोकला आलंय का? आमी झाडपाल्यानं नीट करताव. गावातल्या मायभयनीकडून जीबी भाजी-भाकर घिऊन पोट भरताव. जुनी कापडं घिऊन सोताची लाज राकताव. पर आता तर गाव बंद झालंय. रस्ते बंद झालेत. इकडं सरकार मनालंय, घराच्या भाएर निगू नका. कवाड लावून बसा. आमच्या पालीला कवाड हाय का सायेब? सरकार मन्तय, लाइट बंद करा. दिवं लावा! आमच्याकडं लाइट बी न्हाय आन दिवाबी न्हाय, आमी आंदारात हाव. आजुक आसं मन्तय टाळ्या वाजवा, थाळ्या वाजवा. आता आमी मरालालाव कुटल्या टाळ्या वाजवावं? आंगात जीव न्हाय. धंदा बंद पडलाय. कुटंतर हिरीत, आडात उतरून यकदोन घागर आनून त्याच्यावर भागवू लागलोय कसंतर. करूनानं पार सत्यानास केलाय आमचा. गावासिवा भटक्याचं काय चालनाय. आता माय जीवू दिना, बाप भीक मागू दिना आसी गत झाली. फकस्त मरायचं न्हायलंय. काय व्हतंय ती बगू. पुडचं हारी पुडं. पयलं कुत्र्याला मसुर (उकिरड्यावरले उष्टे अन्न) खाऊ घालत व्हतो. आता ती मसुरबी आमीच खाऊ लागलाव.''



उदगीर रोडला इनामवाडीच्या वस्तीवर गेलो. तितं कडकलक्षुमीची (पोतराजांची) मोटी वस्ती. पाचपन्नास पालं. त्यांच्यातला प्रमुक रामला बोलीवलं. त्यानं म ला बगितल्या बगितल्या 'रामराम सायेब, राम राम' आसी जोरात आरळी दिली 'अंधार दान इकाड इलास माने वच्छीनाड' (सगळे इकडं या. इलास माने आलेत.) आसं मनल्याबरुबर आजून म्या चटइवर टेकतो ना टेकतो, हा हा मन्ता शे-दीडशे गडी-बाया जमले. त्यांचा गलका, कुत्रे, लेकरं, बाया सगळे घोळक्यानं पटापटा येऊन पुडं उभारल्यानं त्यांना खाली बसवलं. त्यांचा शामराव माज्याबरोबर काम करनारा. त्यांना मन्ला, 'काय हाय ते सगळं सायबाला सांगा आन समद्यांनी सायबाला नमस्कार करा.' सगळ्यांनी हात जोडून नमस्कार केला. जसं साळंत गुरुजीनं आदेश दिल्याव प्रार्थना सुरू व्हते तसं मला वाटलं. मी नवीन मानूस आसल्यानं कुत्रे वकावका भुकत व्हते. त्यांच्यातली काही मानसं कुत्र्याला हाकलत होती. कायी साकळीला बांदीत होती.

''सांगा श्यामराव, तुमचं खान्यापिन्याचं बस्तान कसं चाल्लय?''

''कस्याचं खानं आन कस्याचं पिनं मनलालूच सायेब? गंजी पिऊन दिवस काडताव. यकदा पोलीस गाडी येऊन थोडं थोडं दिवून गेल्ती. काय व्हतंय तिच्यावर? फकस्त गरम पानी पिल्यावानी झालं. पयलं गावात जाऊन, अंबाबाईचं देऊळ बाईच्या डोस्क्याव दिऊन सोंग करून सिळी रोटी कोरड्यास, जुनी कापडं मागुन आनीत व्हतो. त्याच्याव पोट भागायचं. आता पालात बसून दाताचं पानी गिळत न्हायचं. पोलीस गाडी दोनदा येती बग, आन माइक मदून आरडंतय का सगळे घरी न्हावा. बाहीर आलाव तं जेलमदी घालताव बग. ही ऐकून घाबरून चाल्लाव. पालंच्या बाहीर निगंना गेलाव. पयलं रानात सिकारीला जाऊन डुकर, मांजर मिळालं का आनून खात व्हतो. तेबी बंद झालंय. गावातलं सोंगबी बंद झालंय. भागंना गेलंय. काय करावं सायेब, आसला वनवास नसिबाला आलाय.''



''आता सिकारबी मारू दिनात. म्याता (बकरा) मटान सहासे किलू झालंय. किलूबर आमच्या दाडातबी बसत न्हाई.''

राममामा मदीच मन्ला, ''तॉबा! तॉबा! आस्ली दिस कुनावर बी यवुनी रे बाबा! आता आमी वाचत नाइरं. आमचा वनवास आन सीताचा वनवास एक झालाय. लेकरं रोटी रोटी मनत रडलाय. आमापुडं हीर आन मागं आड आसं आमचं झालंय. आता त्वाच काइतर बग.''

मी त्यांना धीर दिला, ''आसं घाबरू नका. हिंमत धरा. काय तं काय मार्ग निगतंय.''

मदीच यलुबाई मन्ली, ''मान्या, प्यायला पंदरापंदरा दिस पानी मिळंनाय. कसं करावं हामी तूच सांग? लेकरंबाळं पोटात घिऊन, कोंबडीच्या पिलाला घिऊन बसल्यावानी बसावं लागलाय. पयलं

सिळ्या भाकरीसंगं रानातलं मटन आनलं की कोरड्यास करायचं, मऊ मटनाचं बारीक मनुक्यावानी कापून उनात वाळू घालायचं. चार महिनं पावसाळ्यात मूठमूठ घालून ती खायचं. आता काइच नाइ. आता पोटाची आग बुजवायला कायी मिळंना गेलंय. मेला करूना आता आमाला खाऊन टाकतंय बग.''

''आपल्याला कोनतं मदत करीन. आसं घाबरून चालत नाई.'' सांगून म्या निलंग्याला लागून अनसरवाडीतल्या गोपाळांच्या वस्तीवर गेलो. तितं तीन-चारशे पालं. शिवराम बंडी धनगर त्यांचा प्रमुख. त्यानं संमद्यांना बोलावून घेतलं. शिवरामनं हाक दिल्याबरूबर शे-दोनशे जमले. म्या त्यांन्ला मन्लो, ''करोनामदे तुमी काय खाऊ लागलाव? कसं भागवताव ती सांगा?''

सकुबाइ उटली. मन्ली, ''इलास मान्या, त्वा आमी मेल्याव यायचा व्हतास. आमी जित हाव का मेलाव मनून आमला बगायला आलास का?'' पुसत ढसाढसा रडू लागली.

त्यातला शिवराम म्हणू लागला, ''करुना मजी काय ती आमाला समजंना. आपले आजोबा, पनजोबा मनायचे हवळ हगवक कसाल आसली बिमारी यायची आन गावच्या गावाला कवाड बसायचं. तसं ही काय तं हाय की सायब? याला औसीद नाई. कोसाला यक दिवा व्हतंय की (एवढे लोक मरतील की कोसावर एखादं घर शिल्लक राहील) आसं मोटे लोक सांगत व्हते.''

डक्कल वाराचा नामदेव काळे सांगू लागला, ''कुनाचं लगीन आसलं तं बारके बारके भगुने घिऊन, वाढगंऽ माय मनत लगीन घरच्याला इनवायची. वाडलं न्हाय तं लोकं जेवल्याल्या मुसऱ्याच्या पतरवाळ्या (लग्नातलं पत्रवाळीवर उरलेलं खरकटं अन्न) जितं टाकल्याल्या त्या ठिकानी आमचे कुत्रे जायचे. कुत्र्याला बगून त्याच्या मागं हामी जायचं. मुसऱ्यासाठी कुत्र्या-कुत्र्यात भांडन लागायची. त्याच्यात आमीबी पतरवाळीवरलं मुसरं आमच्या झुळीत झटकून घेत घरी आनून खात व्हतो.''

''आता लगीन याव बंद झालेत. आमी थोड थोड बाजाबी वाजवायला सिकलाव. या साली यकबी सुपारी न्हाय लग्नाची. सगळंच ठप झालंय.'' डोंबाऱ्याची सकु पोटातलं दुक वकू लागली,

''हामी गावात जाऊन आंग कसरतीचं खेळ कराचो. तारीवरून बाइला चालवनं, दीडीक फुटाच्या रिंग मदून एक गडी एक बाई निगनं. छातीवर दगड फोडनं. मनगटानं दगड फोडनं. बायाला नाचायला लावनं. यावर पोट भरत व्हतो. आता करूनानं हामाला बरबाद केलंय. गावचे लोक वस्तीच्या लोकायना भाइर निगू दिना गेलेत. चोरून लपून निगलोत तं हामची पाट आन पुलिसाची काटी तयारच. आता कसं करावं मन्ता?''

यलप्पा दानगोळे मन्ला, ''आन मानेसायब, सरकार तोंडाला कापड बांदा मनलालय. हामी मानूस मेल्यावर तोंडाला कापड बांदताव. कसला जमाना आलाय. पोरं मायबापालाबी जवळ घेना गेलेत. लांब व्हा लांब व्हा मनालेत. करूना नवरा-बायकूलाबी जवळ



चिटकू दिनाय. लय बेकार जमाना आला तिच्या भनीमारी!''

निलंग्याला माज्या घरापसल्या शिकलकरी वस्तीत गेलो. त्यांचा फुडारी निजाम सिंग टाक, जगदीस सिंग टाकला पुसलो,

''आच्या चल रह्या क्या?''

नीजाम मन्ला, काय का अच्छा, काय का बुरा? सब बरबाद हो गया। करोनानं किसकोबी नई छोड्या. साब, आमी करोना के पयले, पायली, शेर, आटवा, चिपटं, झारी, डेरा ठिवायची तिवइ आसलं बनवून घरूघर जाऊन इकत व्हतो. आब क्या करना साब? करोनानं सब बंद करको डालेय.''

भटक्या-विमुक्तांच्या बेचाळीस जमाती. त्यांच्या पोटजातींनी गावगाड्याच्या बाहीर राहून सेवा केली आहे. त्यांना कोरोनानं ग्रासून टाकलंय. त्यांच्यावर जीव द्यायची पाळी आलीय. त्यांच्याकडं कुनी बगायला तयार नाही. ते सवलतीपासून वंचित आहेत. बाहेरच्या देशातील लोकांना इमानानं आनलं जातंय. आमा भटक्या-विमुक्तांकडं कुनाचं ध्यान जाईना. आमी रस्त्याच्या कडंनी कुठंबी मरून पडलालोत. पोलिसासी गाट पडली तं १४ दिवस पुलिस डांबून ठेवलालेत. आंगुळीची, जेवनाची तरातरा व्हती. आसी इसंगती का?

**– विलास माने (कत्तीकार)**

भ्रमणध्वनी : ९८२२५८४३१३ / ७९७२९३७९३२



**अनुराधा ठाकूर**

# कोरोनाकाळ आणि अर्थकारण व समाजव्यवस्था

**लॉकडाऊनचे परिणाम व सरकारी यंत्रणा**

**स**हा महिन्यांपूर्वी जो शब्दही आपल्याला माहीत नव्हता, कोरोना किंवा कोविड-१९, तो आज आपलं पूर्ण आयुष्य व्यापून बसला आहे. या जागतिक संकटाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम व समाजजीवनातील अपरिहार्य बदल यांचा मागोवा आपण येथे घेत आहोत.

प्रत्यक्ष लॉकडाऊन जरी २५ मार्चला सुरू झाला तरी या संकटाचे परिणाम मार्चच्या सुरुवातीपासूनच दिसू लागले होते. वाहनांची विक्री गेल्या दोन महिन्यांत शून्यावर आली. विजेची मागणी सुमारे १६ टक्के कमी झाली. उत्पादनाचा मानांक १७ टक्के घसरला तर रेल्वेच्या मालवाहतुकीत ३३ टक्के घट झाली.

वर्ल्ड बँक व पतमूल्यांकन संस्था स्टॅन्डर्ड अँड पुअर आणि मूडीज् यांनी आपले कुल राष्ट्रीय उत्पन्न ७ टक्क्यांवरून १.८ टक्क्यावर उतरेल असे भाकीत केले आहे. गेल्या तीस वर्षांतली ही सर्वात कमी वाढ आहे. बेरोजगारीचा दर ७ टक्क्यांवरून २६ टक्के इतका वर पोचला आहे. सुमारे १४ कोटी लोकांनी नोकऱ्या गमावल्या आहेत, तर ४५ टक्के कुटुंबांनी उत्पन्नात घट अनुभवली आहे.

> कोविड-१९मुळे पुढचे बारा महिने अनेक बदल घडतील. कंपन्या व लहान उद्योगांना कार्यपद्धती बदलावी लागेल. शक्य तेवढे कमी कर्मचारी, त्यातील अनेक घरून काम करणारे, यामुळे मोठ्या कचेऱ्यांची मागणी कमी होईल. याचे अनेक फायदेही होतील. स्त्रियांचा कर्मचारीवर्गातला सहभाग वाढेल, अशी एक शक्यताही वर्तवली जात आहे. स्थानिक प्रवाशांचा प्रवास कमी झाल्याने वाहतूकव्यवस्थेवरील ताण कमी होईल व प्रदूषण तेवढे कमी होईल अशी आशा आहे. ट्रॅफिक जॅमने त्रासलेल्या महानगरातील नागरिकाला काही दिलासा मिळेल.

लॉकडाऊनच्या पहिल्या २१ दिवसांत रोज भारतीय अर्थव्यवस्था सुमारे ३२००० कोटी रुपयांचे नुकसान सोसेल असा अंदाज होता. नेहमीच्या फक्त २५ टक्के आर्थिक उलाढाल या काळात झाली. ज्याला आपण रोजच्या वापरातील जलद हलणारे पदार्थ (FMGC) म्हणतो- साबण, टूथपेस्ट, बिस्किटे वगैरे - ते बनवणाऱ्या कंपन्यांनी उत्पादनात लक्षणीय घट केली.

या सर्वाचा सर्वात मोठा फटका बसला तो असघंटित क्षेत्राला व रोजगारावर काम करणाऱ्या मजूरवर्गाला! शेतकरीवर्गालाही धग लागली. विशेषत: भाज्या, फळे इत्यादी नाशिवंत पिके घेणाऱ्यांना. इतर धान्ये व कापूस पिकवणारा शेतकरीही हतबल अवस्थेत दिवस काढत आहे. मिळणाऱ्या हमीभावाची या संकटकाळात त्याला खात्री वाटत नाही. असहाय्य मजुरांचे आजपर्यंतच्या इतिहासातले सर्वात मोठे स्थलांतर व त्यासंबंधित बातम्या आपण रोज पाहत आहोत. अन्नधान्याचे भरपूर पीक असणाऱ्या व ते साठवायला पुरेशी गोदामे नसणाऱ्या आपल्या देशातील मोठ्या कामकरीवर्गाला उपासमार सहन करावी लागत आहे, ही वरपासून खालपर्यंत सगळ्यांना शरमेची गोष्ट आहे.

या काळात वाहनउत्पादन, विमानसेवा, हॉटेल्स व हॉस्पिटॅलिटी, दळणवळण या साऱ्यांशी संबंधित कंपन्यांनी कर्मचारीकपात व पगारकपात यांचा अवलंब केला आहे.

सरकारने या काळात अनेक महत्त्वाच्या योजना घोषित व कार्यान्वित केल्या आहेत. अन्नसुरक्षा, आरोग्य, लहान व मध्यम उद्योग अशा अनेक क्षेत्रांना अनेक सुविधा व सवलती देण्यात आल्या आहेत. १२ मे रोजी पंतप्रधान मोदींनी १२ लाख कोटी रुपयांचे प्रोत्साहन प्रस्ताव (Stimlus Proposals) राष्ट्रापुढे घोषित केले. २२ मे रोजी रिझर्व्ह बँक गव्हर्नर शक्तिकांता दास यांनी रेपो रेट ४ टक्क्यांपर्यंत खाली आणला. या मूळ व्याजदारावर बँका आपले व्याजदर ठरवतात. कर्जदारांना देण्यात आलेली ३ महिन्यांची वाढीव मुदत ६ महिन्यांपर्यंत वाढवण्यात आली. श्री. दास यांनीही कुल राष्ट्रीय उत्पन्नवाढ शून्य किंवा उणे असू शकेल असे म्हटले आहे.

हे सारे होऊनही शेअर बाजार खाली खाली घसरत आहे. १ जानेवारी २०२० रोजी तो ४१,२५३ होता तो आज ३०,६७२ आहे (२४ मे). या तीन महिन्यांत तो २५.६५ टक्क्यांनी खाली घसरला आहे. त्याचे कारण एकतर जागतिक मंदी व दुसरे म्हणजे रोज वाढत जाणारे कोरोनाग्रस्तांचे आकडे. इतकी पावले उचलूनही कुणाला खात्री वाटत नाही की हे पुरेसे आहे.

२४ मेच्या आकडेवाडीनुसार भारतात १,३२,६७४ लोकांना कोरोनाची लागण झाली आहे. (तर ३,७२० लोक मृत्यू पावले आहेत.) महाराष्ट्रात ही संख्या ४७,००० आहे. (भारतच्या ३५%) व मुंबईत २८,००० आहे. (भारताच्या २१%)

सामाजिक दृष्ट्या पाहता आपली जीवनशैली गेल्या दोन महिन्यांत आमूलाग्र बदलली आहे. ऑफिसेस, शाळा-कॉलेजेस बंद त्यामुळे साऱ्यांचे 'वर्क फ्रॉम होम' चालू आहे. अनेक क्लासेस, मीटिंग्ज आता व्हिडिओमाध्यमातून होतात. त्यामुळे टीम्स, झूम हे शब्द रोजच्या जीवनात अपरिहार्य झाले आहेत. कालतर मी अडीच तासांचा एक कार्यक्रम यूट्यूबवर पाहिला. आमंत्रितांना लिंक पाठवली होती.

रस्ते रिकामे, प्रदूषण नाही, ध्वनिप्रदूषणही नाही. घरात मात्र धुणीभांडी, कचरा-लादी, स्वयंपाक सारे काम करावे लागते. चार दिवस कामवाली आली नाही तर कुरकुरणारे आपण, सारे आता निभावून नेत आहोत.

कोविडबाबत दोन संभाव्यता दर्शवल्या जातात.

१) V शेप रिकव्हरी -

सुमारे सप्टेंबरपर्यंत परिस्थिती काबूत येईल व २०२०-२१ हे वर्ष कठीण जाईल. एक वर्षानंतर परिस्थितीत सुधारणा होईल.

२) U शेप रिकव्हरी -

जोपर्यंत लस बाजारात उपलब्ध होत नाही तोपर्यंत आपल्याला कोविडबरोबरच जगायचे आहे व त्याचे चढउतार होत राहतील. स्थिती पूर्वपदावर येण्यास दोन वर्षे लागतील.

**कोविड काबूत आल्यानंतरचे जग कसे असेल व आपली जीवनपद्धती कशी बदललेली असेल?**

या संक्रमणाच्या व त्यानंतरच्या १-२ वर्षांच्या काळात काही उद्योगधंदे अडचणीत येतील तर काहींना नवे वळण मिळेल. नवीन गुंतवणूक मात्र थांबली आहे.

मंदीचा फटका जाणवणारे उद्योगधंदे-

१) प्रवास व पर्यटन - हा उद्योग सर्वात प्रथम अडचणीत आला. विमाने, गाड्या बंद त्यामुळे हॉटेल्सचा धंदा बसला. हॉटेल्स, प्रवास व पर्यटनक्षेत्रास सुमारे ८५०० रुपये कोटींचा फटका बसला आहे. अजून वर्षभर तरी लोक कारणाशिवाय प्रवास करणे टाळतील व वरील व्यवसाय मंदीत राहतील असा अंदाज आहे.

२) करमणूकक्षेत्र - यात सिनेमा, नाटके व इतर अनेक मनोरंजनाचे प्रकार मोडतात. या क्षेत्रातील व्यवहार ठप्प झाले असल्यामुळे रोजगारावर किंवा करारावर काम करणाऱ्या लोकांना बेकारीला तोंड द्यावे लागत आहे व अशा ६ कोटी लोकांना मदत करावी अशी मागणी या उद्योगाच्या संघटनेने केली आहे. या २ ते ३ महिन्यांतला सिनेमा उद्योगाचा तोटा सुमारे २०० ते २५० कोटी होईल असे वाटते.

३) वाहने - एकूण आर्थिक अस्थैर्यामुळे नागरिक वाहनखरेदी पुढे ढकलण्याची दाट शक्यता आहे. लॉकडाऊनमुळे अवजड वाहने व बसेस यांचीही मागणी घटली आहे. छोट्या मोटारी व बाईक्स यांची वार्षिक विक्री सुमारे ४० लाख युनिट्सने कमी होईल असा अंदाज काही तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

४) कापड व वस्त्रोद्योग - कामगारांचे स्थलांतर, कच्च्या मालाचा अनियमित पुरवठा व मागणीतील घट यामुळे या उद्योगालाही फटका बसला आहे. एकेकाळी या उद्योगात निर्यातीसाठी प्रसिद्ध असलेल्या भारताला बांगलादेश, व्हिएतनाम व कंबोडिया या देशांनी जोरदार शह दिला आहे.

५) सप्लाय चेन्स (पुरवठासाखळ्या) - हा उद्योग इतर उद्योगांना पाठबळ देतो व या साखळ्या मजबूत नसतील तर सर्व उद्योगांवर परिणाम होतो. मजुरांचे स्थलांतर, ट्रकमधून होणारी वाहतूक खंडीत होणे, कामगारांचा तुटवडा, यामुळे सर्वत्र परिणाम झाला आहे. काही कंपन्या आता रिव्हर्स सप्लाय चेन पद्धत सुरू करताहेत. वितरणकेंद्रातून दुकानात मला जात नाही म्हणून या कंपन्या (डिमार्ट, मेट्रो कॅश अँड कॅरी) स्वत:चे कामगार व ट्रक्स पाठवून माल आणत आहेत. या सप्लाय चेन जेव्हा अकार्यक्षम होतात तेव्हा एकूणच उत्पादकतेवर विपरीत परिणाम होतो.

एक लक्षात घ्यायला हवे, की आपल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या आयातीपैकी ४५ टक्के आयात चीनमधून होते. आपल्या मशिनरी व सेंद्रीय रसायन खरेदीपैकी अनुक्रमे ३३ टक्के व ४० टक्के आयात चीनमधून होते. ६५ ते ७० टक्के बल्क ड्रग्ज (API) आपण चीनकडून घेतो, तर ९० टक्के मोबाइल चीनमधून येतात. इतके आपण चीनवर अवलंबून आहोत. अमेरिका व इतर काही राष्ट्रांची गतही आपल्यासारखीच आहे.

**१९३० चे ग्रेट डिप्रेशन, २०००च्या सुमाराचा डॉट कॉम**

**बबल व २००८ चा मेल्टडाऊन याहीपेक्षा जास्त प्रमाणात जगाच्या कार्यपद्धतीत कोविड-१९मुळे बदल होतील असे जाणकारांना वाटते.**

भविष्यात वाढीची क्षमता असणारे उद्योग-

१) FMGC and Retail - एकूण असुरक्षितता व संभाव्य अनुपलब्धतेची भीती यामुळे जीवनोपयोगी वस्तू, अन्नधान्य यांचा साठा करण्याची प्रवृत्ती वाढेल व त्यामुळे अशा उद्योगांना बरकत येईल.

२) विशिष्ट रसायने - जंतुनाशके, औषधे, सॅनिटायजर यांचा वापर व मागणी वाढल्याने त्यासाठी वापरली जाणारी रसायने भरपूर खपतील.

३) औषधोद्योग - जरी API साठी आपण चीनवर अवलंबून असलो तरी फॉर्म्युलेशन्समध्ये भारत बराच आघाडीवर आहे. कोविड-१९च्या संभाव्य लसीसाठी (Vaccine) ज्युबिलीयन्ट लाईफ सायन्सेस, सन फार्मा, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया इत्यादी कंपन्यांनी अस्ट्रा झेनेका, ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी, गिलार्ड, मोडर्ना या संशोधनात बऱ्याच पुढे गेलेल्या विदेशी कंपन्या/विद्यापीठे यांच्याशी टायअप करण्याचा प्रयत्न चालवला आहे. झायडस कॅडीला, भारत बायोटेक व इतर चार भारतीय कंपन्याही संशोधन करत आहेत. १२५ कोटी लोकांची मागणी पाहता औषधोद्योगाचे चांगले दिवस चालूच राहतील.

४) एज्युटेक - बायजूसारख्या अनेक कंपन्या ऑनलाइन एज्युकेशनमध्ये शिरल्या आहेत. मुलांचा व पालकांचा या माध्यमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन या काळात सकारात्मक होत चाला आहे. त्यामुळे या उद्योगात अनेक नवीन प्रयोग होतील व भौगोलिक अंतर हा अडथळा शिक्षणाच्या अनेक क्षेत्रांत (जवळपास) दूर होईल.

कोविड-१९ मुळे पुढचे बारा महिने अनेक बदल घडतील. कंपन्या व लहान उद्योगांना कार्यपद्धती बदलावी लागेल. शक्य तेवढे कमी कर्मचारी, त्यातील अनेक घरून काम करणारे यामुळे मोठ्या कचेऱ्यांची मागणी कमी होईल. तुम्ही जर चेन्नई, बंगलोर, हैदराबाद येथील माहिती-तंत्रज्ञानाच्या समूहात (IT Cluster) गेलात तर लाखो चौरस फूट क्षेत्रफळाच्या भव्य इमारती व वारुळासारखी आतबाहेर करणारी माणसे हे चित्र गेली १०-१५ वर्षे दिसते आहे. ते बदलू शकेल. टीसीएस, इन्फोसिस या कंपन्यांनी तशा दिशेने पावले टाकायला सुरुवात केली आहे.

याचे अनेक फायदेही होतील. स्त्रियांचा कर्मचारीवर्गातला सहभाग वाढेल, अशी एक शक्यताही वर्तवली जात आहे. स्थानिक प्रवाशांचा प्रवास कमी झाल्याने वाहतूकव्यवस्थेवरील ताण कमी होईल व प्रदूषण तेवढे कमी होईल अशी आशा आहे. ट्रॅफिक जॅमने त्रासलेल्या महानगरातील नागरिकाला काही दिलासा मिळेल.

### न्यू नॉर्मल

परिस्थिती नेहमीसारखी कधी होणार असे विचारणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे की 'नेहमीसारखी' यातल्या 'नेहमी'ची व्याख्याच बदलावी लागेल. ती पूर्ववत होणार नाही. कोविड-१९चे परत परत आक्रमण, त्याचे उत्परिवर्तन (म्युटेशन) याची शक्यता ओळखून पुढची वाटचाल करायला हवी. देशांना आत्मपरीक्षण करावे लागेल. उद्योगधंद्यांना नव्या वास्तवानुसार बदलावे लागेल.

आजपर्यंत तंत्रज्ञान हे मुख्य उद्योगाला पूरक, आधारात्मक असे होते. आता तंत्रज्ञान हे मुख्य उद्योगाचा अत्यंत महत्त्वाचा भाग बनेल. त्यावर होणारा खर्च कमर्चारीवर्गावर होणाऱ्या खर्चाहून वाढू शकेल. तसेच, ज्या कंपन्या पर्यावरणाचे जतन व भविष्याच्या दृष्टीने संवर्धन करतील, त्यांना महत्त्व येईल.

**माहिती व अंकात्मक पद्धती (Deta And Digital) हे नव्या जगाचे इंधन ठरेल.** आपण आताही क्लाऊड, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial intelligence) याचा उपयोग करतो आहोत. सरकार व खाजगी क्षेत्राला या साधनांचा वापर किती कार्यक्षमतेने करता येतो- विशेषत: रोगराई, रोगनिर्मूलन, गैरमाहितीच्या प्रसाराला आळ घालणे व इतर अनेक गोष्टींसाठी - याचा अंदाज आला आहे व अनेक नवीन गोष्टींसाठी याचा उपयोग केला जाईल. आज कोविड-१९ शी लढतानाही त्याचा प्रसार, रुग्णसंख्या, बरे होण्याचा वेग अशा अनेक गोष्टींची माहिती डेटामुळे उपलब्ध होत आहे व प्रतिबंधक उपाययोजना करतानाही त्याचा फार उपयोग होत आहे व होईल.

### सामाजिक व वर्तणुकीतील बदल

आपण गेल्या दोन महिन्यांत कितीतरी बदललो आहोत. लॉकडाऊन झाला तेव्हा सुन्न मनाने आता कसे काय दिवस काढायचे असा विचार करणाऱ्या आपण घरबसल्या व्यग्र राहण्याचे अनेकानेक उपाय शोधले आहेत. स्मार्टफोन हा आपल्या व बाहेरच्या जगाला जोडणारा पूल झाला आहे, फक्त बोलण्यापुरता व फारतर व्हॉट्सॲपपुरता फोन वापरणाऱ्या अनेक लोकांना- यात विशेषत: साठीनंतरची मंडळी आहेत. तरुण पिढी तर आधीपासूनच तंत्रज्ञानाधीन होती - आता व्हिडिओ चॅट ग्रुप कसे करायचे, यूट्यूबवर अनेक करमणुकीची साधने आहेत- सिनेमे, मालिका, नाटके, व्याख्याने, गाणी - त्यांचा कसा वापर करायचा इत्यादी सारे आता आत्मसात झाले आहे. त्यात टीम्स, झूम वापरून मीटिंग्ज कशा घ्यायच्या, लिंक कशी वापरायची अशा अनेक गोष्टी आल्या. **खरेतर या साऱ्या गोष्टी एकेका क्लिकसरशी होतात पण साठीपुढच्या माणसांना एक मानसिक अडसर होता, तो दूर झालाय हे फार महत्त्वाचे आहे.** वेबिनार व अनेक उपक्रमांना ऊत आलाय. दिवसाचे चोवीस तास आता पुरत नाहीत. गाण्याचे क्लासेस, मैत्रिणींच्या गप्पा, सारे ऑनलाईन!

आम्ही चार चुलत/आतेबहिणी. अर्ध्या ठाण्याला, अर्ध्या दादरला. दर तीन-चार महिन्यांनी एका ठिकाणी भेटायचो. सगळ्या सत्तरीपुढल्या! आता चॅट ग्रुपवर आठवड्यातून एकदा भेटतो, भेंड्यासुद्धा खेळतो. आता ठरवले आहे लॉकडाऊन उठला तरी असेच भेटायचे. उगीच वेळ वाया जायला नको आणि गाडीचे पेट्रोल फुकट जायला नको.

वेगवेगळ्या शहरांत आपापल्या घरी बसून कलाकार कार्यक्रम सादर करतात व आपण तो एकसंधपणे बघतो. माणिक-मोतीसारख्या सुंदर कार्यक्रम वर्मा भगिनींनी सादर केला व माणिकताईंच्या अगणित चाहत्यांनी तो ऐकला व आनंदाचा उपभोग घेतला.

**भविष्याचा मागोवा**

कालपरवाच एका वेबिनारमध्ये चीनमध्ये स्थायिक झालेल्या भारतीय उद्योजकांनी तिथले अनुभव सांगितले. वुहानमध्ये जरी कोविड-१९चा जोर होता, तरी संपूर्ण चीन दोन महिने लॉकडाऊनमध्ये होता. हळूहळू उघडताना काही गोष्टी त्यांनी अनुभवल्या. आपल्याकडे यानंतर काय घडेल, किंबहुना घडायला हवे, त्याची एक झलक यावरून मिळते.

मानवी आयुष्य व उपजीविका (Lives and livehood) यांचा समतोल साधणे हे अत्यावश्यक व अनिवार्य आहे. चीनमध्ये (व आपल्याकडेही) इ-कॉमर्स फार जलद गतीने वाढत आहे. आरोग्यसेवा हा महत्त्वाचा विषय बनला असून त्यातील मूलभूत सुविधांवर फार मोठ्या प्रमाणात खर्च व भर दिला जात आहे. अन्न, पेये, वाणसामान, कपडे या जीवनावश्यक वस्तूंची मागणी व उत्पादन वाढले आहे. त्यातही आरोग्यदायी व प्रतिरोधक (Immunity) पदार्थ- हळद, आले यांचा पेयातील वापर भरपूर वाढला आहे. (आपण ज्याला दूध-हळद म्हणजे त्या 'टर्मरिक लाटे'ची फॅशन अमेरिकेत फोफावली आहे, माहीत आहे ना?) याउलट वाहने, इलेक्ट्रॉनिक्स या वैकल्पिक खर्च (Discretionory Spending) वर्गात मोडणाऱ्या गोष्टींची मागणी घटली आहे. आपल्या व्हॉट्सअॅपसारख्या चीनमधील अॅपवर आता ग्राहक ग्रुप केले आहेत व शेकडो पुरवठादार आपला माल त्यावर दाखवत असतात- वर्णन व किमतीसकट. त्यामुळे ग्राहक थेट पुरठवदाराकडून माल विकत घेतो. हा व्यवहार फक्त त्या दोघांपुरताच खाजगी राहतो.

कमीत कमी स्पर्श- हाही एक न्यू नॉर्मल. स्टारबक्स या कॉफीशॉप्सने आपोआप (सेन्सरने) उघडणारी दारे बसवली आहेत, म्हणजे हॅन्डलला हात लावायला नको. कॅश/कार्ड देणे-घेणे हेही मशीनवर, माणसाशी संपर्क नाही. कॉफी द्यायला फक्त काउंटरवर माणूस. मोठमोठ्या हॉटेलातही अत्यंत सुंदर कप पण ते कागदाचे. दवाखाने, हॉटेल्स सर्वत्र एकवापर (Disposable) पेपरचा वापर होतो. कागद उद्योगाला भविष्य नाही म्हणणाऱ्यांनी बघावे, केवढ्या संधी आहेत. जग कसे बदलते आहे याची यावरून कल्पना यावी.


मला वाटते, कोविड-१९चा हा एक दूरगामी फायदा झाला आहे. सर्व सुरळीत झाल्यावरही माणसे शहाणी होतील, धडा शिकतील. पूर्वीइतकी गर्दी मॉलमध्ये, सिनेमागृहामध्ये कदाचित दिसणार नाही.

पूर्वी माणसे क्षुल्लक कारणासाठी व कारणाशिवायही प्रवास करायची. ती सवय थोडीफार तरी मोडेल. एकतर कोविड-१९चा हिसका असा जबरदस्त बसला आहे, की असे झाले आहे व परत असे काही होऊ शकते ही भीती आहे. तसेच घरात राहून मन रमवायची अनेक साधने आता सर्वांना परिचित झाली आहेत. अर्थात मानवी सहवास, शरीराची बोलीभाषा, नजरेने होणारे संप्रेषण या गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे डिजिटल माध्यम हे परिपूर्ण असणार नाही. प्रत्यक्ष भेटीगाठी, मीटिंग्ज या कराव्याच लागतील.

हा काळ आपण फार जपून वापरायला हवा. आपल्या हयातीत आजपर्यंत जग असे कधीच थबकले, थिजले नव्हते. सर्वच गोष्टींचा साधकबाधक विचार करण्याचा हा काळ आहे. आपण सर्वांनी योग्य दिशेने विचार केला पाहिजे. ज्या सामूहिक चुकांमुळे आज या अवस्थेप्रत पोहोचलो, त्या चुका प्रकर्षाने टाळून पुढे जायला हवे. जीवनशैलीत जे सकारात्मक बदल झाले आहेत, ते तसेच अंगी बाणवायला हवेत. हे आपण केले तर आपण निश्चितपणे, सुरक्षितपणे निभावून जाऊ. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशी विपत्ती परत येणार नाही याची काळजी घ्यायला हवी. मनुष्य इतिहासापासून काही शिकला नाही, म्हणून इतिहासाची पुनरावृत्ती होत राहिली. आपण मात्र या आपत्तीपासून खूप काही शिकलो आहोत, ते व्यर्थ जाऊ नये. उद्याचे भवितव्य सुरक्षित घडवण्यासाठी या अनुभवाचा सदुपयोग करायला हवा.

**- अनुराधा ठाकूर**
anuradha333@gmail.com

ग्रंथाली




अस्वस्थ तांडा

**डॉ. विजय जाधव**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

किटाळ

**लक्ष्मण माने**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**





**धनंजय गांगल**

# मनुष्यच अप्रस्तुत होईल!

**वि**चारवंत आल्विन टोफलेर याने ७०-८० च्या दशकात 'थर्ड वेव्ह' आणि 'फ्युचर शॉक' अशा दोन पुस्तकांतून मानवी इतिहासाची तीन युगांत विभागणी केली. १७व्या शतकापर्यंत 'कृषी'युग, १८ ते २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत 'औद्योगिक' युग आणि त्यानंतर 'माहिती'युग. जवळपास याच सुमारास मोठ्या एकत्र कुटुंब पद्धतीतून लहान कुटुंबात आणि त्यानंतर एकटे राहणे सोयीस्कर आणि आर्थिक दृष्ट्या शक्य होऊ लागले. हे बदल कुटुंबाच्या रचनेत घडले, पण व्यवसायासाठी मात्र रोज एकत्र, एका ठिकाणी - कार्यालयात ८ ते १० तास काम करण्याची पद्धतच अजून रूढ आहे. कारखाने, मॉल्स, अनेक सेवा अशा आहेत, तेथे एका जागी एकत्र येऊन काम करण्याची गरजच आहे. एकूणच अजूनही 'औद्योगिक' युगातील कार्यालयात एकत्र काम करण्याची पद्धतच रूढ आहे. आल्विन आज असता तर त्याने येणाऱ्या युगाला 'विषाणूयुग' म्हणून संबोधले असते. आजचे जागतिक मानवी व्यवहार हे आंतर्देशीय वस्तू, सेवांचे आदान-प्रदान आणि इंटरनेटवरील लक्षावधी संगणकप्रणालीत एवढे गुंतलेले आहे की एक विषाणू मग तो जैविक असो की अजैविक, काही मिनिटांत, तासांत, दिवसांत या सर्व सामाजिक व्यवस्थेला छेद देऊ शकतो आणि तिचा डोलारा कोसळवू शकतो. मनुष्यजातीची आपण श्रेष्ठ असल्याची मग्रुरी पार धुळीला मिळवू शकतो. कोरोना व्हायरसने हे सिद्ध केले.

> येणाऱ्या दशकांबद्दल एक असे भाकीत आहे, की स्वयंचलित यंत्र, रोबोटिक्स, ऑटोमेशन यातल्या प्रगतीमुळे भविष्यात मनुष्यच 'इररेलेवंट' अप्रासंगिक, अर्थहीन, क्षुल्लक होईल. भविष्यातील कारखान्यात फक्त दोनच कर्मचारी लागतील! एक माणूस आणि दुसरा श्वान म्हणजे कुत्रा. कुत्र्याचे काम काय तर कोणालाही अगदी या पहिल्या कर्मचारी माणसालासुद्धा कुठल्याही स्वयंचलित यंत्राला हात लावून द्यायचा नाही! मग त्या पहिल्या कर्मचारी माणसाचे काम काय? तर या श्वानाला खाणे-पिणे देणे आणि त्याची काळजी घेणे एवढेच! ह्यातली अतिशोयोक्ती सोडली तरी येऊ घातलेल्या बदलांचे संकेत यात आहेत. या बदलाला सामोरे जाऊया.

आजाराच्या एखाद्या जागतिक साथीमुळे संपूर्ण जनजीवन ढवळून निघते. तसेच त्याचे अर्थकारण आणि समाजकारणावर गंभीर परिणाम होतात. गेल्या काही शतकांतील जागतिक साथींचा इतिहास पाहिला तर गांभीर्याची जाणीव होईल. १३४०-५० च्या दशकात रोगट उंदरांमुळे पसरलेली प्लेगची महासाथ. यात जवळपास ५ ते ७ कोटी लोक मरण पावले असे म्हणतात. १८५० च्या दशकातील कॉलराची साथ - यात जवळपास १० लाख लोक; १८९०ची फ्ल्यूची साथ, यात जवळपास १० लाख दगावले. १९१०ची कॉलराची साथ. हिचा उगम भारतात झाला आणि पुढे ती जगभर फैलावली. यातही जवळपास लाख लोक दगावले. मग १९१८ची परत स्पॅनिश फ्ल्यूची महासाथ, यात पहिल्या महायुद्धापेक्षा जास्त म्हणजे ५ कोटी लोक मरण पावले. १९५६ची आशियाई फ्ल्यूची महासाथ, यात १५ ते

२० लाख लोक दगावले. त्याच सुमारास आलेली हाँगकाँग फ्ल्यूची महासाथ अशी काही उदाहरणे आठवतात.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास, टेलिग्राफ म्हणजे 'तार' पाठवण्याच्या सॅम्युएल मोर्से याच्या तंत्रज्ञानामुळे यश आले आणि जगाच्या एका टोकापासून दुसरीकडे काही तासांत निरोप किंवा बातमी पोचणे शक्य झाले. पुढे रेडिओ तंत्रज्ञान आल्यापासून एकाचवेळी विस्तृत भूभागात पसरलेल्या अनेकांना संपर्क करण्याच्या शक्यता वाढल्या. ९० च्या दशकात एसटीडी, आयएसडीच्या जाळ्याचा उपयोग करत गणपती दूध पिण्याची अफवा देशभर नव्हे, जगभर काही तासांत पसरली. आज इंटरनेटने ते अंतर काही सेकंदावर आणले आहे. इंटरनेटच्या सामाजिक-सांस्कृतिक परिणामांबद्दल एक भाकीत असे होते, की देश, धर्म, जाती, भाषा हे भेद नष्ट होऊन जग हे एक ग्लोबल व्हिलेज बनेल. प्रत्यक्षात देश, धर्म, जाती, भाषा यांच्या सीमारेषा अधिकच गडद झाल्या - तो एक वेगळाच विषय आहे. त्याचबरोबर एकमेकांपासून दूर दूर असूनही एकत्र काम करण्याच्या शक्यताही इंटरनेटमुळेच निर्माण झाल्या. त्यामुळेच 'वर्क फ्रॉम होम' अर्थात घरून काम करणे दैनंदिन व्यवहारात आणणे शक्य होत आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या सर्वात मोठ्या कठीण परिस्थितीचा आपण सामना करत आहोत असे अनेक अर्थशास्त्रज्ञ भाकीत करत आहेत. थॉमस फ्रीडमनचे 'The world is flat' हे बेस्ट-सेलर पुस्तक साधारण २००५ साली आले. त्यात फ्रीडमनची मांडणी अशी होती, की ग्लोबलायझेशन, लिबरलायझेशन, इंटरनेट म्हणजे जागतिकीकरण, उदारीकरण आणि माहिति-तंत्रज्ञान यामुळे ज्ञान, वस्तू, भांडवल, श्रम आणि पर्यायाने उद्योजकता यांचे दळणवळण जगभर सुलभ होत आहे. देशांच्या सीमारेषा पुसत चालल्या आहेत. आता अनेक 'संधी' जगाच्या पाठीवर सर्वांना समान उपलब्ध आहेत. या अर्थाने जग गोल नसून आता ते सपाट म्हणजे Flat झाले आहे! आणि तुलनेने आता संधी मिळणे सोपे झाले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर इंडिया टुडे टीव्हीचा राहुल कंवल याने २८ एप्रिलला त्यांची मुलाखत घेतली. त्यांचे मत आहे की जग अजूनही सपाट म्हणजे Flat च आहे आणि कोरोनाच्या पार्श्वभूमीवर इंटरनेटला जास्तच महत्त्व येणार आहे. मात्र हेही खरे आहे, की कोरोनाच्या तडाख्याने बहुतेक देशांचे इतके अतोनात आर्थिक नुकसान झाले आहे, की आगामी काळात या देशांची परराष्ट्रधोरणांपेक्षा देशांतर्गत धोरणाला प्राथमिकता राहील. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आत्मनिर्भर योजना' जाहीर करून आर्थिक राष्ट्रवादाची मुहूर्तमेढ रोवली आहे. अमेरिकेच्या आगामी राष्ट्रपती निवडणुकीत राष्ट्रवादाची आणि पर्यायाने जागतिक राजकारणाची दिशा आणखी स्पष्ट होईल. जागतिकीकरणाच्या विरोधाची प्रक्रिया आणखी गतिमान होईल आणि राष्ट्रवादी विचारांचे प्राबल्य वाढेल. लोकांचे शासनावरचे अवलंबित्व वाढत राहील आणि त्याचे रूपांतर अधिक आक्रमक राष्ट्रवादात होईल. १९१९च्या व्हर्सायच्या कराराने आधुनिक राष्ट्रवादाला जन्म दिला होता. पहिल्या महायुद्धाचा शेवट होऊन यावर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत आणि पुन्हा जग त्याच उंबरठ्यावर उभे आहे.

कोरोना विषाणूसंसर्ग हा व्यक्तींच्या प्रत्यक्ष संपर्कामुळे पसरतो. महाराष्ट्रात कोरोनाग्रस्तांची संख्या इतर राज्यांच्या तुलनेनत जास्त आहे. त्यामुळे राज्य सरकारने खासगी कंपन्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' करण्याची मुभा द्यावी असेही म्हटले आहे. कोरोना विषाणूसंसर्गाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अनेक संस्थांनी 'वर्क फ्रॉम होम' लागू केलेले आहे. खरे तर गेली एक-दीड दशक खासगी कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना लॅपटॉप आणि मोबाइल देऊन २४ x ७ म्हणजे २४ तास, सातही दिवस, अगदी घरी, सुट्टीत, रजेवर बाहेरगावी असतानाही कामाशी बांधून घेतले आहे. हे एकप्रकारे 'वर्क फ्रॉम होम'च होते. पण, आता आठवडे आठवडे आणि पूर्ण वेळ वर्क फ्रॉम होम करावे लागणार आहे. हे म्हणावे तितके सोपे नाही. सर्वच कर्मचाऱ्यांकडे घरी डेस्कटॉप किंवा लॅपटॉप असतात असे नाही. अनेकांकडे ते नसल्याने पर्यायी व्यवस्था करून द्यावी लागत आहे. काहींकडे लॅपटॉप डेस्कटॉप आहेत, पण आवश्यक ती सॉफ्टवेअर नाहीत. ती एक वेगळीच जबाबदारी. काहींच्या घराजवळ पुरेसे नेटवर्क नसल्याने अडचणीत भर पडत आहे. काहींचे ग्राहक परदेशी असल्याने कामाच्या वेळा विचित्र आहेत. या वेळेत घरून काम करणे शक्य होत नाही. 'कॉन्फरन्स कॉल' असल्यास उत्तम नेटवर्क गरजेचे ठरते. त्यात अडचणी येत आहेत. अर्थात सगळीच कामे घरून करण्यासारखी नसतात. कारखान्यात, मोठमोठ्या यंत्राशी संबंधित, दुकाने, अनेक सेवा या जेथल्या तेथे पुरवाव्या लागतात. तिथे 'वर्क फ्रॉम होम' उपयोगाचे नाही. व्हॉट्सअँप विद्यालयात 'वर्क फ्रॉम होम'वरून हल्ली विनोदी पोस्ट्सचा वर्षाव सुरू झाला आहे. 'पाकिस्तानमध्ये लोकांना वर्क फ्रॉम होम सांगितले. तर, एकाने घरातच बॉम्ब फोडला!'!; कामवाल्या बाईचा निरोप... 'वर्क फ्रॉम होम'! कुठे कंडोमचा खप वाढेल असे भाकीत तर कोणी घटस्फोट वाढतील असे म्हटले आहे.

कार्यालयीन सहकाऱ्यांपासून तुम्ही फिजिकली दुरावता. सहकाऱ्यांसोबत एकत्र नाश्ता, लंच, गप्पा तुम्ही मिस करणार आहात. समोरासमोर जो संवाद होतो, तो खरेच महत्त्वाचा असतो. पण, ही भरपाई करण्यासाठी तुम्ही त्यांच्याशी सतत संपर्कात राहू शकता. दुसरीकडे कार्यालयीन कामासाठीदेखील सतत संपर्कात राहण्याची तत्परता तुम्ही दाखवायला हवी. यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, कॉन-कॉल, ग्रुप चॅटिंगचे पर्याय आहेत. अगदी जगभर पसरलेल्या कर्मचाऱ्यांना एकत्र काम करण्यासाठी अनेक प्रणाली उपलब्ध आहेत. व्हिडीओ, कॉन्फरेन्स कॉल, स्क्रीन शेअरिंग, चॅट अशा एक ना अनेक गरजा भागवणाऱ्या आणि निर्णय घेण्यास उपयुक्त ठरणाऱ्या प्रणालीला 'कोलॅबोरेशन प्लॅटफॉर्म्स' म्हणतात. कॉन्फ्लुएन्स, बिट्रिक्स २४, वर्कप्लेस बाय फेसबुक असे शंभरएक वेगवेगळे प्लॅटफॉर्म्स वापरले जातात. लिनक्स, विंडोज, मॅक, आयओएस, अँड्रॉइट आणि वेब अशा सगळ्या माध्यमांसाठी उपलब्ध असणं महत्त्वाचे.

घरून काम करताना प्रवासाचा खूप वेळ वाचत असल्यामुळे नेहमीपेक्षा अधिक क्षमतेने करणे शक्य असते, त्याचबरोबर आजूबाजूचे वातावरण मात्र कौटुंबिक असते. कार्यालयीन नसते. त्यामुळे कॅज्युअलनेस येण्याची शक्यता असते. घरून काम करत असलो तरी आपल्याला तेवढेच कार्यालयीन तास काम करायचे आहे, किंबहुना थोडा जास्त वेळ काम करण्याची अपेक्षा केली जाते. तुमची आसनव्यवस्था योग्य हवी. बसायची जागा नीट नसल्यास तुम्हाला पाठदुखीचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे ऑफिसप्रमाणेच एखादी टेबल-खुर्ची किंवा फोल्डेबल वॉल टेबल वगैरेची व्यवस्था करावी. तुम्ही ऑफिसमध्येच बसला आहात अशी मानसिकता ठेवावी, जेणेकरून घरातल्या सदस्यांनाही त्याची सवय होईल आणि कामाचे एक वातावरण तयार होईल.

कोरोनामुळे जगभरातील काम करण्याच्या पद्धतीवरही परिणाम झाला आहे. त्यामुळे कामकाजाच्या नवनवीन पद्धतींचा अवलंब विशेषत: 'रिमोट वर्किंग'ची संकल्पना राबवण्याकडे सर्वच देशांचा कल दिसून येत आहे, आणि तो वाढत जाणार आहे. या महामारीमुळे, जगभरात सगळेच ठप्प झाले आहे. त्यामुळे, आजूबाजूच्या दृश्य भौतिक जगात वावरणाऱ्या लोकांपैकी बऱ्याच जणांना, आता एका अदृश्य अशा डिजिटल जगात वावरणे भाग पडत आहे. दूर राहून काम करणे, दूर राहून वैद्यकीय मदत मिळवणे, विविध तंत्रज्ञानांच्या साह्याने शिक्षण घेणे, सर्वसामान्यपणे वाढलेली सरकारी पाळत इत्यादींमुळे केवळ सामान्य जनताच नव्हे तर सरकार आणि विविध कॉर्पोरेट्स यांच्याही आयुष्यात उलथापालथ झाली आहे. परिस्थितीवर मात करण्याच्या गरजेतून लोक नवनवीन शोध लावत आहेत, युक्त्या लढवत आहेत. त्यामुळे डिजिटल सेवांमध्ये भर पडत आहे. त्यामुळे, 'डेटा' हे आता आधुनिक 'अणू-बॉम्ब' झाले आहेत आणि त्यावर आता नेमकी कुणाची मालकी असणार आहे, याची चर्चा जोरात आहे. विकसनशील देश आता आता कुठे डेटा, त्यावरचे नियंत्रण, खासगीपणा इत्यादी विचार करू लागले होते. दुसरीकडे असेही आहे, की गेली काही दशके तंत्रज्ञान वेगाने आपल्यावर कोसळत आहे आणि आपण पूर्ण तंत्रज्ञानमय होत आहोत. त्याची एक बाजू अशी की 'Technology gives a false sense of security' - तंत्रज्ञानामुळे आपल्या सुरक्षेची खोटी हमी आणि विश्वास आपल्याला गेले २-३ दशके जो होत होता त्याला आता तडा जाणार आहे.

उपयुक्तता हा एकाच गुण तंत्रज्ञानाजवळ उरणार आहे. दुर्दैवाने त्याचा परिणाम वैज्ञानिक मूलभूत संशोधन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावरही होणार आहे. It will be a collateral damage - आनुषंगिक नुकसान!

'डेथ ऑफ अ सेल्समन' हे आर्थर मिलर यांचे गाजलेले नाटक. काळ पन्नासच्या दशकातला. विली लोमान हा एक सामान्य सेल्समन - घरोघरी फिरून विक्री करणारा. बाहेरच्या झपाट्याने बदलत्या जगात मॉलसंस्कृती रुजू होत आहे. त्यात घरोघरी फिरून विक्री करणारा विक्रेता 'इररेलेवंट', अप्रासंगिक, अर्थहीन, क्षुल्लक होत आहे. या परिस्थितीशी जुळवून घेण्यात विली कमी पडतोय. एकीकडे स्वप्नांचे मनोराज्य, दुसरीकडे न पेलणारे अपेक्षांचे ओझे, अन् तिसरीकडे सरणारे वय, यातला ताण असह्य होऊन अपघाती आत्महत्येत त्याचा शेवट होतो. मूळ नाटकातील बदलत्या जगाचे संकेत संदिग्ध आहेत आणि म्हणूनच या नाटकातला संघर्ष कालातीत आहे. तो संघर्ष 'वर्क फ्रॉम होम' या कामाच्या मूलभूत बदलालाही लागू होतो. त्याने कार्यालयातील पॉवर बॅलन्स बदलणार आहे. शक्तिकेंद्र पालटण्याची ताकद या बदलात आहे. पूर्वी महत्त्व असलेल्या काही विभागांचे, कर्मचाऱ्यांचे महत्त्व एकदम कमी होईल; तर काहींचे अनपेक्षितपणे वाढेल. ह्यामुळे अनेक ताण-तणाव निर्माण होऊ शकतील. 'नो एक्झिट' म्हणून सार्त्रचे नाटक आहे - 'बिग बॉस' हा कार्येक्रम त्यावरच आधारित आहे. रात्रंदिवस सतत एकत्र राहिल्यामुळे नात्यात कसे तणाव निर्माण होतात आणि आता नकोशा झालेल्या व्यक्तीबरोबर राहणे हेच नरक वाटू लागते. पण यातून सुटका नाही - 'नो एक्झिट'. 'वर्क फ्रॉम होम'मुळे असेच ताण-तणाव कुटुंबात निर्माण होऊन अनेक मानसिक प्रश्न निर्माण होतील. भविष्यात या सगळ्या प्रश्नांवर त्यावरचे उपाय काय योजले जातील ते पाहणे उद्बोधक ठरेल.

येणाऱ्या दशकांबद्दल एक असे भाकीत आहे, की स्वयंचलित यंत्र, रोबोटिक्स, ऑटोमेशन यातल्या प्रगतीमुळे भविष्यात मनुष्यच 'इरेलेवंट' अप्रासंगिक, अर्थहीन, क्षुल्लक होईल. भविष्यातील कारखान्यात फक्त दोनच कर्मचारी लागतील! एक माणूस आणि दुसरा श्वान म्हणजे कुत्रा. कुत्र्याचे काम काय तर कोणालाही अगदी या पहिल्या कर्मचारी माणसालासुद्धा कुठल्याही स्वयंचलित यंत्राला हात लावून द्यायचा नाही! मग त्या पहिल्या कर्मचारी माणसाचे काम काय? तर या श्वानाला खाणे-पिणे देणे आणि त्याची काळजी घेणे एवढेच! ह्यातली अतिशयोक्ती सोडली तरी येऊ घातलेल्या बदलांचे संकेत यात आहेत. तोपर्यंत अर्थातच 'वर्क फ्रॉम होम' या बदलाला सामोरे जाऊया.

असो. ही कोरोनाची जागतिक साथ लवकरात लवकर संपुष्टात येईल, पण 'वर्क फ्रॉम होम' संस्कृती मात्र रुळेल, अशी आशा करूया.



**श्रीराम शिधये**

# कोरोनाच्या साथीचे 'असेही' दुष्परिणाम!

**गे**ले अडीच महिने कोरोनाशिवाय बात नाही, अशी स्थिती आहे. आणि तरीही बहुतेकांच्या एक गोष्ट लक्षात आली आहे की गेल्या दोन ते अडीच महिन्यांमध्ये मधुमेह, रक्तदाब, पक्षाघात, हृदयरोग किंवा हृदयविकाराचा झटका यांसारखे रोग झालेल्यांच्या बातम्या ऐकू आलेल्या नाहीत. हे सर्व रोग संसर्गजन्य नाहीत. त्यांना 'नॉनकम्युनिकेबल डिसिजेस' (एनएसडी) म्हणतात. परंतु या रोगांच्या बातम्या कोरोना या विषाणूच्या प्रसाराला सुरुवात झाल्यापासून ऐकू आलेल्या नाहीत. इतकंच काय पण हिवताप (मलेरिया), मुदतीचा ताप (टायफॉईड) किंवा क्षय या संसर्गजन्य रोगांच्याही बातम्या कानावर पडलेल्या नाहीत. या रोगांचं आणि ते ज्यांना होतात अशा रुग्णांचं काय झालं आहे हे काहीच कळत नाही. असं तर नाही ना झालं, की हे सारे असंसर्गजन्य आजारही एकदम लुप्तच झाले? कुणाच्याही बाबतीत त्यांचं निदानच कसं झालेलं नाही किंवा होऊ शकलेलं नाही, असा प्रश्नही अनेकांना पडलेला असू शकतो.

असे विविध प्रश्न मनात येण्याचं मुख्य कारण म्हणजे गेले दहाएक आठवडे आपण फक्त आणि फक्त कोरोना विषाणूचा

> सध्या सारं लक्ष फक्त कोरोनाचा प्रसार रोखणं व औषधं शोधणं यावरच केंद्रित झालं आहे.
> हे सारं पाहणाऱ्या सामान्य माणसाला पडलेला प्रश्न असा आहे की या साऱ्या धावपळीत माणसाच्या एकंदर आरोग्याकडं, त्याबाबतच्या अनेकविध प्रश्नांकडं दुर्लक्ष होऊ लागलं आहे का? पाणी, पर्यावरण, शेती, कारखाने, रोजगार, शिक्षण हे आणि यासारखे प्रश्न महत्त्वाचे नाहीयेत का? त्यांच्याकडं लक्ष देण्याइतकी फुरसत कोरोनामुळं मिळणार नसेल, तर सामान्य माणसाचं जीवन अधिकच कठीण होणार नाही का? आणि युनायटेड नेशन्सनं सर्व जगासाठी निश्चित केलेली उद्दिष्ट येत्या १0 वर्षांत आपण गाठणार तरी कशी?

(कोव्हिड-१९) संसर्ग, त्यानं बाधित होणारे लोक, त्या विषाणूला बळी पडणारे दुर्दैवी जीव आणि या विषाणूचा संसर्ग झाल्यानंतर त्यातून 'बरे' होऊन बाहेर पडलेले लोक यांच्याचबद्दल सतत ऐकत अहोत, वाचत आहोत. खरं तर जागतिक आरोग्य संघटना असं सांगते की सन २०१६ मध्ये संपूर्ण जगामध्ये जितकी माणसं मरण पावली, त्यापैकी ७१ टक्के लोक हे असंसर्गजन्य (एनएसडी) रोगांनी मरण पावले. यातील चिंताजनक गोष्ट अशी की या ७१ टक्क्यांमधील ८५ टक्के लोक (दीड कोटी लोक) कमी किंवा मध्यम उत्पन्न असलेल्या देशांतील होते! तर ही आकडेवारी देऊन जागतिक आरोग्य संघटना म्हणते, की जगातल्या किती देशांमध्ये आवश्यक अशा अद्ययावत आरोग्यसेवा पुरेशा प्रमाणात नाहीत, हीच गोष्ट यावरून सिद्ध होते. कोरोना विषाणूचा प्रसार होत असताना ही बाब अधिकच ठळकपणं पुढं आली आहे! त्यामुळंच असेल, पण जागतिक आरोग्य संघटनेनं एका अगदीच वेगळ्या मुद्याकडं सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. संघटना म्हणते, की सध्या जगभर वेगानं कोरोना या विषाणूचा प्रसार होत आहे आणि सर्वच देशांचं लक्ष त्या विषाणूला अटकाव करण्याकडं, आपल्या देशातील कमीत कमी लोकांना या विषाणूचा

संसर्ग व्हावा याकडं आणि ज्यांना या विषाणूचा संसर्ग झाला आहे अशांवर उपचार करण्याकडं लागलेलं आहे. त्यामध्ये चूक काहीच नाही. मात्र त्यामुळं युनायटेड नेशन्सनं २०३० सालापर्यंत साध्य करायच्या गोष्टी आपल्यापासून दूरच राहण्याची संभाव्यता फार मोठी आहे.

सन २०३०पर्यंत संपूर्ण जगामधून गरिबी नाहीशी व्हावी, कुठंही भूकबळी पडू नयेत, सर्वांना उत्तम आरोग्य लाभावं आणि त्यांना व्यवस्थितपणं आपलं आयुष्य व्यतीत करता यावं, सर्वांना उत्तम दर्जाचं शिक्षण मिळावं, लिंगभेदाला मूठमाती मिळावी, सर्वांना स्वच्छ-शुद्ध पाणी मिळावं आणि स्वच्छता राखण्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा असाव्यात, जगातल्या प्रत्येक माणसाला परवडेल अशी पर्यावरणाचा नाश न करणारी ऊर्जा निर्माण करता यावी, सर्वांना आत्म सन्मान ठेवून करता येईल असं काम मिळावं आणि प्रत्येकाची आर्थिक भरभराट व्हावी... अशी एकंदर १७ उद्दिष्टं निश्चित केली आहेत. सध्याची परिस्थिती लक्षात घेतली आणि कोरोना या विषाणूसह माणसाला प्रदीर्घ काळ नांदावं लागण्याची संभाव्यता ध्यानात घेतली तर ही उद्दिष्ट गाठणं कठीण जाणार आहे. आणि त्याला एकमेव कारण म्हणजे कोरोना हा विषाणू असणार आहे, असं जागतिक अरोग्य संघटनेचं म्हणणं आहे.

संघटनेचं हे म्हणणं विचार करावा, असंच आहे. याचं कारण ज्या गतीनं हा विषाणू सर्वच देशांमध्ये पसरत आहे आणि त्या देशांच्या आरोग्य आणि त्याबरोबरच अर्थव्यवस्थेवरचा ताण वाढवत आहे, ते पाहता युनायटेड नेशन्सनं अवघ्या जगासाठी निश्चित केलेल्या ध्येयांपर्यंत पोचणं अवघड होणार आहे. या विषाणूवर अजूनही परिणामकारक असं औषध आपल्या हाती नाहीये आणि त्याच्या प्रसाराला रोखू शकेल अशी लसही नाहीये. आणि या दोनही गोष्टी विकसित करण्यात आपल्याला यश आलं तरी या दोनही गोष्टी जगातल्या प्रत्येक देशातील सर्व स्तरांतील माणसांपर्यंत पोचायला किमान एक वर्षभराचा काळ लागेल. याचाच अर्थ असा, की येतं वर्षभर जगातल्या सर्वच देशांना हा विषाणू, त्याचा प्रसार आणि बाधितांना बरं करण्यासाठी करावयाची उपाययोजना यातच मोठ्या प्रमाणावर अडकून पडावं लागणार आहे. तसं ते पडतानासुद्धा आरोग्य व्यवस्था आणि आरोग्य सुरक्षा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे ध्यानात घेणं अत्यावश्यक आहे. तसं ते घेतलं की लक्षात येईल, की सन २०३०पर्यंत आरोग्याच्या संदर्भात युनायटेड नेशन्सनं निश्चित केलेलं उद्दिष्ट साध्य करणंसुद्धा अवघडच जाणार आहे.

खरं तर कोरोना विषाणूच्या प्रसाराच्या अगोदर आरोग्य आणि एकंदर आयुष्यमान यासंदर्भात उमेद वाढवणारं चित्र निर्माण झालं होतं. यासंदर्भातली आकडेवारी असं सांगते, की कमी उत्पन्न असणाऱ्या देशांमध्ये, सन २००० ते २०१६ या काळात, सरासरी आयुष्यमान ११ वर्षांनी वाढलं. गंमत म्हणजे याच काळात बख्खळ उत्पन्न असणार्या देशांमध्ये सरासरी आयुष्यमान तीन वर्षांनी वाढलं! याच काळामध्ये माफक उत्पन्न असणा देशांमधील नागरिकांना हिवताप, मुदतीचा ताप यांसारख्या रोगांना चार हात दूर ठेवता येईल आणि समजा यापैकी एखादा रोग झालाच तरीही त्यावर त्वरित उपचार मिळतील, अशी आरोग्ययंत्रणा उभी राहिली. एचआयव्हीपासून दूर राहता येईल आणि त्याचा संसर्ग झालाच तर उपचार मिळू शकतील अशी सोयही या गटांतील सर्वच देशांमध्ये झाली. महत्त्वाची गोष्ट अशी, की या गटातील देशांमधील गर्भार महिलांची प्रसूती विनासायास होईल आणि या जगात आलेल्या नवजात अर्भकाची सर्वतोपरी काळजी घेतली जाईल, अशी दणकट आरोग्यव्यवस्थाही उभी राहिली, ती सन २००० ते २०१८ या काळात! मात्र काही गोष्टींकडं साफ दुर्लक्ष होत गेलं. त्यातली एक महत्त्वाची बाब म्हणजे लसीकरण! आणि गेल्या अडीच महिन्यांच्या काळात तर ती बाब एकदमच मागं पडल्यासारखी झाली आहे. त्यामुळं हिवतापासारखा रोग पुन्हा अनेक देशांमध्ये डोकं वर काढू शकण्याची संभाव्यता नाकारता येत नाही, असं जागतिक आरोग्य संघटनेचं म्हणणं आहे.

यंदाच्या वर्षामध्ये जगातल्या सुमारे १०० कोटी लोकांना आपल्या एकंदर उत्पन्नापैकी कमीत कमी दहा टक्के पैसे आरोग्यासाठी वेचावे लागतील. चिंताजनक गोष्ट अशी, की यापैकी बहुतेक लोक हे बेताचं उत्पन्न असलेल्या देशांतील असतील! कोरोना या विषाणूचा संचार आता जगभर झालेला आहे आणि होत आहे. त्यानं एक गोष्ट ठळकपणं समोर आणली आहे, की अचानक एखादा नवाच विषाणू किंवा जिवाणू उपटला, त्याच्यामुळं नव्याच रोगाची साथ आली, प्रचंड वेगानं ती जगभर पसरली तर त्यापासून सामान्य माणसाचं संरक्षण व्हावं, त्याला त्या नव्या साथीला सामोरं जावं लागू नये किंवा समजा जावं लागलं तरी पुरेशी सक्षम अशी आरोग्यव्यवस्था असेल अशी तयारी यापुढं प्रत्येक देशालाच ठेवावी लागणार आहे. अर्थात ही गोष्ट सोपी आणि सहजसाध्य होणारी नाही. त्यासाठी त्या त्या देशातील विविध घटकांच्या सातत्यपूर्ण सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

कोरोना विषाणूच्या प्रसाराला आणि त्यानं आणलेल्या जागतिक पातळीवरील साथीच्या दुष्परिणामांचे असे अनेक पैलू आहेत. त्यातील अगदी थोडक्याच मुद्यांना इथं स्पर्श केला आहे. मात्र महत्त्वाची गोष्ट ही की कोरोनामुळं जगभरातल्या सर्वच देशांतल्या आरोग्यव्यवस्थांवर प्रचंड ताण आलेला आहे. अर्थव्यवस्थांचं कंबरडं पार मोडलं आहे. उद्योग-व्यवसाय थंड झाले आहेत. छोट्या-छोट्या उद्योजकांना तर परत उभं राहता येणं अवघड झालं आहे. लहान-सहान उद्योग करून पोट भरणाऱ्यांच्या डोक्यावर अनिश्चिततेची टांगती तलवार आहे. सारं लक्ष फक्त कोरोनाचा प्रसार रोखणं, त्याचा संसर्ग झालेल्या व्यक्तींवर 'उपचार' करणं, कोरोनाला अटकाव करणारी लस विकसित करणं आणि त्यावर प्रभावी औषध बनवणं यावरच केंद्रित झालं आहे. हे सारं पाहणाऱ्या, त्याबाबतच्या बातम्या वाचणाऱ्या, पाहणाऱ्या/ऐकणाऱ्या सामान्य माणसाला पडलेला प्रश्न असा आहे, की या साऱ्या धावपळीत माणसाच्या एकंदर आरोग्याकडं, त्याबाबतच्या अनेकविध प्रश्नांकडं दुर्लक्ष होऊ लागलं आहे का? पाणी, पर्यावरण, शेती, कारखाने, रोजगार, शिक्षण हे आणि यासारखे प्रश्न महत्त्वाचे नाहीयेत का? त्यांच्याकडं लक्ष देण्याइतकी फुरसत कोरोनामुळं मिळणार नसेल, तर सामान्य माणसाचं जीवन अधिकच कठीण होणार नाही का? आणि युनायटेड नेशन्सनं सर्व जगासाठी निश्चित केलेली उद्दिष्ट येत्या १० वर्षांत आपण गाठणार तरी कशी? या आणि अशा प्रश्नांच्या भोवऱ्यात सध्या तुमच्या-आमच्यासारखा सामान्य माणूस अडकला आहे.

– **श्रीराम शिधये**
भ्रमणध्वनी : ९९६७९८९२५३
shriramshidhaye@gmail.com



**योजना शिवानंद**

# लॉकडाऊनमधला 'आविष्कार'- अबू हसन आणि मी

**(उत्तरार्ध)**

**को**णतीही निर्मिती अचानक होत नाही, त्यासाठी सभोवताली पोषक वातावरण असावं लागतं. नाटक बसवताना जयदेव असं वातावरण निर्माण करत असे. सारी टीम मग त्यात मग्न होऊन काम करत राही. भूमिका साकारताना तांत्रिक, सांघिक बाजू, वेशभूषा, केशभूषा, नेपथ्य, पार्श्वसंगीत आणि प्रकाशयोजना आदी अनेक अंगांचा नटानं कसा उपयोग करायचा याविषयी व्यवस्थित सांगून तसं जयदेव ते आमच्याकडून करवूनही घेत असे.

तत्त्वनिष्ठ, आग्रही, स्पष्टवक्ता होता तो. चुकीचं काही झालं तर त्यावर तो खूप चिडायचा, पण अनेकदा तो त्याचा स्वतःलाच त्रास करून घ्यायचा. यामुळे त्याच्या प्रकृतीवरही परिणाम होत असे. त्याची सारी धडपड नाटक उत्कृष्ट करण्यासाठीच असायची. फणसासारखा वाटायचा मला तो, म्हणजे बाहेरून काटेरी; पण आत गोड, रसाळ!

> चार दशकांहून अधिक वर्षांपूर्वीचा तो काळ, त्या काळातील प्रायोगिक नाटकाची निर्मिती, त्यातले कलाकार, माणसांचा साधेपणा, ध्येयं, निष्ठा, तत्त्वं, मूल्यं, सामाजिक-कौटुंबिक वातावरण... सारं अनुषंगानं पुन्हा जवळ आलं. केवळ स्मरणरंजन नव्हतं ते, हेही ध्यानात आलं. स्वतःच्या विचारधारणा दृढ झाल्या या साऱ्यामुळे. भाग्यवान मानलं मी स्वतःला!

सोबतच्या कलाकारांची त्याला काळजी असे. तो जसा कडक होता तसा खूप केअरिंगही होता. नाटकातल्या त्याच्या काही फेवरेट मुलींना तो हिरॉईन म्हणायचा. अशी मी त्याची हिरॉईन होते. वयानुसार मी नवखी आणि मुग्ध होते. तालमीत माझ्याशी कोण कसं बोलतंय, वागतंय याकडेही जयदेवचं बारीक लक्ष असायचं. नाट्यक्षेत्रात वावरताना तरुण मुलीला सुरक्षिततेची विश्वासार्ह भावना देणं हे अतिशय महत्त्वाचं आहे. सज्जन आणि सच्चा माणूसच ते जाणे. हे दोन्ही गुण होते जयदेवमध्ये!

आमच्या तालमींना दोन-तीन वेळा गुरुवर्य पं. सत्यदेव दुबे आल्याचं स्मरतंय. एकदा दुबेजी आल्याचं त्यानं पाहिलं तेव्हा मला म्हणाला - 'योजना, दुबेजी इथं का आलेत?... मी सांगतो... ते त्यांच्या पुढच्या प्रॉडक्शनमध्ये तुला घेतील... बघ!' तेव्हा त्याच्या त्या विधानाचं मला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, मी सांगतोय ते खरं आहे... असं म्हणून मिश्कील हसला तेव्हा मलाही हसू आलं होतं. पुढे जयदेवचं बोलणं मला मनोमन पटलं, ते अनेक वर्षांनंतर खुद्द दुबेजींशी भेट झाली आणि त्यांचा तसा विचार होता हे त्यांनीच मला सांगितलं तेव्हा असा दूरदर्शीपणा जयदेवमध्ये होता.

'अबू हसन' या नाटकात कव्वालीगायनाचा एक सीन होता, ज्यात सारी टीम सामील होत असे. मला स्पष्ट आठवतंय, प्रयोगाच्या वेळी रोहिणी छबिलदासला आली, तर त्यावेळी चटकन तिच्या घातलेल्या ड्रेसवरच ओढणी घेऊन ती त्या समूहदृश्यात येऊन बसायची. तसंच इतर कोणी कलाकार आले तरी तेही सहज त्यात मिसळून जायचे. सारे रंगून जात त्या कव्वालीमध्ये!

प्रवेशात चेंज ओव्हरसाठी कधी अगदी कमी वेळ असेल तर

सहकलाकार एकमेकांना मदत करत. अरे... त्याची एन्ट्री आहे; त्याला तयार करा, असा विचार असायचा. मग पात्राच्या अगदी मोजड्यासुद्धा समोर आणून ठेवत आणि अंधारात हात धरून कलाकाराला विंगेपर्यंत आणून सोडत. हे थिएटर स्पिरीट शिकवून येत नाही, ते अंगभूत असतं आणि हा संस्काराचाही भाग आहे. अर्थात याचं श्रेय त्रिवेणीला – आविष्कार, सूत्रधार काकडेकाका आणि जयदेव यांना! त्यांना मी गुरुकुल मानते.

नाटकाची रंगीत तालीम रवींद्र नाट्यमंदिरात सकाळी होती. फोटो काढायला त्यावेळचे प्रसिद्ध फोटोग्राफर राजदत्त आले होते. तालीम सुरू असतानाचे आमचे फोटो, आता चव्वेचाळीस वर्षांनंतर, रवी सावंत यांच्यामुळे पाहायला मिळाले. हे भारी आहे. आभार रवी!

स्टील फोटो काढतानाचे प्रकाशक्षण आठवले. राजदत्त आम्हाला पोज घ्यायला सांगू लागले ते पाहून जयदेव तिथं आला आणि त्यानं फटाफट कॉम्पोझिशन करून लाईट, पोज, ॲक्शन, मुद्रा, भाव सगळं ठीकठाक करून आम्हाला फ्रेममध्ये बंदिस्त केलं आणि मग त्यांना क्लिक करायला सांगितलं. हा अस्थेटिक सेन्स, ती नजर आणि ते डेडिकेशन जबरदस्त होतं!

आमच्या नाटकाच्या तालमी अनेक वेळा छबिलदास मुलींच्या शाळेत होत. त्या शाळेत खाली-वर असे दोन हॉल होते. आविष्कारचं आणखी एक गाजलेलं नाटक 'पाहिजे जातीचे'. त्याच्याही तालमी त्याचवेळी सुरू झाल्या होत्या. त्या पहिल्या मजल्यावर चालत. माझा सीन नसेल तेव्हा जयदेवची परवानगी घेऊन थोडा वेळ 'पाहिजे जातीचे' या नाटकाच्या तालमी पाहायला वरच्या हॉलमध्ये मी जात असे. अरविंद देशपांडे, नाना पाटेकर, विहंग नायक, सुषमा तेंडुलकर अशी सारी कलाकार मंडळी त्यात काम करायची. विजय तेंडुलकरांचं जबरदस्त नाटक आणि तगडी नटमंडळी! ते सारं भारी वाटायचं आणि निमिषातच माझं मन तिथं गुंग व्हायचं. ती टीमही माझ्याशी साधेपणानं वागायची, सहज बोलायची. त्यात इगो किंवा नाटकी भाव कधीच नसायचा! आजही नाना कुठेही भेटला तरी तसाच बोलतो, वागतो, हे मी अनेकदा अनुभवलंय. आविष्कारच्या 'पाहिजे जातीचे' या नाटकाला पुढे खूप नावलौकिक मिळाला.

'अबू हसन' या आमच्या नाटकाची, रवींद्र नाट्यमंदिरातील सकाळची तालीम लक्षात राहिली ती एका वेगळ्या प्रसंगामुळे. तालीम संपत आल्यावर एका कलावंताची तब्येत अचानक बिघडली. मग धावपळ सुरू. काकडेकाका, जयदेव आणि सारेच मदतीला धावून आले. त्या कलाकाराला टॅक्सीत घालून आम्ही हॉस्पिटल गाठलं. ताबडतोब उपचार झाले आणि त्याला बरंही वाटलं. कठीण प्रसंगाला धीरानं सामोरं कसं जायचं आणि योग्य निर्णय घेऊन मार्ग कसा काढायचा हे शिकवणारा तो प्रसंग होता. टीम स्पिरीट कसं असतं तेही तेव्हा अनुभवलं.

नाटकाच्या रनथ्रू तालमी आणि प्रयोग संपायला रात्री उशीर होई. काकडेकाकांना सवड नसली की जयदेव व रोहिणी मला घरी सोडायला येत. रोहिणी तेव्हा चेंबूरला राहत होती. जयदेवकडे त्यावेळी स्कूटर होती, जिला 'साइडकार' होती. तिची मला गंमत आणि आकर्षण वाटे. घरी जाताना रोहिणी जयदेवच्या मागे बसायची आणि मी साइडकारमध्ये बसायचे. छबिलदास ते दादर टी.टी.चा हा प्रवास थ्रिलिंग असायचा. जयदेवही काकडेकाकांच्या पावलावर पाऊल टाकून काळजी घेणारा होता. तिसऱ्या मजल्यावरील माझ्या घरी पोचल्याचा दिवा लावून मी हात केला की मग तो निघायचा किंवा रोहिणीला आठ नंबरची बस मिळेपर्यंत बस स्टॉपवर थांबायचा. रोहिणी बसमध्ये चढली की तो स्कूटरवरून निघायचा. अशा जयदेवच्या असीम आठवणी. त्याच्या मुलाचं नावही असीमच आहे!

गुरुवर्य दुबेजींच्या सांगण्यावरून, 'शांतता! कोर्ट चालू आहे' या चित्रपटात एका प्रवासदृश्याचं शूटिंग करण्याकरता आम्ही 'अबू हसन' टीमचे काही कलाकार गेल्याचंही आठवतंय. जरा वेगळा अनुभव!



**रोहिणी हट्टंगडी**

त्यानंतरची रोहिणीची एक गहिरी आठवण (अंदाजे १९८१ मधली) आहे. मी त्यावेळी डोंबिवलीला राहत होते. गायनाच्या कार्यक्रमाला उशीर झाल्यानं शेवटची कर्जत लोकल चुकली आणि मला दादर स्टेशनवर थांबावं लागलं .भूक तर लागली होती म्हणून दादर पश्चिमेला पावभाजीच्या गाडीवर गेले. तिथे रोहिणी होती. मला इतक्या उशिरा पाहून तिला आश्चर्य वाटलं. माझी विचारपूस तर तिनं केलीच, शिवाय खाणं झाल्यावर म्हणाली, ''आता स्टेशनवर थांबायचं नाही. घरी चल.'' आणि मला ती तेव्हा राहत असलेल्या वडाळ्याच्या तिच्या घरी घेऊन गेली . घरी पोचल्यावर ती म्हणाली, 'आधी कपडे बदल' आणि तिचा ड्रेस दिला घालायला. 'सकाळी पाहू काय ते. आता निवांत झोप तू.' जयदेव काही कामासाठी मुंबईबाहेर गेला होता. सकाळी तिनं केलेला ब्रेकफास्ट करून मग मी डोंबिवलीला गेले. माणूसपणाच्या या दर्शनानं मी गहिवरले. रोहिणीची ही आठवण आजही पापण्या ओल्या करते.

नाटक तर प्रायोगिकच; पण संगीताच्या लहरी त्यात सुंदर मिसळलेल्या होत्या म्हणून संगीत 'अबू हसन.' कथानक, प्रसंग, संवाद यांच्याबरोबर संगीत हा या नाटकाचा महत्त्वाचा घटक होता. पारंपरिक संगीत नाटकासारखं मात्र ते नव्हतं. इथं आलापी, ताना घेत



**विद्या आपटे, योजना सप्रे, राजश्री करंदीकर**

विस्तारानं गाणी गायची नव्हती, तर ती सुगम गायनपद्धतीनं सादर करायची होती. कथानकाला रंगवणारी, हलकीफुलकी अशी ती छोटी छोटी गाणी होती.

ही सर्व गाणी ज्येष्ठ कवी शंकर वैद्य यांनी लिहिली होती. तेव्हाचे तरुण पिढीचे संगीतकार शांक-नील यांचं संगीत होतं. शांक-नील म्हणजे पं. शशांक कट्टी आणि डॉ. सुनील कट्टी, हे दोघं बंधू. ते दोघंही शास्त्रीय संगीत पद्धतशीर शिकलेले, तालीम घेतलेले प्रतिभावान कलाकार होते. शशांक सतार वाजवी तर धाकटा सुनील संतूर, सतार, तबला उत्तम वाजवी. आविष्कारसोबत त्यांनी आला 'अडाण्याचा गाडा' हे नाटक यापूर्वी केलं होतं. तसंच 'पाहिजे जातीचे' हे नाटकही तेच करत होते. संगीतकार म्हणून नाट्यक्षेत्रात तेव्हा ते जोमानं कार्यरत होते.

चव्वेचाळीस वर्षांपूर्वीच्या संगीतातलं मला काही स्पष्ट आठवतं – जसं आकर्षक मुखड्याचं माझं गोड गाणं 'राघू बोले मैनेच्या कानात गं, चल जाऊ आंब्याच्या वनात गं.' शांक-नील पेटी वाजवून गाणं शिकवत. चाल समजावताना शब्द कसे टाकायचे, कुठे तोडायचे, कुठं थांबायचं इत्यादी ते सोपं करून सांगत. पिकअप छान होता माझा त्यामुळे शब्दसुरांचा आनंद लुटत आम्ही पटापट पुढे जात होतो.

प्रयोगात हार्मोनियमची उत्तम साथसंगत करत असे डॉ. विद्याधर ओक. सायन हॉस्पिटलमध्ये तेव्हा तो वैद्यकीय शिक्षण पूर्ण करत होता. संवादिनीवर त्याची बोटं झरझर चालत. आता तो प्रसिध्द श्रुतीसंशोधक आणि संगीताचा जाणकार अभ्यासक आहे. कव्वाली गाताना तर सारे मस्त सुटायचे आणि धमाल यायची. श्रीकांत दादरकर, राजश्री करंदीकर, बापू कामेरकर आणि मी – आम्हा सगळ्यांना मिळून अंदाजे १५ ते १६ गाणी होती नाटकात.

या नाटकाच्या संगीताविषयी अधिक जाणून घेण्यासाठी संगीतकार डॉ. सुनील कट्टीला मी फोन केला. फोनवरही त्याच्या स्वरात सुखद आनंद जाणवला मला. तो म्हणाला– 'तुझं शिवरंजनी रागातील गाणं छान होतं– लाज लाजली ती फुलराणी, ह्रदयी हासू नयनी पाणी.' संगीतानं या नाटकाची लज्जत वाढत गेली. एका प्रयोगाला ज्येष्ठ संगीतकार दत्ता डावजेकर आणि यशवंत देव आले होते. प्रयोग पाहिल्यावर दोघांनीही संगीताची प्रशंसा केली आणि आम्हाला शाबासकी दिली. चांगल्या सांगीतिक कामाची ही मोठी पावती होती. सुनील कर्वे हा तरुण तबल्याची साथ करायचा. सर्वार्थानं समरस होऊन सगळ्यांचं काम व्हायचं त्यावेळी. आर्थिक मोबदल्याची त्यात कोणतीही अपेक्षा नसायची. सारं काम निरपेक्ष, सुरेल आणि निरलसपणे होत राहायचं!

डॉ. सुनील कट्टीसोबत अलीकडच्या पाच वर्षांत मी संगीताची पुष्कळ नवनिर्मिती केली आहे. मात्र 'अबू हसन'चा तो काळ कसा विसरू? पुढे....

स्वरांचं विश्व फुलत गेलं...
जिवाचं गाणं झुलत गेलं...

लॉकडाऊनच्या तणावपूर्ण व अस्वस्थ काळात, 'अबू हसन' या नाटकाच्या तरल आठवणींचे लेख लिहिले याचं आश्चर्य आणि आनंद, दोन्ही आहे. कुणी सुचवावं आणि त्यानुसार मी लिहावं अशी रूढार्थानं लेखिका नाही मी. मग कसं काय लिहिलं? माझ्यातल्या सच्च्या नाट्यकर्मीला सुखावणारं, ह्रदयात जपलेलं; पण काळानं झाकोळलेलं असं जे अम्लान होतं, ते आठवत गेलं आणि तेच लिहिलं गेलं, असं त्यामागचं गुपित असावं. समापनाचा हा सुरेल अंतिम स्वर आहे.

चव्वेचाळीस वर्षांपूर्वीचे काही सूक्ष्म तपशीलही आठवले, पण नाटकाची संहिता, विषय, आशय, प्रवेश, संवाद आणि गाणी याबाबत फारसं स्मरलं नाही. जे जे, जसं जसं अनुभवलं ते ते, तसं तसं तुम्हाला सांगितलं.

चार दशकांहून अधिक वर्षांपूर्वीचा तो काळ, त्या काळातील प्रायोगिक नाटकाची निर्मिती, त्यातले कलाकार, माणसांचा साधेपणा, ध्येयं, निष्ठा, तत्त्वं, मूल्यं, सामाजिक-कौटुंबिक वातावरण सारं अनुषंगानं पुन्हा जवळ आलं. केवळ स्मरणरंजन नव्हतं ते, हेही ध्यानात आलं. स्वतःच्या विचारधारणा दृढ झाल्या या साऱ्यामुळे. भाग्यवान मानलं मी स्वतःला! यासाठी, की रंगभूमीवरील माझा प्रवेश, 'आविष्कार'च्या प्रायोगिक

आविष्कार



**योजना शिवानंद आणि  सुलभाताई देशपांडे**

नाटकातून झाला. कष्टाच्या मशागतीतून  मूलभूत मूल्यांची बैठक सुंदर आणि भक्कम झाली .

यानंतर हौशी संगीत नाटकाच्या स्पर्धेत सहभागी होण्याचा योग आला, पण आविष्कारच्या पार्श्वभूमीवर त्या संस्थेचं वातावरण मानवलं नाही आणि मन तिथं रमलंही  नाही. माझ्या वाट्याला आलेली भूमिका मी कष्ट घेऊन निष्ठेनं केली आणि त्या नाटकासाठी रौप्यपदकाची मानकरीही ठरले. वैयक्तिक कारणांनी प्रायोगिक नाटकाची नाळ तुटली. व्यावसायिक संगीत रंगभूमीवर जराशीच संधी मिळाली. तिथलं पुष्कळसं काही वेगळं होतं. जे सललं आणि टोचत राहिलं. पोटापाण्याची भ्रांत असल्यानं आयुष्यभर नोकरी सांभाळत केलं सारं.

कोवळ्या वयात माझी नाळ 'आविष्कार' आणि तेथील पॅशनेट माणसांशी जुळली. तो मार्ग मला माझा वाटला. प्रगल्भ विचारमार्गाचा एकदा का खोलवर  प्रभाव पडला की आयुष्यात पुढेही तसंच काही सापडत जात असावं. प्रतिभावंत, विचारवंत, निष्ठावंत, दिग्गज भेटत गेले आणि कलाक्षेत्रात कष्टानं शोध घेत गेले. क्रूर हल्ले आणि त्सुनामी आल्या, पण कार्य थांबलं नाही.

२०१२ मध्ये सुलभाताईंना एचएमव्ही सारेगामा (HMV - SAREGAMA – मी कार्यरत असलेल्या) कंपनीच्या एका प्रकाशनसोहळ्याला आमंत्रित केलं होतं. माझ्या 'आविष्कारी' आठवणी त्यांना सांगितल्या तेव्हा त्या आश्चर्यचकित झाल्या.

लॉकडाऊनच्या काळात अचानक एक फोन आला आणि नकळत 'अबू हसन' या नाटकाच्या आठवणींचा पडदा उलगडला... आविष्कारी आठवणींची दारं उघडली आणि लिहितं करत गेली मला. झरझर लिहीत गेले... बरंच काही...

आविष्कार संस्था, नाट्यकर्मी रोहिणी हट्टंगडी, दीपक राजाध्यक्ष, रवी सावंत आणि प्रा. मीना गोखले, या सर्वांचे या लेखनासाठी विशेष आभार आणि प्रेम!

माझं हे आविष्कारी रूप अनेकांना नवीन आहे. अस्सल नाटकवाली आहे मी!

हे आविष्कारी सुंदर सत्य आहे!

**समाप्त**


**('आविष्कार'च्या सौजन्याने)**

**– योजना शिवानंद**
भ्रमणध्वनी : ९९२०९३८८७४
shivanand.yojana@gmail.com

॥ग्रंथाली॥

# अम्लान

**योजना शिवानंद**




**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रुपये**

# समुद्राचं गाव

**आरती कुलकर्णी**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रुपये**



**कुमार सोहोनी**

# माझे कॅलगरीमधले चार महिने, विलगीकरणाचे

**२२** जानेवारी २०२० पासून मी व माझी पत्नी श्रद्धा, आमच्या मुलीकडे-भैरवीकडे कॅलगरी, कॅनडा येथे आलो आहोत आणि तेव्हापासून आम्ही चार महिने एकप्रकारे विलगीकरणातच राहत आहेत. सुरुवातीचे काही दिवस हवामानामुळे आणि नंतर कॅलगरीमध्ये कोरोनाचा प्रार्दुभाव वाढल्यामुळे.

तसे पाहता २०१३ पासून साधारण दरवर्षी आम्ही आमच्या मुलीकडे मे-जून असे दोन-तीन महिन्यांसाठी वास्तव्यास येतो. कारण त्यावेळेस हवामान चांगले असते. बाहेर बर्फ नसतो. आल्हाददायक वातावरण असते. त्यामुळे या वातावरणात फिरायला बाहेरही जाता येते. इथला परिसर निसर्गरम्य असाच आहे. एकतर प्रदूषण-मुक्त स्वच्छ हवा, वाहनांची कमी वर्दळ, जागोजागी मुलांना खेळण्यासाठी असणारे पार्क, तलाव, त्याभोवतीचा जॉगिंग ट्रॅक; ह्या कारणाने आम्ही कॅलगरीच्या वास्तव्यात सकाळ-संध्याकाळ मुक्त फिरत राहायचो. शॉपिंग कॉम्प्लेक्स जवळच असले तरी तिथे जाताना मात्र मुलांच्या कारनेच जायचो. मॉल मात्र थोडे दूर आहेत. माझी मुलगी भैरवी आपल्या पतीसह इथे राहत आहे.

आमच्या परतीच्या विमानांची तिकिटे आमच्याकडे आहेत, पण त्याची बदलीची तिकिटे कधी मिळतील माहीत नाही. भारताची आंतरराष्ट्रीय विमानसेवा कधी सुरू होईल माहीत नाही. ‘वंदे भारत’च्या मुंबई फ्लाइट कधी सुरू होतील माहीत नाही. औषधांचे काय करायचे अजून समजत नाही. (कारण कॅनडा सरकारने औषधे कुरियरने आणण्यास बंदी केली आहे.) **lberta province** मध्ये बाकी बऱ्याच ठिकाणी मॉल्स, दुकाने सुरू झालीत. दुकाने बंद आहेत. मुंबईसारखे केवळ घरात-सोसायटीत अडकून क्वारंटाइनप्रमाणे जगत नाहीत. तरी कॅलगरीतले हे क्वारंटाइन संपवून मुंबईत आपल्या घरी परतण्याची वाट पाहतोय.

तिला सारा नावाची पाच वर्षाची मुलगी आहे आणि गतवर्षी रिनी ही दुसरी मुलगी झाली. नवरा संजीवन आणि भैरवी दोघेही नोकरी करतात. ह्यावर्षी तिने आम्हाला जानेवारीतच कॅलगरीला बोलावले. कारणही तसेच होते. धाकट्या रिनीचा डे-केअरचा प्रॉब्लेम झाला होता. भैरवीला ६ जानेवारीपासून नोकरीला जावे लागत होते आणि रिनीला मेच्या पहिल्या तारखेपासून डे-केअर मिळणार होते. (एक वर्षाची झाल्यावर). तिने आमची २२ जानेवारीची तिकिटे बुक केली आणि ऐन थंडीत आम्ही कॅलगरीला रवाना झालो. २२ जानेवारी ते २३ मे असा आमचा मुक्काम ठरला. १५ जानेवारीच्या आठवड्यात तर कॅलगरीतले तापमान -३८ इतके खाली होते. पण आम्ही गेलो तेव्हा ते सुदैवाने १८-२० दरम्यान होते. सर्वत्र बर्फाची जाडजूड चादर पसरलेली. तलाव गोठून बर्फमय झालेले. अशा हवामानात घराबाहेर पडणे अशक्यच होते. जावई आणि मुलगी सकाळी साडेसात वाजताच नोकरीला जायचे. जाताना साराला प्री-स्कूलला सोडायचे व तिघेही साडेचार-पाच वाजता परत यायचे. बर्फ पडत नसेल तर कधी सायंकाळी किंवा शनिवार-रविवार आम्ही कारमधून बाहेर जात होतो. कधी



**कॅलगरीमधील बर्फाचा सडा**

मॉलमध्ये तर कधी ग्रोसरी शॉपमध्ये. कॅलगरीमध्ये शीख/पंजाबी समाजाचे बरेच लोक राहत असल्याने, इथल्या काही ग्रोसरी शॉपमध्ये भारतीय पदार्थ मिळतात. पण ती आमच्या घरापासून लांब आहेत. तिथून काही गोष्टी आणण्यासाठी आम्ही जात होतो. एका अर्थाने आमचे विलगीकरणच सुरू होते. आपल्यासारखी गर्दी नसल्याने मॉलमध्ये सुद्धा चार-पाच फुटांचे अंतर एरवीही पाळले जात होते. चीनमध्ये कोरोनाने पाय पसरायला सुरुवात केली आणि हळूहळू इटली, फ्रान्स, स्पेन, अमेरिका ह्या देशांमध्ये ही त्याची लागण झाली. कॅनडामध्ये फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पहिला रुग्ण सापडला. पण तो Ontario Province मध्ये - टोरांटोच्या जवळ- जो प्रांत कॅलगरीहून चार तास विमानाच्या अंतरावर आहे. Alberta ह्या प्रोव्हिन्समध्ये म्हणजे कॅलगरीमध्ये तशा केसेस सुरुवातीला नव्हत्या. पण १३-१४ मार्चच्या सुमारास आम्ही राहत असलेल्या कॅलगरी शहरात काही केसेस आढळल्या त्यासुद्धा डे-केअरमध्ये. एका डे-केअरमध्ये काही मुलांना त्याची लागण झाली. केसेस वाढू लागल्या आणि येथील प्रशासनाने सर्व शाळा, कॉलेजे, डे-केअर ऑगस्टपर्यंत बंद करण्याचा निर्णय घेतला. तशी इथे जुलै-ऑगस्टमध्ये शाळा-कॉलेजना सुट्टीच असते. मॉल्स, रेस्टॉरंट बंद करण्यात आली. आठेक दिवसानंतर सर्व नोकरदारांना वर्क फ्रॉम होम करण्यास सांगण्यात आले. पण जगभरातच कोरोनाचा हाहाकार माजल्याने, क्लायंटच नसल्याने हजारो लोकांना ले-ऑफ मिळू लागले. साराची प्री-स्कूल बंद झाली. जावई-मुलगी वर्क फ्रॉम होम करू लागले. आम्ही दोन्ही नातींना सांभाळण्यात व्यस्त झालो, पण आठेक दिवसांत मुलीला ले-ऑफ मिळाला. आता खरेतर आमेच इथे राहण्याचे प्रयोजन संपले होते. ह्या परिस्थितीत भैरवीला लगेचच नोकरी लागणे शक्य नव्हते. पण भारतात परतणे शक्य नव्हते कारण २२ मार्चपासून भारतात टाळेबंदी सुरू झाली होती. तसेही तिकीट रद्द करून ते बदलून घेणे खर्चीक असते. त्यामुळे नालाजास्तव २३ मे लाच मुंबईला परतायचे असे ठरवले. पण कोरोनाच्या वाढत्या प्रभावाने केएलएम विमान कंपनीने आमचे २३ तारखेचे तिकीट रद्द केले. नंतर त्यांनी फ्रान्स एअरची बदली तिकिटे दिली जी रद्द होत होती. ज्यात १२ मे, ५ जून, १२ जून, २० जून अशी तिकिटे होती. भारतात प्रवेश नव्हताच, तर लंडन एअरपोर्ट बंद होता. भारतात - विशेषत: मुंबईत कोरोनाचा प्रभाव वाढू लागला होता. कॅलगरीमध्ये तशी टाळेबंदी नव्हतीच. ग्रोसरीची दुकाने सुरू होती. कार-बसेस-ट्रेन चालू होत्या. कॅलगरीच्या डोमेस्टिक फ्लाईट्स चालू होत्या, पण आंतरराष्ट्रीय विमानसेवा बंद होती. एप्रिलच्या १०-१२ तारखेला कॅलगरीचे तापमान 'उणे'ऐवजी 'अधिक' झाले होते. रस्त्यावरचा बर्फ वितळला होता. +७, ८ असे तापमान होते. त्यामुळे बाहेर चालायला जाणे सुरू केले. इथल्या लोकांना हवामान अधिक असले की बाहेर पडायला आवडते (चालत) पण कोरोनामुळे चालताना ते तीन-चार फुटांच्या अंतरानेच रस्त्यावरून-पार्कमध्ये चालायचे. समोरून येणारी व्यक्ती डावीकडे किंवा उजवीकडे थांबायची किंवा डाव्या-उजव्या बाजूने चालत क्रॉस करायचे. इथल्या पेट्रोलपंपावर स्वत:लाच पेट्रोल भरावे लागते. त्यासाठी आधी व नंतर हात स्वच्छ करायची सोय केलेली आहे. इथल्या सुपर स्टोअर्समध्ये किंवा सेफवेच्या दुकानांतून ट्रॉलीज स्वच्छ करून दिल्या जातात, तर काही ठिकाणी सॅनिटायझरची सोय केलेली आहे. पण आमच्या जवळ असणाऱ्या भागात बरेच कोरोनापीडित सापडल्याने आमच्या मुलांनी जवळच्या ग्रोसरी शॉपमध्ये जाणे बंद केले. भारतीय पदार्थ मिळणारी दुकाने लांबही आहेत आणि काही बंदही असल्याने ते पदार्थ बऱ्याच दिवसांत आणले गले नाहीत. कॅलगरीच्या वाढत्या कोरोनाप्रभावाची आम्हाला धास्ती होतीच. आमचे कारमधून ग्रोसरी शॉपला जाणे मुलांनी बंद केले होते. भारतातली एन्ट्री अजूनही बंद होती. आम्हाला घरी परतायचे वेध लागले होते. इथला कोरोनाप्रभाव हे कारण होतेच, पण आम्हा दोघांची औषधे ४ जून रोजी संपणार आहेत. आम्ही २३ मेला परतणार असल्याने त्याहून आणखी १५ दिवसांपुरती औषधे आम्ही बरोबर घेतली होती. तसे गतवर्षी आम्हाला PR Card (Permanant Residency Card) मिळाले. इथल्या हेल्थ केअरमध्ये आम्ही गतवर्षीच आमची नावे रजिस्टर केली होती. त्यामुळे त्याच ब्रँडची नाही पण त्याच प्रकारची औषधे आम्हाला मिळू शकत होती. पण माझी हृदयविकाराची औषधे मिळण्यासाठी मला पुन्हा सगळ्या टेस्ट कराव्या लागणार होत्या. आणि आम्ही जिथे नावे रजिस्टर केली होती ते हेल्थ सेंटर आणि हॉस्पिटल कोविड स्पेशल हॉस्पिटल झाले होते. ७ मेपासून 'वंदे भारत'ची विमानसेवा सुरू झाली. आम्ही आमची नावे नोंदवली, पण पहिल्या फेजमध्ये कॅनडातून मुंबईसाठी विमानच नव्हते. १९ मेपासून फेज दोनमध्ये ५ विमाने जाहीर झाली. ३ टोरांटोहून तर २ व्हँक्युअरहून. सुमारे पाच हजार लोकांनी नावे नोंदवल्याचे समजले आणि ५ विमानांतून पंधराशे लोकच जाऊ शकणार होते. यावेळी माझा



**कॅलगरी येथील वास्तव्यात**
**मुलगी भैरवी**
**मी**
**पत्नी श्रद्धा**
**जावई संजीवन**
**नाती**
**रिनी आणि सारा**


मित्र दीपक करंजीकर माझ्या मदतीला आला. तो सध्या अमेरिकेत आहे. त्याने त्याच्या ओळखीच्या दिल्लीमधल्या अधिकाऱ्याकडे शिफारस केली. त्या अधिकाऱ्यानेही मला लगेच फोन केला. टोरांटो एम्बेसीमधून २४-२६ तारखेच्या दोन विमानांसाठी विचारण्यात आले, पण २४ चे विमान बंगलोर आणि २६चे विमान अहमदाबाद येथे जाणार होते आणि त्यांनी बंगलोर किंवा अहमदाबादमधला ओळखीच्या व्यक्तीचा पत्ता मागितला. शिवाय १४ दिवस तिथेच अलगीकरणात राहावे लागेल असे सांगितले. तोपर्यंत डोमेस्टिक सेवा सुरू नव्हती. त्यामुळे मुलांनी मुंबईच्या विमानाचा हट्ट धरला आणि आम्हाला त्या विमानाने परतणे शक्य झाले नाही. तसे पाहता आमच्या परतीच्या विमानांची तिकिटे आमच्याकडे आहेत, पण त्याची बदलीची तिकिटे कधी मिळतील माहीत नाही. भारताची आंतरराष्ट्रीय विमानसेवा कधी सुरू होईल माहीत नाही. वंदे भारतच्या मुंबई फ्लाइट कधी सुरू होतील माहीत नाही. औषधांचे काय करायचे अजून समजत नाही. (कारण कॅनडा सरकारने औषधे कुरियरने आणण्यास बंदी केली आहे.) lberta province मध्ये बाकी बऱ्याच ठिकाणी मॉल्स, दुकाने सुरू झालीत. दुकाने बंद आहेत. मुंबईसारखे केवळ घरात-सोसायटीत अडकून क्वारंटाइनप्रमाणे जगत नाहीत. तरी कॅलगरीतले हे क्वारंटाइन संपवून मुंबईत आपल्या घरी परतण्याची वाट पाहतोय.

**– कुमार सोहोनी**
भ्रमणध्वनी : ९८२००२४५६०
kumar.sohoni@gmail.bom


**ग्रंथाली**

# शिदोरी

**कुमार सोहोनी**





**मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ३५० रु.**




# बाबा आमटे :
# व्यक्तित्व कवित्व आणि कर्तृत्व

**बाळू दुगडूमवार**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**



डॉ. मोहन द्रविड

# मूर्ती लहान, पण...

''**मी** ट्रॅममध्ये चढलो आणि पाहिलं तर कंडक्टरनं मान टाकलेली दिसली. ड्रायव्हरच स्टॉपवर माणसं सोडायचा आणि घ्यायचा. तीन-चार माणसं चढायची, तीन-चार उतरायची. आणि दोन-तीन माणसं शेवटचा श्वास घ्यायची! प्रत्येक जण आपला स्टॉप केव्हा येतो याची वाट पाहत होता. पण ट्रॅम मध्येच थांबली. ड्रायव्हरनंही राम म्हटलेलं दिसलं. मी उतरलो आणि घरी चालत गेलो.''

ही कथा आहे केप टाऊन या गावातली. ऑक्टोबर १९१८ मधली. ही माणसं खरं म्हणजे पटकीपेक्षा भयानक रोगानं मरत होती. त्या रोगाचं नाव होतं एन्फ्लुएन्झा! इतिहास त्याला स्पॅनिश फ्लू या नावानं ओळखतो. पहिल्या महायुद्धाचं ते चौथं वर्ष होतं आणि त्यात स्पेन नव्हता. त्यामुळे स्पेन हा एकच देश असा होता की ज्यात खऱ्या बातम्या छापल्या जायच्या. युद्धात भाग घ्यायला जगातले लक्षावधी सैनिक यूरोपमध्ये जात होते. तितकेच जखमी आणि आजारी होऊन परतत होते. आगगाडीत आणि बोटीत कोंबून भरलेल्या अवस्थेत. तिथे एका माणसाचा संसर्गजन्य रोग एका रात्रीत शंभर जणांना व्हायचा. रोग सुसाट्यानं जगभर पसरला.

सर्व शांत झालं तेव्हा ताळेबंद असा : ५० कोटी माणसांना लागण, ५ ते १० कोटी मृत्यू. खुद्द भारतात दोन कोटी बळी! अमेरिकेत सात लाख फ्लूला बळी गेले, ते त्यांच्या पहिल्या महायुद्धातच काय

> कोरोनापासून आपण एक धडा शिकला पाहिजे. तो म्हणजे एकमेकांशी सहकार्य. तेव्हा एकमेकाची उणीदुणी काढण्यापेक्षा चीननं त्या रोगाच्या मुसक्या कशा बांधल्या याचा तिथे जाऊन अभ्यास करणं आपल्या आरोग्याच्या आणि स्वास्थ्याच्या दृष्टीनं अतिशय गरजेचं आहे. कावेबाज विषाणूंचा मुकाबला सर्वांनी एकत्र येऊन करणं हे शहाणपणाचं ठरेल.

पण विसाव्या शतकातल्या सर्व युद्धांत मिळून मृत्यू पावलेल्या सैनिकांपेक्षा जास्त आहे. आणि हे केवळ सहा महिन्यांत! काही रोगी तर बारा तासांतच दगावले. तेव्हा अमेरिकेचा आर्मी सर्जन जनरल म्हणाला, ''या गतीनं काही आठवड्यांतच संपूर्ण मानवजात नामशेष होईल.''

अशा पार्श्वभूमीवर तिसऱ्या सहस्रकाच्या दुसऱ्या दशकावर काळाचा पडदा पडत असताना चीनमध्ये भयंकर अशा कोविड-१९नं हल्ला केला. वुहान हे शहर ''ग्राउंड झीरो.'' बरेच रुग्ण आठवडा-पंधरवड्यात न्यूमोनियानं मरण पावले. शहरात रोगप्रसार प्रचंड गतीनं झाला. ३१ डिसेंबरला चीननं WHO या संस्थेला या रोगाबद्दल कळवलं. वुहान शहराला आणि हुबे या प्रांताला कडीकुलपात बंद केलं. तरीसुद्धा बघता बघता रोग जगभर फैलावला.

कोरियाला मर्स या रोगाचा अनुभव होता. आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन त्या देशानं महिन्याभरात कोरोना नाहीसा केला. कोरोनाग्रस्तांची कुंडली काढली. त्यांच्या क्रेडिट कार्डांवरून ते कुठे गेले याची माहिती काढली. त्यांच्या संपर्कात आलेल्या सर्वांना नमुनाकसोटी द्यायला लावली. दररोज १०,००० अशा कसोट्या दोन महिने घेतल्या! त्याचप्रमाणे कोरोनाग्रस्त व्यक्ती पन्नास फुटांच्या आत आली की ॲपमार्फत इतरांच्या फोनवर धोक्याची सूचना

यायची सोय केली. तैवाननं तर कोरियाच्या वरताण पावलं उचलली. तीन कोटी लोकसंख्या असलेल्या या देशात आतापर्यंत रोगास केवळ ६ जण बळी गेले आहेत! अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर कोरोना २४ जानेवारीला पोचला. पण त्या वेळी संपूर्ण अमेरिका राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या इंपीचमेंटच्या सोहळ्यात गर्क असल्यानं कोरोनाकडे लक्ष द्यायला तिला वेळ नव्हता.

या रोगाची लक्षणं जुन्या कोरोना, म्हणजे सार्स आणि मर्स यांसारखी. म्हणून त्याला नाव दिलं नवीन कोरोना (Novel Corona). जमेची एक बाजू ही, की जुन्या कोरोनाचा अभ्यास झाला आहे. सार्स हा पटकन पसरतो, तर मर्स या रोगात संहाराचे प्रमाण अधिक असते. सार्स आठ महिने टिकला आणि लस किंवा औषध निघायच्या आधीच नाहीसा झाला. ५३०० लोकांना त्याची बाधा झाली आणि ३५० लोक मरण पावले. हा पराक्रम नवीन कोरोनानं एका महिन्यातच केला.


दुसरी जमेची बाजू ही, की हे सार्स कुटुंबातले रोग बरेचसे फ्लूसारखे आहेत. आपला फ्लूचा अभ्यास भरपूर असल्यानं (जुन्या आणि नवीन) सार्सवर उपाययोजना करणं कठीण जाऊ नये. हे दोन्ही रोग श्वसनसंस्थेवर हल्ला करतात. फ्लू श्वासनलिकेच्या खालच्या बाजूस तर सार्स वरच्या. त्यामुळे कोव्हिडच्या रुग्णाचे जंतू (खोकला किंवा शिंकेनं) जास्त लांब उडतात. दोन्ही रोगांचा शेवट एकच. रक्तानं फुप्फुसं भरतात आणि श्वसनास अडथळा आणि मग मृत्यू. फ्लू आणि सार्स माणसांप्रमाणे पक्षी आणि प्राणी यांनाही होतात. प्राण्यांकडून रोग माणसांमध्ये संक्रमित होणाऱ्या प्रक्रियेला zoonosis असं म्हणतात. १९१८ चा फ्लू प्रथम अमेरिकेतील एका आडगावी डुकरांच्या संपर्कात आलेल्या शेतकऱ्यांना झाला. ही लागण सैनिकांमार्फत जगभर पसरली. म्हणून या फ्लूचं दुसरं एक नाव आहे स्वाइन फ्लू. १९९७ साली आलेला फ्लू पक्ष्यांकडून आला. एड्स माकडांपासून आला तर मर्स उंटापासून. सार्स हा मूळ वटवाघळांमध्ये होता.

सार्स आणि फ्लू विषाणूंमुळे होतात. पक्ष्यांची आतडी म्हणजे विषाणूंनी भरलेली भांडारं असतात. विषाणू म्हणजे वायरस. वायरी म्हणजे लॅटिन भाषेत विष. विषाणूंचा परिचय माणसाला तसा उशिरा झाला. बॅक्टेरियांचं अस्तित्व Microscope चा शोध लागल्यापासून माहीत होतं. लुई पॅश्चर, रॉबर्ट कोक, कोन या शास्त्रज्ञांनी कॉलरा, क्षय, अॅन्थ्रॅक्स, प्लेग अशा रोगांना कारणीभूत असलेल्या जंतूंचा अभ्यास सूक्ष्मदर्शकाखाली केला. मायक्रोबायॉलॉजी हे नवीन शास्त्र १८८० नंतर जन्माला आलं. एवढं झालं तरी रेबीज हा रोग कोणत्या जंतूंमुळे होतो हे पॅश्चरला जंगजंग पछाडूनसुद्धा समजेना.

बॅक्टेरियाचा आकार साधारण ०.५ ते ५ मायक्रॉन असतो. आपण घरोघरी जे ceramic चे फिल्टर वापरतो त्यामधील छिद्रं या जंतूंपेक्षा लहान असतात. म्हणून या गाळणीतून पाणी सोडलं तर ते जंतूविरहित होतं. सन १८९१ मध्ये रशियात तंबाखूच्या पानांना असाध्य रोग लागला. इव्हानोव्हस्की या शास्त्रज्ञानं रोग झालेल्या पानाचे रस काढून ते ceramic फिल्टरमधून सोडले आणि तंबाखूच्या झाडांना घातले. तरीसुद्धा त्यांना रोग झालाच. ते बघून इव्हानोव्हस्कीनं १८९२ साली, आता ऐतिहासिक ठरलेल्या, शोधनिबंधात विषाणूंचा सिद्धांत मांडला. परंतु ते काही चांगल्यांतल्या चांगल्या सूक्ष्मदर्शकाखाली दिसेनात. असं असलं तरी देवी, रेबीज, गोवर, गालगुंड, कांजिण्या, नागीण वगैरे चिरपरिचित रोग कशामुळे होत असतील याचा साधारण अंदाज आला.

विषाणूंचा आकार ०.२ मायक्रॉनपेक्षाही कमी असतो. प्रकाशाची (visible light) वेव्हलेंग्थ ०.४ ते ०.७५ मायक्रॉन असते. म्हणून विषाणू साध्या (optical) सूक्ष्मदर्शकाखाली दिसत नाहीत. १९२९ मध्ये शास्त्रज्ञांना तंबाखूला लागणाऱ्या रोगाच्या विषाणूंना (TMV: Tobacco Mosaic Virus) द्रवापासून वेगळं करण्यात यश आलं. १९३५ मध्ये शास्त्रज्ञांनी विषाणूंना स्फटिक रूपात आणलं. इलेक्ट्रॉनिक या नवीन प्रकारच्या सूक्ष्मदर्शकाखाली १९३६ साली ते पहिल्यांदा दिसलं.

विषाणू हा पूर्ण पेशी नाही. तो सजीव आणि निर्जीव यांच्या सीमारेषेवर आहे. एका अर्थी तो बायॉलॉजीपेक्षा केमिस्ट्रीला जवळ आहे. त्याच्या आंतररचनेत आर.एन.ए. (किंवा क्वचित प्रसंगी डी.एन.ए.) या अणूचे एक किंवा दोन धागे, त्यावर कॅपसिड नामक प्रथिनांचं कवच, सर्वात वर पाण्यापासून संरक्षण म्हणून Lipid चं आच्छादन. विषाणूंना ऊर्जा किंवा प्रथिनं तयार करता येत नाही. त्यांना प्रजोत्पादन करता येत नाही. स्वतंत्र अवस्थेत ते काही मिनिटंच राहू शकतात. विषाणूला एखादा यजमान मिळाला की तो तिथे जाऊन चिकटायचा प्रयत्न करतो. यजमान पेशींच्या अंगावरची प्रथिनं आणि



विषाणूच्या अंगावरची प्रथिनं यांचे छत्तीस गुण जमले की विषाणू 'घरजावई' होतो, आणि सासुरवाडीला त्याचा जीव जाईपर्यंत लुटायला सुरुवात करतो.

विषाणूंची प्रथिनं कॅपसिडवर, कॅपसिडच्या आतमध्ये आणि स्निग्ध आच्छादनावर असतात. सार्ससारख्या विषाणूंच्या कॅपसिडवर प्रथिनांचे काटे असतात. (या काट्यांमुळे हे विषाणू मुकुटासारखे दिसतात, म्हणून यांचं नाव आहे corona virus. यातलं कोरोना म्हणजे लॅटिनमध्ये मुकुट.) या प्रथिनांना नाव आहे RBD. यजमानाच्या अंगावरच्या प्रथिनांना नाव ACE आहे. रोगाची लागण व्हायची पहिली पायरी म्हणजे RBD आणि ACE यांचा मिलाफ. त्यानंतर कॅपसिड फुटते आणि आतला आर.एन.ए. (किंवा डी.एन.ए.) अलगद यजमान पेशीत उतरतो. पुढे तो पेशीवर सत्ता गाजवायला सुरुवात करतो. स्वत:च्या प्रती काढतो. तेथील सामान वापरून प्रथिनं तयार करतो. तयार केलेले घटक योजनाबद्ध एकत्रित करून नवीन विषाणू तयार करतो. सगळी कामं झाली की यजमान पेशीचं पोट फोडतो. त्यातून असंख्य विषाणू बाहेर पडतात, आणि नवीन जीवनचक्र चालू होतं.

विषाणूंचे यजमान प्राणीच काय, पण वनस्पतीही असतात. आश्चर्य म्हणजे बॅक्टेरियासुद्धा असू शकतात! बॅक्टेरियांवर जगणाऱ्या विषाणूंना Bacteriaphage म्हणतात. पृथ्वीवर एकूण $१०^{३१}$ विषाणू आहेत, असा अंदाज आहे. म्हणजे वनस्पती, प्राणी, बॅक्टेरिया या सर्वांच्या बेरजेपेक्षा जास्त. विश्वातल्या एकूण ताऱ्यांपेक्षा लाखो पट जास्त! विषाणूंची Taxonomy करून त्यातल्या पाच हजारांचा अभ्यास झाला आहे. आज डेटाबेसमध्ये त्यांचे ७५,००० जिनोम आहेत.

मानवजातीला शाप ठरलेल्या देवी, पोलिओ यांसारख्या विषाणूंमुळे होणाऱ्या मातब्बर रोगांवर आपण मात केली आहे. फ्लू मात्र चिवटपणे टिकून आहे. रोगाचं हवेतून माणूस ते माणूस संक्रमण हे त्याचं मुख्य कारण. फ्लूच्या विषाणूंवरून फ्लूचे चार प्रकार केले आहेत : A, B, C, आणि D. यातल्या D चा माणसाला उपद्रव नाही. C चा उपद्रव फक्त माणसालाच. त्यामुळे त्याच्यावर ताबा आणणं सोपं आहे. B चा उपद्रव माणसाला असला तरी हा फारसा त्रासदायक नाही. सगळ्यात महत्त्वाचा, आणि बहुरूपी, फ्लू म्हणजे A प्रकारचा. आणि त्यात H आणि N ही कॅपसिडवरच्या Hemagglutinin आणि Neuraminidase प्रथिनांची अक्षरं देऊन उपप्रकार केले आहेत.

उदाहरणार्थ, H1N1 हा १९१८ चा फ्लू. H1N2 हा २००९ चा. H2N2 हा १९५७ चा एशियन फ्लू. H3N2 हा १९६८ चा हाँगकाँग फ्लू. H5N1 हा २००४ चा. H7N9 हा सर्वात भयानक फ्लू मानला जातो. (तो अजून आलेला नाही!) H मध्ये १ ते १८ आणि N मध्ये १ ते ११ इतके असे १९८ फ्लूचे प्रकार होऊ शकतात. प्रत्यक्षात त्यातल्या १३७ जणांची आपल्याला माहिती आहे. अमेरिकेत मोसमी फ्लूची लस देतात त्यात H1N1, H1N2, H3N2 आणि B यांची मिश्र लस असते.

विषाणूंची आंतररचना सोपी असल्यानं त्यांच्यात परिस्थितीनुसार बदल (mutation) होत राहतात. फ्लूचा नायनाट न होण्यामागचं हे दुसरं महत्त्वाचं कारण आहे. त्यामुळे अमेरिकेत देणाऱ्या मोसमी लसीमध्ये दरवर्षी बदल करावे लागतात. नवीन लस तयार करायला साधारण सहा महिन्यांचा अवधी लागतो. फ्लूवर झालेलं हे सगळं संशोधन कोविड-१९ शी सामना करायला उपयोगी पडणार आहे. हा सामना दोन आघाड्यांवर असेल. पहिली आघाडी चाचण्यांची. दुसरी आघाडी प्रतिबंधक योजनांची. या योजना दोन प्रकारच्या असतात. एक म्हणजे लस. दुसरी रुग्णावर इलाज.

कोरोनाच्या एका प्रकारच्या चाचणीत शरीरातील विषाणूंचा शोध घेतला जातो. विषाणूंचा म्हणजे त्यातल्या फक्त आर. एन.ए.तल्या काही जनुकांचा. ज्या तंत्रांद्वारे हे काम केलं जातं त्यांना RT-PCR अशी संज्ञा आहे. या चाचणीचा निकाल कळायला दोन तास ते दोन दिवस एवढा वेळ लागतो. रोग श्वसनसंस्थेचा असल्यानं नमुना मिळवण्याकरता कापसाचा एक छोटा बोळा काडीच्या टोकाला लावून नाकाच्या वरच्या बाजूस फिरवतात. दुसऱ्या प्रकारच्या चाचणीत विषाणूंमुळे तयार झालेल्या रक्तातल्या अँटीबॉडींचा शोध घेतला जातो. यात कोविड-१९ येऊन गेला आहे का एवढंच कळतं.

अँटीबॉडी शोधण्याची कसोटी ELISA (Enzyme-linked Immunosorbent Assay) या तंत्राचा उपयोग करते. या कसोटीत रोगाचे बाहेरून आणलेले विषाणू रुग्णाच्या रक्तातल्या सिरममध्ये सोडतात. सिरममध्ये जर अँटीबॉडी असतील तर त्या विषाणूला चिकटतात. त्यात विशिष्ट प्रकारचे Reagent टाकले तर सिरमचा रंग बदलतो. दोन्ही चाचण्या गेल्या चाळीस वर्षांतल्या आहेत. आणखी एक प्रकार आहे. त्यात रोग्याचा CT scan घेतात. हा अर्थातच १०० टक्के यशस्वी होतो. पण तो आहे फार खर्चाचा. चीनच्या सरकारनंच अंमलात आणला म्हणून तो करणं शक्य झालं.

लस काय किंवा रोगावरचं औषध काय, यांचा प्रयोगशाळा ते केमिस्टचं दुकान हा प्रवास चांगला लंबाचौडा असतो. आणि तो यशस्वी होईलच हे सांगता येत नाही. औषधाचा शोध लागला की प्रथम त्याचा प्रयोग प्राण्यांवर होतो. याला pre-clinical trial म्हणतात. त्यानंतर phase I, phase II, phase III अशा तीन क्लिनिकल चाचण्या होतात. कधी phase IV! बाजारात औषध आल्यानंतरही त्याच्या परिणाम-दुष्परिणाम यांवर लक्ष ठेवलं जातं. सगळा खर्च काही अब्ज डॉलर जातो. कित्येक वेळा वर्षानुवर्षं प्रयत्न करूनही औषध मिळत नाही. औषधं एवढी महाग का याचं उत्तर इथे आहे.

लस ही दोन प्रकारची असते. एकीत अशक्त केलेल्या विषाणूंचं कल्चर करून, ते रोग्यास देऊन त्याच्या संरक्षक पेशींना लढाईला तयार करायचं. दुसऱ्यात विषाणूंची प्रथिने रोग्याच्या शरीरात सोडायची. ही प्रथिनं रोगप्रतिबंधक अँटीबॉडी तयार करतात. काही प्रकारच्या लसी प्रचंड यशस्वी झाल्या आहेत. पोलिओची लस येण्याआधी अमेरिकेत वर्षामागे २०,००० लोकांमध्ये (बहुतांश लहान मुलं) पोलिओ शारीरिक व्यंग निर्माण करत असे आणि ४,००० जणांना मृत्यू देत असे. आता पोलिओ संपल्यातच जमा आहे. गोवरच्या लसीमुळे गोवर ९९ टक्के मुलांना होत नाही.

फ्लूच्या विषाणूंचं पहिलं कल्चर दोन अमेरिकन शास्त्रज्ञांनी

१९३० साली कोंबड्यांच्या अंड्यांत केलं. (आजही एकूण अंड्यांच्या उत्पन्नातली ४० टक्के फ्लूच्या लसीकरता वापरली जातात.) पोलिओची लस मानवी गर्भपेशीत करतात. कोरोनाची साथ आल्यापासून महिन्याच्या आत, २८ जानेवारी २०२० रोजी, ऑस्ट्रेलियातल्या शास्त्रज्ञांनी प्रयोगशाळेत विषाणूंची वाढ (कल्चर) केली. हाही एक प्रकारचा विक्रम आहे! याशिवाय कोरोनाचा जिनोम उपलब्ध आहे. यापुढे ६ महिन्यांत लस आणि १२ महिन्यांत जगाला पुरवठा अशी त्यांची मोठी महत्त्वाकांक्षा आहे.

१९६० च्या दशकापासून विषाणूंविरुद्ध औषधं तयार करायला सुरुवात झाली. फ्लू ए आणि बी, HIV, हेपटाइटस बी आणि सी, हर्पिज यावरची औषधं निघाली. अशा औषधांचा रोख विषाणू मारण्यापेक्षा त्यांची वाढ थांबवण्याकडे असतो. त्यासाठी विषाणूंच्या जीवनचक्राच्या वेगवेगळ्या टप्प्यावर अडथळे निर्माण करणारी औषधं शोधतात. १९८० नंतर शिस्तबद्ध जनुकशास्त्राच्या साहाय्यानं आणि संगणकांचा वापर करून औषधांचा शोध घेणं सोपं झालं आहे.

कोविड-१९ विरुद्ध अजूनपर्यंत औषध मिळालेलं नाही. अशा असहाय परिस्थितीत डॉक्टर मंडळी दुसऱ्याच रोगावरचं चाललेलं (किंवा न चाललेलंसुद्धा!) औषध वापरून बघतात. याला Drug repurposing किंवा off-label use अशा संज्ञा आहेत. कोविड-१९ विरुद्ध मलेरियावरचे हायड्राक्सीक्लोरोक्वीन वापरा अशी एक टूम आहे. तसेच इबोलावर तयार केलेलं पण अयशस्वी ठरलेलं रेम्डेझव्हीर वापरा असा दुसरा एक पंथ आहे. क्षयावरची BCG लससुद्धा चालू शकेल असं काही संशोधकांचे निदान आहे.

कोरोना कुठून आला याबद्दल सध्या वाद आहे. एक तर्क असा, की चिन्यांनी तो प्रयोगशाळेत तयार केला आहे. विषाणूंचा साठा ठेवलेल्या आणि नवीन विषाणू बनवणाऱ्या प्रयोगशाळा देशादेशांतून आहेत. आज ज्या रोगाला आपण संपूर्ण नष्ट केलं अशा देवीचेही (Small Pox) विषाणू तिथे आहेत. इतरही रोगांचे आहेत. अमेरिकेनं तर १९१८ साली फ्लूनं मेलेल्या माणसांची प्रेतं उकरून त्यातून उलट्या इंजिनीयरिंगनं H1N1 हा विषाणू तयार केला आहे! तो एकदा माकडांवर प्रयोग करायला वापरला. सात दिवसांच्या आतच त्यांच्या प्रतिकारसंस्थेची प्रतिक्रिया इतक्या प्रचंड प्रमाणात (Cytokine Storm) झाली की माकडं तडफडायला लागली. कोविड-१९ चे अनेक रुग्ण अशा प्रतिकारसंस्थेच्या अतिप्रतिक्रियेनं मरतात.


प्रश्न असा पडतो, की चीनला खरोखरच जगाला नडायचं असतं तर त्यांनी त्याकरता कोरोनाऐवजी दुसरा अतिभयंकर असा विषाणू निवडला नसता का? शिवाय चीनचा सर्व जगाशी व्यापार होत असताना तो त्यात खंड पाडून स्वत:च्या पायावर धोंडा कशाला पाडून घेईल? याउलट एकदा संसर्गजन्य रोगाची कल्पना आल्यानंतर चीननं जी झटपट पावलं उचलली ती कौतुकास्पद आहेत. दहा दिवसांत सर्व साधनसामुग्रीनं युक्त अशी रुग्णालयं उभी केली. त्यांचा कामाचा उरक इतका, की तीन महिन्यांनंतर तिथे नवीन रुग्ण नाही. रोग उद्‌भवल्यापासून महिनाभरात विषाणूचा जिनोम तयार करून तो इंटरनेटवर दिला. अमेरिकेत मुखवट्यांचा (Masks) तुटवडा पडला तेव्हा बॉस्टन येथील फूटबॉलच्या टीमच्या मालकाला चीननं एक विमान भरून मुखवटे पाठवले.


तेव्हा कोरोनापासून आपण एक धडा शिकला पाहिजे. तो म्हणजे एकमेकांशी सहकार्य. तेव्हा एकमेकाची उणीदुणी काढण्यापेक्षा चीननं त्या रोगाच्या मुसक्या कशा बांधल्या याचा तिथे जाऊन अभ्यास करणं आपल्या आरोग्याच्या आणि स्वास्थ्याच्या दृष्टीनं अतिशय गरजेचं आहे. कावेबाज विषाणूंचा मुकाबला सर्वांनी एकत्र येऊन करणं हे शहाणपणाचं ठरेल. बॅक्टेरियाच्या एकहजारांश आकाराचा हा अर्धजीव प्रलयकाळी सर्व सजीवसृष्टीचा फडशा पाडण्याची ताकद बाळगून आहे. फडशा पाडेल आणि नंतर खायला काही नाही म्हणून हा भस्मासुर स्वत:ही संपेल. तेव्हा निसर्गाला श्रीगणेशापासून नव्यानं डी.एन.ए. तयार करावा लागेल.

याउलट माणसाला काही अक्कल असेल तर तो या राक्षसाची ताकद विधायक कार्याला लावेल. ड्रॉइंग बोर्डवरची एक कल्पना म्हणजे विषाणूंना कॅन्सर पेशींच्या मागे लावायचं आणि त्या पेशींना स्वाहा करायला लावायचं! यानं मानवजातीचं दु:ख किती कमी होईल! पण माणसाच्या डी.एन.ए.मध्येच जर त्याचा स्वत:चा संहार लिहिला असेल तर कोण काय करणार?

**– डॉ. मोहन द्रविड**
भ्रमणध्वनी : ९८२०५-६३१३०
mohan.drawid@gmail.com

ग्रंथाली

सॅल्यूट
**यशवंत व्हटकर**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**


मन मुक्त... माझे!
**नीलिमा गुणे-गोळे**
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रुपये**



**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**


# कोरोनाच्या विषाणूचे जागतिक परिणाम

**ख**रं म्हणजे कोरोना विषाणू तेवढा हानिकारक नाही. नेहमीच्या फ्लूपेक्षा कितीतरी गरीब. त्याच्या बाधेमुळे अमेरिकेत १ टक्क्यापेक्षा कमी लोक बळी गेले. आरोग्यसेवा विकसित नसलेल्या देशांत ते प्रमाण जास्त आढळून आलं. वयोवृद्ध लोकांमध्ये मृत्यूचं प्रमाण १५ टक्क्यांपर्यंत जाऊ शकतं. धट्ट्याकट्ट्या पिढीत त्याचे फारसे दुष्परिणाम दिसत नाहीत. तरीही या विषाणूमुळे सगळे देश भयभीत होऊन आपल्याभोवती भिंत उभारत आहेत. युरोपीय राष्ट्रसंघानं घटक देशाच्या सरहद्दी पुसून सर्वांना देश खुला केला म्हणून तो या विहारस्वातंत्र्याचा उत्सव करत असे. पण मनुष्याच्या डोळ्यांना न दिसणाऱ्या शत्रूनं त्यात विष कालवलं. त्याचा प्रसार थांबवण्यासाठी अनेक देशांनी मुक्त मानवी परिवहन बंद केलं. त्यामुळे उभ्या युरोपीय राष्ट्रसंघाचं अस्तित्वच धोक्यात येईल अशी वॉशिंग्टन पोस्ट या दैनिकानं गर्जना केली.

अमेरिकन माणूस चर्चपेक्षा मॅकडॉनल्डस् व स्टारपब्समध्ये जास्त जातो. पण त्यानं या आराध्यदेवतांनाही भेट देणं कमी केलं. अमेरिकेत जो तो मुखवटे (Masks) चढवून मिरवू लागला. जणू काही तो सौंदर्यवर्धनाचा भागच झाला. सर्वच मुखवटे परिणामकारक नसतात व त्यामुळे आरोग्यक्षेत्रात काम करणाऱ्यांना ते कमी पडले इकडे सर्वांनी दुर्लक्ष केलं. आपण आरोग्यदक्ष आहोत हे जगाला दाखवण्यासाठी ही सजगता कमी पडली. एवढी दक्षता घेऊनही विषाणूचा प्रसार वाढतच राहिला. २ मार्च २०२० पर्यंत त्यानं ६६ पेक्षा जास्त देशांत हजेरी लावली होती व ८०,००० पेक्षा अधिक लोकांना बाधित केले होते. हा लेख वाचकांच्या हाती पडेपर्यंत ही संख्या काही लाखांच्या वर गेलेली असेल. साम्यवादी चीनने जगाला दिलेले हे लोण महाग पडले कारण आता त्या देशापेक्षा त्या बाहेरील राष्ट्रांमध्ये बाधितांची संख्या वाढली आहे. याचे लगेच जागतिक परिणाम गोचर झाले आहेत.

जपाननं सर्व शाळा बंद करून टोकिओच्या डिसनीलँडला कुलूप लावलं. जगाची सांस्कृतिक राजधानी समजल्या जाणाऱ्या पॅरिसनं जगप्रसिद्ध लुव्हर (Louvre) ह्या प्राचीन कलासंग्रहालयाची दारं उघडली नाहीत. सौदी अरेबियात हाज या मुस्लीम सणासाठी जगभरातून भक्त येतात. त्यावरही पाणी फिरवण्यात आलं. इटली हा देश फूटबॉलवेडा (soccer). तिथे फूटबॉलचे सामने अतिलोकप्रिय म्हणून ते हेतूत: रिकाम्या

> ओहोटी आल्यावर जसे खडक गोचर होतात तसे या विषाणूमुळे चीन इतर देशांशी व्यापाराने किती विकृतीपूर्ण घट्ट जोडला आहे हे जगाला कळले. अमेरिकेत रोगांवर नवीन औषधांचे नेहमी शोध लागतात, पण १५० एक औषधांसाठी जी प्रक्रियेत रसायने लागतात ती एक तर भारतातून आणि त्याहीपेक्षा जास्त चीनमधून येतात असे या विषाणूने उघडकीस आणले, कारण या देशात एकदम औषधनिर्मितीवर परिणाम झाले. जीवसंवर्धन करणाऱ्या औषधांवर आपण त्या देशावर अवलंबून राहतो हे बघून अनेकांना घृणा आली आणि ही पुरवठासाखळी (Supply chain) स्थलांतरित करण्याचे अमेरिकेत प्रयत्न सुरू झाले.



ठेवलेल्या क्रीडागृहात खेळण्यात आले. रसिकांनी ते दूरदर्शनवर बघितले. या जमावबंदीमुळे कोविड-१९ विषाणूचा प्रसार मर्यादित झाला. पण हे भाग्य इराणला मिळालं नाही. त्याचा आरोग्यमंत्री फेब्रुवारी २४, २०२० रोजी जनतेला या विषाणूविषयी सावध कसे राहावे यावर भाषण ठोकताना सारखा चेहऱ्यावरचा घाम पुसू लागला. नंतर त्याला या विषाणूने लक्ष्य केले असे आढळून आले व दवाखान्यात भरती करावे लागले. या जगव्यापी प्रसारामुळे त्या मुस्लीम देशाला भेट देऊन अमेरिकेत येणाऱ्यांवर १४ दिवसांचे आरोग्यविषयक विलगीकरण (Quarantine) ट्रंपनी सक्तीचे केले. दक्षिण कोरियातही या विषाणूने थैमान घातले. उत्तर कोरियाने तर चीनची सरहद्द बंदच केली. एका अभाग्याला तो रोग झाला आणि त्या साम्यवादी देशाने त्याला गोळ्या घालून प्रश्न मिटवून टाकला, अशी एक बातमी होती.

या विषाणूचा पहिला तडाखा बसला तो आंतरराष्ट्रीय पर्यटकांना. सर्व जगातून चीनला उड्डाणं जाणाऱ्या २० पेक्षा जास्त वायूसेवा कंपन्यांनी सेवा बंद करून त्या लाल देशाला जगापासून विलग केले. जणू काही या देशाने एका भव्य पिंजऱ्याचे रूप धारण केले. याचा अध्यक्ष जिनपिंगला राग आला. देशातले आणि परदेशात स्थायिक झालेले सर्वच चिनी या विषाणूमुळे बाधित झाले असे जग समजू लागले. अमेरिकेत हजारो भारतीय व तेवढीच किंवा त्यापेक्षा जास्त चिनी उपाहारगृहे आहेत. ती वर्षानुवर्षे अमेरिकेत राहणारे चिनी लोक चालवतात. त्यांचा चीनमधल्या भानगडींशी काहीएक संबंध नाही. तरीही तिथल्या लोकांना विषाणू संसर्ग झाला या भीतीने ग्राहकांनी तिथे जाणे बंद किंवा कमी केले आणि ती ओस पडली. एवढेच कशाला, आमच्या रहिवासी टॉवरमध्ये अनेक चिनी लोक राहतात. ते सगळे उच्चविद्याविभूषित आणि समृद्ध. त्यांच्यापासूनही लोक दूर राहू लागले. जनतेची ही वागणूक बघून त्यांनी स्वत:ला आपल्या संकुलात कोंडून घेतले. जातीयवाद परिचित असलेल्या भारतीय माणसाला ही मानवी वागणूक समजू शकेल.

ओहोटी आल्यावर जसे खडक गोचर होतात तसे या विषाणूमुळे चीन इतर देशांशी व्यापाराने किती विकृतीपूर्ण घट्ट जोडला आहे हे जगाला कळले. अमेरिकेत रोगांवर नवीन औषधांचे नेहमी शोध लागतात, पण १५० एक औषधांसाठी जी प्रक्रियित रसायने लागतात ती एक तर भारतातून आणि त्याहीपेक्षा जास्त चीनमधून येतात असे या विषाणूने उघडकीस आणले. कारण या देशात औषधपुरवठ्यावर एकदम परिणाम झाले. जीवसंवर्धन करणाऱ्या औषधांवर आपण त्या देशावर अवलंबून राहतो हे बघून अनेकांना घृणा आली आणि ही पुरवठासाखळी (Supply chain) अमेरिकेत स्थलांतरित करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

नवलाची गोष्ट म्हणजे ही रसायने या विषाणूचा जन्म झालेल्या वुहान शहरातूनच येतात. तिथे त्यांच्या शुद्धीकरणाचे कारखाने आहेत.

भारतातही या कोविड-१९ नावाच्या विषाणूने धुमाकूळ माजवला. पण तो वित्तमंत्र्यांना व त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या बाबूंना आपल्या अकार्यक्षमतेचे (Incompetence) समर्थन करण्यास कामी आला. सुमारे १ वर्षांपूर्वी आपल्या वित्तमंत्रीबाईंनी पोथीचे कापड गुंडाळून मोठ्या धुमधडाक्याने जो अर्थसंकल्प सादर केला, त्यात १.२ लाख कोटी (ट्रिलियन) रुपयांची सरकार निर्गुंतवणूक करून आर्थिक तूट कमी करेल असे म्हटले होते. त्यामुळे आर्थिक बाजार तग धरून राहिला. आता आपला देश पोट भरण्यासाठी घरातले सोने विकत आहे याची सर्वसामान्यांना कल्पना नाही म्हणून बरे. भांडवली गुंतवणूक करण्यासाठी असे केले तर ते क्षम्य समजता येईल. कारण त्यातून देश प्रगत होतो. परंतु पोटाची खळगी भरण्यासाठी जेव्हा मालमत्ता विकावी लागते तेव्हा आर्थिक बाजार व वित्तसंस्था क्षमा करत नाही.

एक ट्रिलियन रुपयाचे उद्दिष्ट गाठणे अशक्य आहे हे नऊ-दहा महिन्यांनी उघडकीस आले तेव्हा आपल्या वित्तमंत्रीबाईंनी काय केले? ते उद्दिष्टच बदलले. ते ६५००० कोटींवर आणून स्वत:ची पाठ थोपटली. पण मग मार्च २०२० म्हणजे आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना उगवला आणि वित्तमंत्रीबाईंची घबराट झाली. कारण सुधारित उद्दिष्ट गाठणेही शक्य झाले नाही. त्यात १५००० कोटी रुपयांची तूट होती. अमेरिकेतले कृष्णवर्णीय आणि आपले बाबू यांच्यामध्ये एक सादृश्य आहे. ते स्वत:चे अवगुण कधीही मान्य करणार नाहीत. ते कुठले तरी कारण शोधून स्वत: नामानिराळे राहतात. त्यांच्या सुदैवाने व देशाच्या दुर्दैवाने लगेच सयुक्तिक निमित्त सापडलं. कोरोना विषाणूमुळे विक्री झाली नाही हे सकृतदर्शनी कुणालाही पटेल. पण अशा निर्गुंतवणुकीसाठी महिने अगोदर वाटाघाटी कराव्या लागतात म्हणजे कोरोना क्षितिजावर येण्यापूर्वीच विक्रीची चक्रे फिरत होती. पण या नाकर्तेपणापासून सुटका करण्यास कोरोना धावून आला म्हणून

आपल्या बाबूंनी व वित्तमंत्रीबाईंनी त्याला हात जोडून नमस्कार केला असावा.

अमेरिकेची शस्त्रास्त्रे गेल्या १०-१५ वर्षात सारखी एकामागून एक अशी युद्धे खेळावी लागल्यामुळे झिजली होती. शिवाय ओबामांनी संरक्षणावर खर्च होणाऱ्या पुंजीत पुरेशी वाढ केली नव्हती. पण ट्रंपनी आपल्या ३ वर्षांच्या कारकिर्दीत हे चित्र पार बदलले. २.२ ट्रिलियन डॉलर खर्च करून संरक्षणखात्याचे पुनरुज्जीवन केले. नवीन अत्याधुनिक विमाने, रणगाडे, तोफा व आपण कल्पनादेखील करू शकत नाही अशी अभिनव शस्त्रे विकसित करून घेतली. आता अमेरिकेच्या लष्करी शक्तीशी कुठलाच देश स्पर्धा करू शकत नाही. पण असे करताना आपण चीनमधले सुटे भाग वापरले याचे भान होताच हा देश अंर्तमुख होऊन विचारात पडला. आता ते देशांतर्गत बनवले जातील यात शंका नाही.

मात्र हे मोठमोठे उद्योग सोडले तरी कोरोना विषाणूने लघुउद्योगांचाही बळी घेतला. त्यातून अमेरिकेतल्या किती लोकांना चीन पोटापाण्याची संधी देतो ते कळले. एका माणसाने अमेरिकेतल्या शृंखला किरकोळ दुकानांना (Walmart, Target, Macy's वगैरे) वस्तूपुरवठा करण्याचा उद्योग सुरू केला. तो अमेरिकेत वस्त्ररचना (designs) करून व चीनमधून कापड विकत घेऊन श्रीलंकेमध्ये शिवणकाम करी. (भारताला बगल मारण्याचे एक कारण म्हणजे तिथे चोरून बालमजूर वापरतात.) पण आता ही कापडउपलब्धी बंद झाली आणि त्याला शेकडो मजुरांना नारळ द्यावा लागला. शेवटी उद्योग बंद पडला. चीनमधून भारतीय दागिन्यांची अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. हा धंदा करणारे भारतीयच. पण आता त्यांच्या पोटावरही पाय पडला. या देशातील ४० लाख भारतीयांची व २ लाख विद्यार्थ्यांची गरज भागवण्यासाठी भारतीय वस्तू व माल भारत सोडून अनेक देशांतून आयात केला जातो. चपातीचे पीठ कॅनडा, लोणची ब्रिटन, गणपतीच्या मूर्ती व पूजेचे साहित्य चीन, अशा विविध देशांतून वस्तू येतात. जवळजवळ ९० टक्के खेळणी चीनमधून येतात. त्यामुळे येत्या ख्रिसमसच्या वेळी बालगोपालांची घोर निराशा होईल. तसेच गणपतीबाप्पा यावर्षी निराश होण्याची दाट शक्यता.

जगात सर्वात जास्त विद्युत उपकरणांची (electronics) निर्मिती चीनमध्ये होते. ॲपल कंपनीची नाळ त्या देशाशी जोडली आहे कारण जवळजवळ सर्व आयफोन्स, आयपॅड्स व संगणकयंत्र वगैरेंची बांधणी त्या देशात केली जाते. त्यांचे अनेक कारखाने चीनमध्ये असून त्यांच्यात दशलक्षावधी अल्पकुशल व अल्पपढीत मजूर काम करते. आपण देशात बेरोजगारी वाढली म्हणून अश्रू ढाळतो तर चीन उद्योगस्नेही वातावरण निर्माण करून जागतिक उद्योगांना बोलावते. तर या कोविड-१९ चा उद्रेक सुरू होताच चीनने सर्व कारखाने बंद करून मजूर सक्तीने गावांकडे पाठवले. याचा तडाखा ७००० मैल दूर असलेल्या 'ॲपल'ला बसला. आयफोन म्हणजे त्याची जीवननाळ. त्यापासून कंपनी दरवर्षी अब्जावधी डॉलरचा नफा कमावते. विषाणूमुळे कंपनीला तोंडातून भाकर काढून घेतल्यासारखे झाले.

सुदैवाची गोष्ट ही की हा विषाणू आटोक्यात आल्यामुळे चीनने मार्च-एप्रिलमध्ये कारखाने उघडले आणि ॲपल'च्या कार्यवाही मुख्याधिकाऱ्याने (CEO) सुटकेचा श्वास सोडला. अशावेळी एका देशावर अवलंबून न राहता दुसऱ्या एखाद्या देशात उपकरण-बांधणीची सोय करायला नको का? पण टिम कूक (Tim Cook) ने लोकशाहीवादी भारताचे नाक कापून साम्यवादी व्हिएटनाम निवडला. या विषाणूमुळे भारताचा काही फायदा झाला नाही.

आता या विषाणूचे जगाच्या अर्थकारणावर काय परिणाम झाले हे बघणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे जगातले शेअर बाजार गडगडले आणि गुंतवणूकदारांचे खूप नुकसान झाले. ते जगव्यापी असल्यामुळे आर्थिक मंदीचे सावट सर्वत्र पसरले आहे. त्यामुळे जगाचा वाढदर २.९ टक्क्यांवरून १.५ टक्क्यांवर घसरेल अशी भीती बँक ऑफ इंग्लंडने अलिकडेच व्यक्त केली. ही बातमी भारतासाठी आत्मघातकी आहे कारण आपल्या निष्क्रिय वित्तमंत्रीबाई जगाचे अर्थकारण उंचावले तर भारताचे आपोआप वर जाईल म्हणून वाट पाहत बसल्या आहेत. मार्च २०२० चा वाढदर चीनमध्ये ४.५ टक्के होईल असे ब्लूमबर्ग वित्तसेवा कंपनी म्हणते. हा आकडा आपल्याला चांगला परिचयाचा, कारण आपले अर्थकारण त्याच तळघरात मोडते. जगाच्या ढोबळ उत्पन्नाचा १६ टक्के (World GDP) हिस्सा चीनचा असल्यामुळे त्या देशाचा हिस्सा घसरताच जगाला खोकला येईल हे उघड आहे. पण या विषाणूचे उच्चाटन करण्यास ते यशस्वी झाले तर अर्थकारणाचा वाढदर लगेच उर्ध्व दिशेने जाईल यात वाद नाही. चीनच्या औद्योगिक निर्देशांकाने (Manufacturing Index) फेब्रुवारी २०२० मध्ये ऐतिहासिक नीचांक गाठला. म्हणजे उत्पादन घटले. जगातले सर्वात मोठे जुगारस्थळ म्हणजे पूर्व किनाऱ्यावर असलेली मकाऊ (Macau) बेटे. तिथे लॉस व्हेगासमधील मोठमोठ्या कंपन्यांचे भव्यदिव्य हॉटेल्स व जुगारगृहे आहेत. या विषाणूमुळे ती ओस पडली आहेत. जिवाला धोका असताना जुगार खेळून जिवाची मुंबई कोण करणार? त्याचा परिणाम काही प्रमाणात लॉस वेगासवरदेखील झाला. अनेक संस्थांनी हजारो सदस्य असलेली अधिवेशने रद्द केली. होटेल्स व रेस्टॉरंट रिकामी राहिली. अशावेळी मनसोक्त प्यायल्याशिवाय सुख मिळत नाही, पण त्याची निशागारांवरही (Bars) सावली पसरली.

जगातल्या अब्जाधीशांची झोप उडाली. ५०० सर्वाधिक श्रीमंत उद्योगपतींना एकूण ४४४ अब्ज डॉलरचा फटका बसला. यात अग्रणी असलेल्या ॲमॅझॉनच्या संस्थापकाला तर ६-७ अब्ज डॉलरची फोडणी बसली. अमेरिकेतला शेअरबाजार ४-५ ट्रिलियन डॉलरने तर भारताचा ४ लाख कोटी रुपयांनी संकुचित झाला. जगभर अर्थस्त्रावाचं रक्त सांडलं. ते कमी करून अर्थकारण स्थिरावण्यासाठी चीनने व्याज दरात घट करून पतपुरवठा वाढवला. त्यामुळे उद्योगांना स्वस्त दरात कर्ज मिळून तरंगत राहण्यास मदत झाली. अमेरिकेच्या केंद्रीय बँकेने परवा अगोदरच तळघरात असलेल्या व्याजदरात ०.५ टक्केची काटछाट केली. त्यामुळे इतिहासात प्रथमच अमेरिकन सरकारच्या १० वर्षे कर्जरोख्यावर ०.६ टक्क्यापेक्षा कमी व्याज मिळू लागले. त्याच मुदतीच्या भारतीय सरकारच्या कर्जरोख्यांवर ६.२४ टक्के व्याज मिळत होते. आता दर तर अमेरिकेतले शून्यवत झाले आहेत.

त्यामुळे कर्जबाजारी होणे स्वस्त झाले.

परंतु याप्रमाणे भांडवल स्वस्त केल्यामुळे अमेरिकेच्या अर्थकारणावर फारसे सकारात्मक परिणाम झाले नाहीत. कारण अमेरिकेचे दुखणे भांडवलटंचाई व महागाई नसून तो द्वाड कोविड-१९ विषाणू आहे. त्याचे उच्चाटन होताच किंवा त्याला आटोक्यात आणताच त्याला उसळी येईल असं ट्रंप म्हणतात.

आपल्या वित्तमंत्र्यांना हे स्वातंत्र्य नाही. अर्थसंकल्पात अगोदरच अपेक्षेपेक्षा जास्त तूट (३.८ टक्के) असल्यामुळे करदरात किंवा व्याजदरात घट केली तर त्यात भर पडेल. म्हणून त्यांनी सकारात्मक प्रतिमा प्रक्षेपित करण्याचा पावित्रा घेतला. त्यांना फेब्रुवारी २०२० मध्ये कोरोना विषाणू जगभर नंगानाच करत असताना अर्थकारण पल्लवित होत असल्याची चिन्हे दिसली. ते इतर कुणाला दिसले नाही! म्हणून त्यांना महाभारताच्या संजयप्रमाणे दिव्यचक्षू लाभलेत की काय अशी शंका येते. खरी परिस्थिती किती वाईट आहे याची कल्पना टाइम्स ऑफ इंडियाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आकड्यांवरून येते.

एप्रिल २०१९ ते जानेवारी २०२० च्या १० महिन्यांच्या काळात सरकारचे एकूण उत्पन्न १२.८२ ट्रिलियन रुपये, पण खर्च मात्र २२.६८ ट्रिलियन रुपये होता. म्हणजे त्यात १० ट्रिलियन रुपयाचे भोक. १०० रुपयाच्या कमाईमागे सरकारने १२८ रुपये खर्च केले. अर्थातच हे भगदाड पैसे उसने घेऊन भरावं लागलं. हे पैसे कशासाठी वापरण्यास आले? त्यातले ४.७ ट्रिलियन रुपये फुगलेल्या कर्जावरील वाढते व्याज भरण्यासाठी व २.६२ ट्रिलियन अनुदानासाठी. म्हणजे आपल्यावर कर्ज काढून व्याज भरण्याचा पाळी आली आहे. असा तोकडा अर्थसंकल्प वापरून सर्वसाधारण माणूस किती दिवस तगत राहील? आता या विषाणूने जो उच्छाद मांडला त्याचे काय परिणाम होतील याची कुणालाच कल्पना नाही. अशा परिस्थितीत कुणीही मूठ आवळून खर्च कमी करेल. पण भारतीय सरकारला त्याचे वावडे आहे. आपल्या मंत्रालयात खरोखरीच एक आवकीचा व दुसरा खर्चाचा बाबू आहे. पण त्यांचे कधी सूत जमत नाही ही गोष्ट वेगळी.


परवाच इमिरेटस (Emirates) या जगातल्या सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय वायुसेना कंपनीने चीनला, इराणला व इटलीला जाणारी उड्डाणे बंद केली. त्यामुळे कंपनीचे उत्पन्न कमी होईल म्हणून तिने कर्मचाऱ्यांना १ महिना बिनपगारी सुट्टी द्यावी असे ठरवले. आपल्या बाबूशाहीने तसे केले तर काय बिघडले? नाही तरी आपले अर्थकारण रात्रीला वाढते असे म्हणतात, कारण त्यावेळी बाबू झोपलेले असतात. म्हणून ते एक महिना घरी बसले तर काय जादू घडेल याची कल्पनाच केलेली बरी.

या विषाणूचे सावट अमेरिकेच्या राजकारणावरदेखील पसरले. डेमॉक्रॉटिक पक्षाने लगेच त्याचे कारण नसता राजकियीकरण केले. ट्रंपनी जानेवारी २०२० मध्ये, हा विषाणू चीनबाहेर पडण्यापूर्वी त्या देशाच्या प्रवाशांवर बंदी घालून दूरदृष्टीपणा दाखवला. त्यांनी वेळीच त्याचे गांभीर्य ओळखले. हे चीनच्या जिनपिंगला चपराक दिल्यासारखे होते. कारण ही दक्षता चीनच्या नेत्यात असलेली अविश्वासार्हता जगाला दाखवत होती. पण या दृष्टेपणाचे कौतुक करण्याऐवजी डेमॉक्रॅटिक पक्षाच्या पक्षश्रेष्ठींनी (नॅन्सी पेलोसी, चक शुमर परौरे) ट्रंपनी पित चिनी लोकांवर बंदी घालून वंशद्वेष (Racism) व वंशनापसंती (Xenophobia) व्यक्त केली असे टोले मारले. मग ट्रंपनी लगेच तज्ज्ञांची (आरोग्यमंत्री, नॅशनल इस्टिट्यूट ऑफ हेल्थच्या घटक संस्थेचे संचालक व जगप्रसिद्ध सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशन, अटलांटा, याचे संचालक वगैरे) समिती गठीत करताना सरकारची सर्व संसाधनांची तोफ या विषाणू च्या प्रसारावर डागली व नेतृत्व दाखवले. दर काही दिवसांनी या समितीचे सदस्य वार्तापरिषद भरवून वार्ताहारांच्या प्रश्नांना उत्तरे देत होती. त्यामुळे जनतेतील प्रक्षोभकता व भीती कमी होऊन इथली प्रजा या विषाणूविषयी सुसंस्कृत झाली. याशिवाय ट्रंपनी संसदेकडून २.१ अब्ज डॉलर मागितले. ती प्रसन्न होऊन तिने ४ मार्च २०२० रोजी ८.३ अब्ज ट्रंपला दिले. त्यातले ३ अब्ज डॉलर लस विकसित करण्यास व १.५ अब्ज डॉलर रोगाची चाचणी करण्यास वापरण्यात आले. हे पैसे कमी पडले. म्हणून त्यानंतर संसदेत ३ ट्रिलियन डॉलर (२२५ ट्रिलियन रुपये) मंजूर केले.

या तयारीमुळे डेमॉक्रॅटिक पक्षाच्या तोंडचा घासच निघून गेला. त्या पक्षाने अध्यक्षांना पदच्युत करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. खास वकील नेमून सखोल चौकशी केली. मग महाभियोगाचा प्रस्ताव मंजूर केला. या सर्व अडचणींना तोंड देऊन ट्रंप अजूनही उभे आहेत; पडले नाहीत. आता या कोविड-१९ चे निमित्त हाती घेऊन त्या पक्षाने ट्रंप ही आपातस्थिती हाताळण्यास असमर्थ आहेत, अशी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तोही सर्वस्वी फसला. जनता त्यांच्या नेतृत्वाचे व पारदर्शकतेचे कौतुक करते. आता ते लस विकसित करून चीनवर मात करण्याच्या मार्गावर आहेत.

**– डॉ. अनंत लाभसेटवार**
**(फर्स्ट नॅशनल बँक व ट्रस्ट कंपनीचे**
**१४ वर्षे चेअरमन ऑफ दि बोर्ड होते.)**
anantlabh@gmail.com

ग्रंथाली




अमेरिका :
स्थिती
व
स्थित्यंतरे

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**

## आम्ही वगैरे...

होय... होय...
आम्ही टाकतो पोष्टी फेसबुक-इन्स्टावर
खाद्यपदार्थांचे सुरस आणि इंटिरियरचे सुबक
दुसऱ्याच दिवशी आम्ही लिहितो
महामारीने कसा पडलाय खड्डा आमच्याही पोटात
जोडीने डकवतो क्युबिझम एराचे क्लासिक फोटो प्रच्छन्न
किती इंच बारीक झाले कंबरेत
बाया सांगतात दमूनभागून कृतकृत्य नम्र
आळवणीत ओथंबलेल्या पतीप्रेमाने
हिंसेचे फुटणारे प्रपात थोपवून धरत देहामनात

कशी आम्ही मदत करतोय सिक्युरिटीला, वॉचमनला
गार्बेज गोळा करणाऱ्याला
चहाबिस्किटं देऊन
भूतदयेच्या पुढचं पाऊल टाकत वगैरे

होय आम्ही कविता लिहितो
इतक्या लिहितो इतक्या लिहितो
की शब्द नागडे झाले
तरी दिसत नाही काहीच
आतलं बाहेरचं
उन्हाचा कार पेटतो
तशी भिती पेटते
आमच्या बधिर धमन्यात
झाकपाक करत आम्ही करतो अनेक निरर्थक गोष्टी
अर्थपूर्ण मानून उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत

खरं जग खूप लांब आहे आमच्यापासून
हे माहीत आहे आम्हाला
या ॲबसर्ड पोकळीला
आम्ही नाव देतो कोरोनापूर्व कोरोनोत्तोर
हे जग नेतंय फाफलवत आम्हाला करुणोत्तर
बेपर्वा केविलवाणं हसणं आमचं
येतंय गच्च सजवलेल्या फ्लोरोसंट भिंतींवर आपटून आपटून
पुन्हा आमच्याच दिशेने कूच करत

आम्ही थोपवून धरतोय
बुडणारा हा देखणा ग्रहगोल
शिरतंय आमच्याही नाकातोंडात आता
भसाभसा पाणी खोलवर

**– प्रज्ञा दया पवार**
pradnyadpawar@gmail.com

तो आला
त्याने पाहिले नाही
जगाला सरळ विळखाच घातला

पुसून टाकल्या साऱ्याच सीमा
नकाशा त्याने
गिळंकृत करून टाकला

बलाढ्य होती आढ्यताखोर
साम्राज्ये
हतबल करून टाकली त्याने
कोणताही अश्वमेध, राजसूय
त्याला करावा लागला नाही
कोणताही घोडा त्याला
सोडावा लागला नाही

धर्म लागला नाही
द्वेष लागला नाही
वेष लागला नाही
गणवेष लागला नाही

माणूस नावाची एकच
प्रजाती सोडून
कोणालाच पुकारावे
लागले नाही त्याच्याविरुद्ध
युद्ध

इतरांना त्याचा
कोणताच सामनाही करावा
लागला नाही


यांच्यापेक्षा त्यांची त्याच्यामुळे
कमी मरण पावली माणसे
यांच्या तुलनेत त्याला
थोपवण्याचा त्यांचा वेग
अधिक होता
असे म्हणत जो तो
तरीही पाठ थोपटून घेत होता

त्याने गिळंकृत केलेल्या
माणसांच्या शवांची
रोज होत होती मोजदाद
कोणाकडे मागायची
दाद?
नव्हतेच कोणी तसे
त्याने करून टाकले होते
साऱ्यांचेच केवळ हसे

जे निर्माण केले होते
जपले होते माणसाने
रोज भजून, पुजून
त्याचे आधिभौतिक
संरक्षक म्हणून
ते देखील गेले होते
कधीच निघून
विलगीकरणात
त्यांच्या संचालकांच्याही लक्षात आले
होते की
ते देखील माणसांसारखेच
पूर्ण हतबल होते
रक्षण करण्यात

ही सुरुवात शेवटाची की
की शेवट
चुकीच्या सुरुवातीचा?
फडफडतो आहे दिवा
बिनवातीचा

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२
shripadbhalchandra@gmail.com




काय कोरोनाभाऊ, साऱ्या जगाला हादरवून टाकलंस।
वुहानहून निघालास तो थेट युरोपच गाठलंस।
अमेरिका, इटली आणि आता स्पेन झाले।
प्रगत म्हणवणाऱ्या राष्ट्रांच्याही नाकीनऊ आले।
भारत व दक्षिण-पूर्व आशिया मात्र ठीक आहे।
तुला जास्त जवळ येऊ न देण्याची धडपड चालू आहे।।
आमचा देश १३० कोटी लोकांचा, काहीही करणं अवघड।
पण आमचे मोदीजी नाही होऊ देणार तुला डोईजड।।
भराभर पावले उचलली त्यांनी, पाडव्याला केला देश लॉकडाऊन।
सारेजण घरात स्थानबद्ध, लोकलही थांबल्या अप-डाऊन।।
ब्रँडेड वस्तूच घेणारे आणि चोखंदळ मान्यवर।
चुपचाप घेतात असेल जी वस्तू तिथे शेल्फवर।।
मॉल्स बंद, थिएटर्स बंद, बंद झाल्या बागाही।
घरबसल्या माणसे शोधू लागली करमणुकीसाठी काहीबाही।।
शब्दकोड्यांना आला ऊत, नेटफिलक्सची झाली चंगळ।
घरातली माणसे एकमेकाला भेटू लागली, नव्याने झाली ओळख।
मिळालेला असा फुरसतीचा काळ आज दुर्मिळ झाला आहे।
आत्मचिंतन हवे करायला, नक्की कुठे काय चुकले आहे।।
वर्षानुवर्षे पर्यावरणवादी सांगताहेत परत परत ओरडून।
नका घेऊ निसर्गाशी शत्रुत्व त्याचे लचके तोडून।।
तापमान वाढते आहे, अर्क्टिकचा बर्फ वितळतो आहे।
जंगले तोडून भुईसपाट करत आमची 'प्रगती' होत आहे।।
सगळीकडे क्राँक्रीट, पाणी जमिनीत मुरणार कसे?
कितीही आला पाऊस तरी वॉटर टेबल उंचावणार कसे?
उंच उंच इमारती सर्वत्र, मॅनहॅटनशी स्पर्धा आहे आमची।
सगळ्यांना पाणी, मैदाने मिळणार कुठून, पर्वाच नाही कशाची।।
प्रत्येक घरात माणशी एक गाडी, रस्त्यावर ट्रॅफिक जॅम होतो।
आम्ही मात्र भारतात सुखवस्तू लोक वाढले म्हणून गर्वाने सांगतो।।
प्रत्येक रिसोर्स जपून वापरा, काहीच नाही जगात अमर्याद।
आपल्या पूर्वीच्या पिढीची शिकवण करायला हवी आत्मसात।।
अत्याचार अति झाले, कली माजला की दुर्गा अवतार घेते।
काहीना काही स्वरूपात माणसाला आपली आठवण करून देते।।
भक्त करताहेत धावा, देवा, वाचव या संकटातून।
देव म्हणतोय, तुम्हीच केलंय, तुम्हीच निस्तरा सारे मिळून।।
एक य:कश्चित जीवजंतु, त्याने धरले आहे अवघे विश्व वेठीला।
माणसाच्या गप्पा, त्याचा उद्धटपणा लागलाय तो गुंडाळायला।।
कसले फालतू आपण, घराबाहेरही पडू शकत नाही।
एवढी मोठी प्रगती करून आज हातात काहीच नाही।।
पृथ्वीमाता आनंदात आहे, तिला प्रथमच शांतता लाभते आहे।
देवही खुश आहेत देवळात, भक्तांचा ससेमिरा चुकला आहे।।
गाड्या धावत नाहीत, विमाने उडत नाहीत, हॉर्नचा कलकलाट नाही।
सारं कसं शांत शांत, कसलाच गडबड-गोंगाट नाही।।
पक्ष्यांची किलबिल ऐकू येते, मुंबईत म्हणे डॉल्फिन दिसले।
कांगारूही दिसू लागले, व्हेनिसच्या कालव्यात मासेही परतले।
आता तरी शहाणे होऊया, आपणच केलाय निसर्गाचा नाश।
प्रगतीच्या मागे धावून निसर्गचक्राचा केलाय विपर्यास।।
केव्हाही पाऊस येतो, उन्हाळ्यात थंडी पडते, वादळे तर नेहमीची।
आता कोरोनानिमित्ताने निसर्ग करू पाहतोय बातचीत आपल्याशी।।
म्हणतोय, शांत राहा, वेग कमी करा, सारी निसर्गसाधने जपून वापरा।
काय चांगले, काय वाईट ते ठरवून जीवनशैली सुधारा।।
करोना जाईल, सारे सुरळीत सुरू होईल काही दिवसांत।
आपण मात्र परत जात कामा नये त्याच चक्रव्यूहात।।
हा एक इशारा आहे, त्याला समजून घ्यायला हवे।
आपल्या भविष्याला आपल्या परिपक्वतेने आपणच घडवायला हवे।।

**- अनुराधा ठाकूर**
anuradha333@gmail.com

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

**ओंजळ**
**रेश्मा राणे–जाधव**




**सुगंधात न्हालेली ओंजळ**

दे लढा अन लिही जुलुमाच्या प्रतिकाराचं तेजस्वी पान
मुळापासून उपटून टाक अन्यायानं माजलेलं रान

कवयित्रीचा हा संग्रह पहिलाच आहे असे प्रस्तावनेत नमूद केलेले आहे. संग्रह पहिला आहे म्हणजे कवयित्री नव्याने कविता लिहू लागली आहे, असा मात्र त्याचा अर्थ नाही. अनेकांचे कवितासंग्रह हे खूप उशिरा प्रकाशित झालेले असतात परंतु त्यांचे काव्यलेखन हे त्याच्या खूप आधीपासून सुरू झालेले असते. फळे आणि फुले आल्यानंतर झाडाच्या अस्तित्वाची दखल घेतली जाते, परंतु झाड त्याच्या कितीतरी आधीपासून जमिनीत रुजलेले असते, हे लक्षात घ्यायला हवे. लेखनात आलेली प्रगल्भता आणि कसदारपणा हा त्या फळाफुलांसारखा आहे परंतु तो काही नव्याजुन्यावर अलंबून नसतो, वा पुस्तकांच्या संख्येने गुणोत्तरे सांगणारा नसतो. तो असतो त्या कवीच्या प्रतिभेचा आविष्कार, स्वतःच्या अस्तित्वाने दिपवून टाकणारा, आपलासा वाटणारा, भारावून सोडणारा. तसा हा 'ओंजळ' नावाचा संग्रह आहे.

या संग्रहात पन्नास कवितांचा समावेश आहे. या कवितांना स्वतःचा असा तरल वर्ख आहे. आत्म्याचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रत्येक कवितेतून प्रकर्षाने जाणवतो. त्यातला प्रांजळपणा काळजाला हात घालणरा आहे. 'देवदासी' या कवितेत 'तनासकट माज्या मनाची बी मातीच हाय', 'रात फकस्त माझ्यासाठी, दिसा माझं कोन न्हाय' अशा ओळी येतात तेव्हा मन हेलावल्याशिवाय राहत नाही. या कवितेला ग्रामीण बोलीभाषेचा साज चढवलेला आहे. तशा आणखी 'वझं' (८०), 'तवाच भूक कळाया लागली' (८५) या बोलीभाषेचा आधार घेणाऱ्या कविता आहेत. त्यांचे वेगळेपण हे मुळातल्या मातीशी नाते सांगणारे आहे. 'बाई : फक्त एक घुसमट' ही कविता बाईच्या संपूर्ण आयुष्याचा आलेख मांडणारी कविता म्हणता येईल. जन्मापासून जन्म देईपर्यंत आणि जन्मभर फक्त बाईपणाची घुसमट प्रत्येक टप्प्यावर कशी श्वासागणीक हिशेब देत राहते, याचे प्रत्ययकारी दर्शन घडवते. हे दर्शन उसवून टाकणारे आहे. 'लेकी, ओझं वाटतं ह्यांना तुझं' याच धाग्यात मांडलेली आहे. या कविता कवयित्रीच्या आरस्पानी निरीक्षणाची, स्वतःकडे खोलवर पाहण्याची दृष्टी देते. तरीही या कविता स्त्रीवादाचा पुरस्कार करणाऱ्या नसून स्त्रीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला अधोरेखित करणाऱ्या आहेत. अवतीभवती खूप काही घडताना पाहूनही 'महाकाय' वटवृक्ष तटस्थ राहतो, हा वटवृक्ष माणसांच्या तटस्थपणाचे प्रतीक आहे. आज कितीही प्रगतीच्या गोष्टी करत आहोत तरी मानव अजून अश्मयुगाशीच उभा आहे, हे निरीक्षण प्रत्येकाच्या आत्मीक प्रवृत्तीवरच घाव घालणारे आहे. माणसाची बंद मूठ ही सामर्थ्य देणारी असू शकते तशी रितीही असू शकते. खेळला जाणारा खेळ हार येणार म्हणून टाळायचा नसतो तर तो जिंकण्यासाठी खेळायचा असतो. वारी आणि वारकरी यांच्यातले नाते कैवल्याशी जोडणारे असते तर स्प्रिंगच्या बाहुलीत आलेले मुकेपण हे मूक समाजाचे द्योतक ठरते. परंतु कधीतरी ही आज्ञेनुसार चालणारी बाहुली ठोका चुकवील असा आवाज करील असा इशाराही देते.

कवयित्रीला असलेली कवितेची समज ही उपजत गुणांची ओळख करून देणारी आहे, फुलात असलेल्या रंग आणि गंधासारखी. तिच्यातले सहजपण प्रवाहीपणाशी नाते सांगणारे आहे. कुठेही ओढून, बळजबरीने प्रतिमा आणि रुपकांना कोंदणात बसवण्यासारखा अंगिकारण्याचा सोस तिला नाही. कवितेला तिच्या बाजाप्रमाणे फुलू द्यावे, आपल्याला जे सांगायचे आहे, ते तिच्यात चपखलपणे मिसळले जाईल इतकेच भान जपावे, ही अलिप्तता खूप अलवार आणि सुखवणारी म्हणता येईल. कवितांची लांबीरुंदी मोठी आहे पण ती तिच्या आशयाची अपरिहार्यता आहे. मुक्तछंदाचा वापर केलेला आहे पण मोकाट सुटण्याचा स्वच्छंदीपणाचे स्वातंत्र्य घेत नाही. अनेक कविता या लयबद्ध असा ठसा उमटवणाऱ्या आहेत, तर काही कवितांचा ठेका आपल्याला त्यांच्यासोबत चालीवर गाण्यास भाग पाडतो, ठेका धरायला लावतो. बऱ्याचशा कविता सरोजिनी बाबर यांनी संकलित केलेल्या लोकगीतांशी नाते सांगतात. बालपण (३९), मरण (४१), लेकी (४४), घर (५८), शब्द (७२) या कवितांमध्ये आलेले वेगळेपण रुणझुणत आलेले असून कवितांचा ठसठशीत असा ठसा उमटवते. एखादे धृवपद पुन्हा पुन्हा येते तशा कवितेच्या शीर्षकओळी प्रत्येक कडव्यात शीर्षभागी येतात, त्यामुळे कवितेचा ठाशीवपणा शिल्पासारखा अधिक भरीव आणि आशयसंपन्न होतो. एक वेगळा आणि संग्रही असावा असा हा संग्रह कवयित्रीविषयी खूप अपेक्षा व्यक्त करणारा आहे.

'फुलांची ही ओंजळ' निश्चितच सुगंधी आहे. ग्रीष्माच्या कडक उन्हात, चैत्र महिन्यात येणाऱ्या मोगऱ्याचे झाड जसे चहुअंगांनी टपोऱ्या पांढऱ्याशुभ्र फुलांनी बहरून गेलेले असते आणि या फुलांचा सुगंधी दरवळ जसा चहुदिशांना सुगंधी करत असतो, तद्वत हा कवितासंग्रह पानोपानी सुरेख कवितांनी बहरला आहे. मोगऱ्याच्या सुगंधाप्रमाणे या देखण्या कविता वाचकांच्या काळजात कधी घर करतात हे समजतसुद्धा नाही. हे कौतुक केले आहे डॉ. कीर्ती आनंद यादव यांनी. यापेक्षा आणखी वेगळा पुरस्कार कोणता असू शकतो!


मोगऱ्याची ताजी फुले पटकन मनाला आकर्षित करतात ती त्यांच्या मोहून टाकणाऱ्या सुगंधाने आणि प्रसन्न टपोऱ्या टवटवीतपणामुळे. ओंजळ भरून ही फुले घ्यावीत आणि अशी नाकाशी घट्ट धरून ठेवावीत की, थेट काळजाची कुपीच अपुरी वाटावी. तीच ओंजळ सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर अलगदपणे पुढे केली आहे. ती पाहताना आतल्या कवितांची फुले आपल्यासमोर गंध घेऊन आल्याचा भास होतो.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




## ग्रंथपान

### एका स्वर्गस्थ देशाची गोष्ट
**संजय कळमकर**




**अद्‌भुत आणि वास्तव**

पुन्हा मतदान करू नये म्हणून भारतात बोटाला शाई लावतात, हे एका दुय्यम निवडणूक अधिकाऱ्याने सांगितले, तेव्हा एक देव हसत म्हणाले, स्वर्गात ते शक्य नाही. काही देवांना चार-चार, सहा-सहा हात आहेत. काही दानवांना तर शंभर हात आहेत. बोटांना शाई लावण्याचे ठरले तर तेच काम कित्येक वर्षे चालेल. त्यापेक्षा मतदान केल्यावर सरळ हातच काढून निवडणूकशाखेत जमा करायचे. त्यावर ज्याच्या त्याच्या नावाची लेबले लावायची. मतदानप्रक्रिया पूर्ण झाल्यावर हात ज्याचे त्याला परत करायचे.'

देवाने निर्माण केलेल्या पृथ्वीवरील मानवजातीचे सर्वेक्षण करण्यासाठी स्वर्गातून देवच वेष पालटून पृथ्वीवर येतात, त्यावेळी त्यांना जे आढळते ते आश्चर्य आणि कल्पनेच्या पलीकडचे आहे. गणपतीउत्सव, देवांची गजबजलेली स्थळे, शिक्षण, शिक्षक आणि संस्था, माणसांच्या जगण्याचे पाच प्रकार, आरक्षण, पैसा, कीर्तनकार, दवाखाने व करावयाच्या चाचण्या, अशा अनेक क्षेत्रांचा अनोखा परिचय त्यांना होतो. मानवाने परग्रहांवर वसती करण्याइतपत चालवलेले प्रयत्न म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गालाच दिलेले आव्हान नव्हे, तर जगन्नियंत्यालाच आव्हान आहे इतपत केलेली वैज्ञानिक प्रगती, हा त्यांच्यासाठी धोक्याचा जणू इशाराच म्हणावा लागेल. यात आणखी एक मोठे क्षेत्र आहे ते राजकारण आणि निवडणुकांचे. हे सर्वेक्षण देवाधिदेवांसाठी त्यांच्या कल्पनेपेक्षाही मानवाची प्रगती दाखवणारे आहे. या सगळ्यांचे मार्मिक चित्रण या कादंबरीत नेमकेपणाने आलेले आहे. या कादंबरीचा दुसरा भाग आहे तो राजकारण आणि निवडणुकीचा. पृथ्वीवरील राजकारण स्वर्गात नव्हे नरकात पोहोचते, परंतु त्याची धास्ती स्वर्गापुढे उभी राहते. पृथ्वीवर सत्तेसाठी सर्वकाही क्षम्य समजले जाते. निवडणुकीसाठी उभा करण्यात येणारा उमेदवार लायक कोणता याची कसोटी म्हणजे, त्याचे कोणत्याही प्रकारे निवडून येणे हीच. स्वर्गात हेच राजकारण शिरते आणि देवेंद्राच्या सिंहासनालाच आव्हान उभे राहते. विरोधी पक्षाला गारद करण्यासाठी आणि आपली सिंहासनावरील सत्ता आपल्याच हाती ठेवण्यासाठी मग देवेंद्राला मदत घ्यावी लागते ते पृथ्वीवरून आलेल्या मुरब्बी राजकारणी मंडळीची. ही राजकारणी मंडळी सत्तेसाठी पटावरील मोहरे फिरवण्यात पटाईत कसे आहेत याचा अनुभव देवेंद्रासाठी आश्चर्यकारक आहे, त्याचवेळी त्यांच्या मदतीपोटी केलेल्या मागण्याही. हे राजकारणातले डावपेच आणि तडजोडी, त्यानुसार येणारे निकाल, यांची उत्कंठा शेवटपर्यंत उत्तमपणे सांभाळलेली आहे. नरक आणि स्वर्गातला भेद, यमावर कामाचा येणारा ताण, त्याच्या रेड्याला करावे लागणारे काम, यासाठी सातव्या वेतनाची त्याने केलेली माागणी, इतकेच नव्हे; तर प्रत्येक प्रसंगी या सातव्या वेतनाची मागणी पुढे रेटण्याचा प्रयत्न, हे सारेच मनोरंजक आहे आणि त्याचवेळी जाणवत राहते, पृथ्वीवरील जगण्यात आणि स्वर्गातील जगण्यात असलेले अंतर आता कमी झालेले आहे की काय? एक मात्र खरे, की पृथ्वीवरील एकूण वास्तव डोळसपणे यात आलेले आहे आणि ते डोळ्यांत घालण्याइतके अंजनाचे जळजळीत अर्क आहे. स्वर्गाने स्वर्गातच रममाण राहावे, त्याने पृथ्वीच्या प्रेमात न पडलेलेच बरे! पण हेच होकायंत्र उलट दिशेने फिरवता येईल, याचा विचार करा, असा सूचक हेतू प्रत्येकाने विचारात घेतला तर! ही अपेक्षा फोल नसावी.

संजय कळमकर यांची ही कादंबरी मनोरंजनाच्या अंगाने जाणारी, अद्‌भुत, उत्कंठावर्धक आणि काहीशी मिथकस्वरूपाची म्हणता येईल. कळमकर यांच्याकडे असलेली सर्जनशीलता आणि नवीन वाट चोखाळण्याचे सहजपण वाखाणण्यासारखे आहे. स्वर्गात राहणारे देव आणि त्याने पृथ्वीसारख्या एका ग्रहावर निर्माण केलेले जीव, यांच्यात असलेली साम्य आणि विसंगतीदर्शक स्थळे, यांच्यातला समन्वय आणि विरोधाभास एकाच वेळी दृश्य-स्वरूपात दाखवणे म्हणजे तारेवरची कसरत म्हणावी लागेल. परंतु कळमकर यांनी लीलया ही कलाकृती साकारली. भाषा हा सगळ्यात महत्त्वाचा आणि लक्ष वेधून घेणारा भाग. स्वर्गात देवांच्या तोंडी असणारी भाषा आणि पृथ्वीवरील माणसांच्या तोंडी असलेली भाषा यातले नेमकेपण त्यांनी अतिशय तरलपणे जपलेले आहे. मोबाईल-गगनध्वनी, वारा-पवनदेव, टीव्ही-स्वर्गमाध्यम,लोकसंसद-देवसंसद, शिवशाही-देवशाही, स्पेसशटल-महास्वर्गयान, अशा अनेक शब्दांचे चांदणे स्वर्गाच्या रम्य आणि सुखद वातावरणाचे कल्पित अस्तित्व चंदेरी करून टाकते, वाचकालाही त्याच्यात न्हाऊ घालते. स्वर्ग कसा असेल, हे जो तो आपल्या कल्पनेने रंगवतो. परंतु इथे प्रत्यक्षात स्वर्गच लेखकाने आपल्यासमोर उभा केलेला आहे. त्या स्वर्गात देवेंद्र, त्याची पत्नी इंद्राणी यांच्यात झालेले संवाद, देवेंद्र आणि यम यांच्यात झडणारी शाब्दिक चकमक, दरबार, राजमहाल, विश्रांतीस्थळे, करमणूक, या सगळ्या प्रसंगांचे आपण साक्षीदार आहोत, इतके त्याच्याशी एकरूप होतो. कादंबरीत आलेल्या व्यक्तिरेखा, त्यांच्यात असलेले व्यावहारिक आणि सोयीचे शहाणपण अचंबित करते तसे लेखकाच्या निरीक्षणाचा प्रत्यय देते.


ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. द.ता. भोसले यांनी केलेली समीक्षा हा या कादंबरीचा मोठा पुरस्कार म्हणावा लागेल.

मानव देवापुढे शरण जाताना हात जोडतो यात नवल नाही. परंतु देवाने मानवापुढे हात जोडलेले आहेत, असे दृश्य कधी आपल्या पाहण्यात नाही. पण तेच विपरीत दृश्य या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर पाहायला मिळते. त्यामुळे साहजिकच आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. यात आणखी विरोधाभास असा, देव स्वर्गाच्या द्वाराशी उभा आहे आणि ज्या मानवापुढे त्याने हात जोडलेले आहेत तो आहे हातात मोबाईल घेतलेला. बरे हा मानव कुणी भक्त म्हणावा तसा नाही, तो आहे राजकारणात मुरलेला राजकारणी. अशा दोन ध्रुवांवर असलेल्या वृत्तींची मोट बांधलेली आहे चित्रकार सतीश भावसार यांनी. लेखकाच्या कल्पक सर्जनशीलतेला आणि आशयाच्या गाभ्याला साजेसे हे मुखपृष्ठ आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## ग्रंथपान

### टिपंवणी
### डॉ. सिसिलिया कार्व्हालो




**थेंबथेंबांतूनी भरल्या निर्मळ अमृताच्या घागरी**

'बारीक-सारीक चुकांसाठी पापनिवेदन करायचं आणि पुन्हा त्याच चुका करत राहायच्या, याला काही अर्थ आहे का? उलट ज्यावेळेला काही चूक घडली असेल त्याचवेळेला त्या व्यक्तीकडून क्षमा मागितली तर खरा मोठेपणा आहे.'

डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचे नाव म राठी सारस्वतांच्या यादीत सन्मानाने घेतले जाते. त्यांनी आतापर्यंत केलेली साहित्यसेवा ही केवळ रसिकवाचकमान्यच नव्हे; तर कसदारपणामुळे ती समीक्षकांच्या आणि सारस्वतांच्या मान्यतेची मोहोर उमटलेली अशी राजमान्य सेवा ठरलेली आहे. कवितासंग्रह, कथासंग्रह, कादंबरी, समीक्षण, संपादन, संशोधन, अनुवाद, चरित्रात्मक, बालसाहित्य अशा सर्व क्षेत्रांत त्यांनी बजावलेली कामगिरी त्यांच्या सृजनशीलतेचा परिचय करून देण्यास पुरेशी आहे. आणि त्यासाठी त्यांना सन्मानित करण्यात आलेल्या पुरस्कारांची यादी ही त्यांच्या दर्जेदार लेखनावर उमटलेली मोहोर आहे, हे मान्य करायला हवे.

'टिपंवणी' हे आत्मकथन म्हणजे त्यांनी घेतलेला स्वतःचा शोध आहे, समरसतेने आणि तितकाच अलिप्तपणे. आत्मकथनात केवळ स्वतःच्या जीवनाचे, यशापशाचे चित्रण करून स्वतःचे मोठेपण सिद्ध करणे, असा साधारणतः आत्मकथनात दिसून येतो. परंतु प्रस्तुत आत्मकथन त्याला अपवाद म्हणता येईल. स्वतःकडे किती अलिप्तपणे पाहता येऊ शकते, स्वतःच्या एकूण जगण्याचा आलेख किती निर्मळपणाने मांडता येऊ शकतो, त्याचे उत्तम उदाहरण म्हणून या आत्मकथनाकडे पाहता येईल. आत्मकथनात केवळ एका व्यक्तीचे जगणे नसते. कुटुंब, गाव, समाज, संस्कार, भवताल, अशा अनेक घटकांचा तो दस्तऐवज असतो. तो दस्तऐवज म्हणजे हे आत्मकथन. शिशिन ऊर्फ सिसिलिया वसईच्या भूमिकन्या, तिथल्या जडणघडणीशी एकरूप झालेल्या, कौटुंबिक स्थित्यंतरे आणि गावाची स्थित्यंतरे यांचा समान धागा त्या हळुवारपणे उलगडत जातात, तेव्हा साठच्या दशकापासूनचा खूप मोठा कॅनव्हास आपल्या पटलासमोर साकारत जातो. मराठी माध्यमात शिकलेली, पहिल्या नंबरात उत्तीर्ण होणारी, शिक्षणाचा ध्यास घेतलेली, स्वतःच्या पायावर उभी राहून कुटुंबाच्या जबाबदारीचा क्रूस कुणाच्या मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच वाहणारी, स्पष्ट बोलणारी, अन्यायाच्या विरोधात ठाम उभी राहणारी, समाजासाठी आपण झटले पाहिजे हे भान जपणारी, शिक्षक, प्राध्यापक, वक्ता, साहित्यिका, अशा अनेक रूपांत वावरताना सतत व्यस्त असणारी आणि तरीही आपलेपण जपणारी, पाय जमिनीवर असलेली, अशा विविध भूमिकांत असलेल्या सिसिलिया हे एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व आहे, जे संपूर्ण आत्मकथनात आपल्यासोबत एका निवेदकाच्या भूमिकेत वावरताना दिसते.

'टिपं' म्हणजे थेंब आणि 'वणी' म्हणजे पाणी. 'टिपंवणी' म्हणजे थेंबथेंब पाणी, शीर्षकाविषयीची ही फोड त्यांनी मनोगतात केलेली आहे. त्याकाळात पाण्यासाठी किती वणवण करावी लागत होती, हेही यात अध्याहृत आहे. कुडाच्या कौलारू घरात एकत्र कुटुंबपद्धतीत असलेला स्नेह जसा जिव्हाळ्याचा तसा गाव म्हणूनही होता. समाजबांधवात होता, जो जातीच्या भिंतीपलीकडचा होता. घरात बोलीभाषेत जे व्यवहार होत ते वाडवळी भाषेत. त्या शब्दांचे उच्चार आणि त्यांचा अर्थ दोन्ही इथे दिलेले आहेत, त्यामुळे त्या भाषेतला गोडवा तेथील फळभाज्यांइतकाच मधुर असल्याचा जाणवतो. चर्च, चर्चमधील प्रार्थना, तिथे उपयोगात असलेले शब्द, बाप्तिस्मा, लग्नसंस्कार, पापनिवेदन, फादर, यांचा परिचय येथे होतो तसाच सिसिलिया यांना भेटलेल्या कुसुमाग्रज, अण्णा आणि अरुणा ढेरे, वामनदादा, दया पवार, ऊर्मिला पवार, मृत्युंजयकार अशा अनेक मान्यवरांविषयीच्या हृद्य आठवणी यात दिलेल्या आहेत. एक मोठे भाग्य त्यांच्या वाट्याला आले ते त्यांनी स्वतःच्या हिमतीने घडवले म्हणून. त्या सगळ्याविषयी लिहिताना त्यांच्या लेखणीतली ऋजुता वाखाणण्यासारखी आहे. आपल्या कुडाचे घर असलेल्या गावापासून परदेशवारीपर्यंतचा त्यांचा प्रवास, हे त्यांनी कमावलेले भागध्येय आहे. आणि ते त्यांनी कमावलेल्या प्रसन्न शैलीत, उत्तम तोल सांभाळत वाचकांच्या समोर ठेवलेले आहे.

आत्मकथनाची मांडणी लहान लहान अशा प्रकरणांतून केलेली आहे. प्रत्येक प्रकरणाला शीर्षक आहे. ते प्रकरण वाचल्यानंतर शीर्षकातले यथार्थपण लक्षात येते. प्रकरणाच्या शेवटी जो सारांश येतो, तो वाचताना तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, यांच्याशी त्यांचा असलेला दाट स्नेह चकित करतो, भारावून टाकतो आणि त्याचवेळी काही दमदार, कसदार वाचले याचा आनंद होतो. प्रत्येक तत्त्व तपासून-पारखून घ्यायचे, ते निर्भीडपणे मांडायचे, आणि आचरणातही तसेच आणायचे, हे वेगळेपण जगण्यात व लेखनात आलेले आहे, त्यामुळे हे लेखन प्रगल्भ मंथनातून निघालेले निर्मळ अमृत आहे, असेच म्हणावेसे वाटते. आत्मकथनाचा सुंदर व आदर्शमय असा आविष्कार, असे या कथनाचे वर्णन करता येईल.

सतीश भावसार यांनी वाळूवर उमटलेल्या पावलांचे ठसे सुरेखपणे मुखष्ठावर योजलेले आहेत. वाळूची स्थित्यंतरे सतत होत असतात, त्या स्थित्यंतरानंतरही त्याच्या पृष्ठभागावर चिरंतन राहील, या विश्वासाचे हे ठसे आहेत.

**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**



# ग्रंथपान

**थंड हवेचे ठिकाण**
**सुकन्या आगाशे**




### नात्यांचे बहुपेडी इंद्रधनुष्य

'अंगभर उसळतात फुलबाज्यांची कारंजी. बारीक बारीक दश त्यांचे. सुखावह. हे माझंच का सगळं! हे गात्रांमध्ये न मावता झरणारे स्रोत! आणि ही नुसता स्पर्श झाला तरी उमलणारी कमळं! झोकात वर चढत जाणाऱ्या चंद्रामुळेच तर– पण बाहेर लाल फुललेल्या गुलमोहोराचा खडा पहारा आहेच त्या चंद्रावर. आणि तो, तो चंद्रही आता घेतोय लांब लांब झोके.'

सुप्रसिद्ध लेखिका सुकन्या आगाशे यांचे 'इस्पितळ आणि पतंग उडवणारा माणूस' आणि 'न लिहिलेलली पाने' हे दोन कथासंग्रह यापूर्वी प्रकाशित झालेले आणि आपण वाचलले आहेत. त्यांचे बालसाहित्य आणि कविता, संशोधनात्मक लेखनही यापूर्वी प्रकाशित झालेले आहे. आता त्यांचा 'थंड हवेचे ठिकाण' हा तिसरा कथासंग्रह आपल्या भेटीला आला आहे. एकूण बारा कथांचा यात समावेश आहे.

'थंड हवेचे ठिकाण' हे काही डोंगरमाथ्यावर किंवा त्याच्या कुशीत विसावलेले नयनरम्य ठिकाण अशी आपली समजूत. परंतु कुठलेही मायेची ऊब देणारे, आपलेपणा जपणारे हक्काचे घरदेखील थंड हवेच्या ठिकाणाइतकेच हवेहवेसे वाटते. कथासंग्रहाचे शीर्षक असलेली ही कथा म्हणजे दोन मैत्रिणींची कथा आहे. त्यातली छाया ही परदेशात वास्तव्याला असलेली. ती आणि तिचा मुलगा श्याम हे दोघे मनू या मैत्रिणीकडे हक्काने राहायला येतात. दोन संस्कृती, नाते, मैत्री यांचा गोफ म्हणजे ही कथा. परंतु पैसे कमावण्यासाठी परदेशात गेलेल्या माणसांसाठी मातृभूमी ही थंड हवेचे ठिकाण ठरते आहे, ही कथेची सूचकता इवल्याशा अवकाशात बरेच काही सांगून जाते.

विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण' कादंबरीतील निर्वासित झालेली हर्टा जहाजावरून समुद्रात उडी मारून स्वतःला संपवते, हे आपण वाचले आहे. परंतु ही हर्टा आज पंचाहत्तरीच्या वयात जिवंत आहे. तिचा प्रियकर बॉब आहे. तो त्यांनी पत्राने ठरवलेल्या मुंबईच्या रॉयल एम्पायर या हॉटेलात तिची भेट घेतो. जीवनाच्या एका टप्प्यावर पोहोचलेल्या दोघांमधील जीवनाकडे पाहण्याबाबतचा, त्यांच्या कल्पनेत असलेल्या साहचर्याचा ते कशा पद्धतीने स्वीकार करतील, अशी कल्पना समोर ठेवून लेखिकेने 'पुन्हा हर्टा' ही कथा जिवंत आहे. वाचकांना पुन्हा 'रणांगण' कादंबरीचे स्मरण आणि त्यापुढील तिचा 'सिक्वेल', असे दोन अनुभव ही कथा देते.

'इतिहासातल्या मुलीस' ही मनूची कथा. वयाच्या चौथ्या वर्षी आईविना पोरकी झालेली. ती पेशव्यांच्या महाली येते आणि तिथपासून थेट झाशीची राणी लक्ष्मीबाई होते. हा प्रवास या कथेत उलगडला आहे तो पत्राच्या माध्यमातून. हा एक वेगळा प्रयोग आहे.

'जागल्या' ही कथा एका जागरूक तरुणाची आहे. आज सर्वच स्तरांवर, विशेषतः शैक्षणिक क्षेत्रात कशी अनागोंदी सुरू आहे, संबधित या विषयाकडे राजकारण म्हणून कसे पाहतात, आणि हे सारे उघड करायचे तर त्यासाठी काय किंमत मोजावी लागते, याचे दाहक वास्तव या कथेने वाचकांच्या समोर ठेवलेले आहे.

या संग्रहातील प्रत्येक कथा ही स्वतंत्र आहे. या कथा केवळ मनोरंजन करत नाहीत तर डोळ्यांत दाहक अंजनही घालतात. पहिली रात्र, ऐलतीरी– पैलतीरी या कथा नवविवहित तरुणींचे मनोविश्व आणि संस्काराचे भान देतात. इतरही कथांचे वेगळेपण आहेच. या कथालेखनात लेखिकेने घेतलेल्या रूपकांचा आधार हा त्यांच्या सृजनशीलतेचा, कथाविश्वाला समृद्ध करणारा कलदार अनुभव आहे. पाण्यातून पैलतीराकडे निघालेल्या काळविटाचा फक्त डोळाच दिसत राहावा, आणि अचानक मगरीने त्याच्यावर झडप घालून पाणी लाललाल करणे, हे उदाहरण गोठवून टाकणारे आहे. तसेच बर्फावरून घसरत जाणारी मुलगी जबडा उघडलेल्या सुसरीच्या भक्ष्यस्थानी नेमकी जावी, हे उदाहरण भंगणाऱ्या स्वप्नांची तीव्रता दाखवते. अशा अनेक रूपकांचा समावेश या कथांमध्ये लेखिकेने केलेला आहे, जो जी.ए. कुलकर्णींच्या कथांचे स्मरण करून देतो, तसा लेखिकेच्या कसदार आणि प्रगल्भ लेखनाने आश्वस्त करतो. कथांची केलेली मांडणी ही चित्रदर्शी आहे, प्रत्यक्ष ती कथा आपल्यासमोर साकारली जात आहे, असे वाचताना वाटत राहते. मानवी संबंधांच्या अनेक पैलूंचे पदर हळुवारपणे उलगडत जातात, व्यक्तिरेखांच्या तोंडी असणारी भाषा ही त्यांची स्वतःच्या वैशिष्ट्यांसह आलेली असल्याने तिच्यातले सहजपण लक्षात यावे इतके खास आहे. मनोविश्लेषणाच्या बाबतीत हेच खासपण लक्षात येते. त्यामुळे या कथा लक्षणीय ठरलेल्या आहेत.

नात्यांचे, भावभावनांचे इंद्रधनुष्य आपल्यासमोर प्रकटलेले दिसून येते.

सतीश भावसार यांनी या संग्रहाचे सुंदर मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

ग्रंथाली

PIXEL BY PIXEL DIGITAL MEDIA

# साहित्याच्या पारावर

## साप्ताहिक अक्षरमैफल

या लिंकवर पाहा – https://www.facebook.com/granthali.watch

यूट्यूबवर उपलब्ध

भाग ७

शुक्रवार, १२ जून २०२०


नीलिमा गुणे–गोळे
लेखिका





मृदुला भाटकर
कवयित्री






दोन साहित्यिक
आणि आपण...
दर शुक्रवारी भेटूया
सकाळी १० वाजल्यापासून
ग्रंथाली फेसबुक पेजवर..

भाग ९

शुक्रवार, २६ जून २०२०


अरुण शेवते
कवी





मेधा आलकरी
लेखिका





भाग ८

शुक्रवार, १९ जून २०२०


श्रीकांत देशमुख
लेखक





मोहन शिरसाट
कवी





सूत्रधार



अस्मिता पांडे

सूत्रधार



किरण येले

संयोजक


ZEE मराठी

सुदेश हिंगलासपूरकर, धनंजय गांगल, अरुण जोशी, राजू कदम,
धनश्री धारप आणि योगिता मोरे

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.


# बँकेचे व्यवहार... आता कुठेही, कधीही !




## डिजिटल बँकिंगद्वारे ऑनलाइन व्यवहार करा. वेळ वाचवा.

वन पेज इंटरनेट बँकिंग | GO Mo Go Mobile Banking मोबाईल बँकिंग | कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग | BHARAT BILLPAY भारत बिलपे

इंटरनॅशनल डेबीट कार्ड | गिफ्ट कार्ड | क्रेडीट कार्ड | सारस्वत बँक आता व्हॉट्सॲपवर!

सारस्वत बँक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

www.saraswatbank.com


मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.